म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय : बान्वा-
दा. क्र. २६०



BVBK-0400260

२६०

# मनोरंजक सुबोध गोष्टी

* * * * * * * * * * * * * * * *

## भाग ७ वा

* * * * * * * * * * * * * * * *

संग्राहक

**डॉ० ग० शि० पाटणकर**

संगीतप्रवीण

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २६०. दिनांक .....
विषय किशोर क्र. २३९.

BVBK-0400260

* * * * * * * * * * * * * * * *

किंमत ५ रुपये

© डॉ. ग. शि. पाटणकर

*

आवृत्ती पहिली : १९७७

*

मुद्रक

व्ही. जे. देसाई
वैभव प्रिंटिंग प्रेस
गिरगाव, मुंबई ४

*

प्रकाशक

धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
गिरगाव, मुंबई ४

*

# संस्कारित बालवाङ्मय

* * * * * * * * * * * * * * * * * *

डॉ० ग० शि० पाटणकर यांच्या 'मनोरंजक सुबोध गोष्टी' वाचल्या. या गोष्टींमधली विषयांची विविधता, साधी, सोपी अलंकारविरहित भाषा आणि रसाळ कथनशैली यामुळे हे पुस्तक आकर्षक आणि मनोरंजक झाले आहे.

बालवाचकांना नुसते कल्पना-साम्राज्यात न रमवता वास्तवाचे आवश्यक ज्ञान आणि व्यावहारिक शहाणपणा या गोष्टींच्या द्वारे त्यांच्या मनावर बिंबवण्याचा डॉ० पाटणकरांचा प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे. त्यांनी सर्व कथा एखाद्या कीर्तनकाराच्या थाटात रंगवून रसाळ करून सांगितल्या आहेत. त्यांच्यातले प्रसंग रोजच्या जीवनातले आणि मुलांच्या माहितीचे असल्याने जवळचे वाटतात. आणि त्यामुळेच या गोष्टी नकळतच मुलांच्या मनावर सद्गुणांचे आणि नीतिमूल्यांचे संस्कार करीत जातात.

आजकाल बालवाङ्मयाला उदंड पीक आले आहे. परंतु सहेतुकपणे मुलांच्या मनावर संस्कार करण्याच्या दृष्टीने लिहिलेल्या बालवाङ्मयाची उदंड वाण आहे. म्हणूनच डॉ० ग० शि० पाटणकरांनी मुलांकरिता सादर केलेल्या या 'मनोरंजक सुबोध गोष्टीं'चा प्रपंच कौतुकास्पद आणि अभिनंदनीय आहे यात शंका नाही.

**सौ. वंदना विटणकर**, एम्. ए.

# लेखकाचे निवेदन



मनोरंजक सुबोध गोष्टी भाग ७ वा–या पुस्तकाचे निवेदन लिहिताना मला अतिशय सात्विक आनंद होत आहे, व हा सात्विक आनंद म्हणजेच माझ्या या म्हातारपणच्या श्रमांचा मोबदला होय असे मी समजतो. महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुस्तक परीक्षण समितीने 'मनोरंजक सुबोध गोष्टी' या पुस्तकांचे भाग १ ते ५ ही पुस्तके उत्कृष्ट गुरुजनांच्या उत्तेजन देण्याच्या यादीत समाविष्ट केली असून राज्यातील सर्व शिक्षण संस्थांच्या निदर्शनाला आणल्यामुळे व शासनाने प्रत्येक भागाच्या २५०–२५० प्रती विकत घेऊन माझ्या या पवित्र कार्याला उत्तेजन दिल्यामुळेच या सातव्या भागाचे प्रकाशन करण्याचा सुयोग येत आहे. परिक्षण, समितीचा मी अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे ज्या जिल्हा परिषदांच्या,

महानगरपालिकांच्या, नगरपरिषदांच्या शिक्षणसंस्थांच्या अधिकाऱ्यांनी व ज्या शिक्षणसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी वरील पुस्तके आपल्या शाळांतील मुलांच्या लायब्ररीत ठेवण्याकरिता व मुलां-मुलींना बक्षिसे देण्याकरिता विकत घेऊन जी सक्रिय समानुभूती दाखवून प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्या सर्वांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

झाड लहान असताना वाकविता येते. माती ओली असतानाच तिला आकार देता येतो. त्याचप्रमाणे मुले लहान असतानाच त्यांची मने वळवून त्यांच्यावर चांगले संस्कार करता येतात. त्या दृष्टीने हल्लीच्या संस्कारशून्य वातावरणात वाढणाऱ्या मुलांच्या मनावर चांगले परिणाम व्हावे, भावी पिढीचे चारित्र्य सुधारण्यास थोडी तरी मदत व्हावी व बालवाङ्मय साहित्याच्या नितांत गरजेची अंशतः पूर्तता करण्याची थोडी तरी समाजसेवा आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात आपल्या हातून घडावी हा उदात्त हेतू धरूनच मी मनोरंजक सुबोध गोष्टी भाग १ ते ७ ही पुस्तके या महागाईच्या दिवसांत प्रकाशित करीत आहे. माझ्या या पवित्र कार्यात शिक्षण व संस्कृती यांबद्दल जिव्हाळा बाळगणाऱ्या सर्व व्यक्तींनी, संस्थांनी, महाराष्ट्र राज्य शासनाने, जिल्हापरिषदांनी, नगरपरिषदांनी व महानगरपालिकांनी सहकार्य द्यावे अशी माझी त्या सर्वांना प्रेमाची, कळकळीची व आग्रहाची विनंती आहे.

ज्या थोर स्त्रीपुरुषांनी माझी मनोरंजक सुबोध गोष्टी भाग १ ते ६ ही पुस्तके वेळात वेळ काढून वाचली व अभिप्राय दिले त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

पहिल्या सहा भागांप्रमाणेच याही भागाचे सर्व श्रेय त्या संत महात्म्याच्या चरणी अर्पण करून व त्यांना शतशः प्रणाम करून मी हे निवेदन संपवितो.

आपला नम्र,

**ग. शि. पाटणकर**

**१०१ ब्राह्मण वाडी, माटुंगा, मुंबई १९**
**टेलिफोन ४७६९०१**

महानगरपालिकांच्या, नगरपरिषदांच्या शिक्षणसंस्थांच्या अधिकाऱ्यांनी व ज्या शिक्षणसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी वरील पुस्तके आपल्या शाळांतील मुलांच्या लायब्ररीत ठेवण्याकरिता व मुलां-मुलींना बक्षिसे देण्याकरिता विकत घेऊन जी सक्रिय समानुभूती दाखवून प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्या सर्वांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

झाड लहान असताना वाकविता येते. माती ओली असतानाच तिला आकार देता येतो. त्याचप्रमाणे मुले लहान असतानाच त्यांची मने वळवून त्यांच्यावर चांगले संस्कार करता येतात. त्या दृष्टीने हल्लीच्या संस्कारशून्य वातावरणात वाढणाऱ्या मुलांच्या मनावर चांगले परिणाम व्हावे, भावी पिढीचे चारित्र्य सुधारण्यास थोडी तरी मदत व्हावी व बालवाङ्मय साहित्याच्या नितांत गरजेची अंशतः पूर्तता करण्याची थोडी तरी समाजसेवा आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात आपल्या हातून घडावी हा उदात्त हेतू धरूनच मी मनोरंजक सुबोध गोष्टी भाग १ ते ७ ही पुस्तके या महागाईच्या दिवसांत प्रकाशित करीत आहे. माझ्या या पवित्र कार्यात शिक्षण व संस्कृती यांबद्दल जिव्हाळा बाळगणाऱ्या सर्व व्यक्तींनी, संस्थांनी, महाराष्ट्र राज्य शासनाने, जिल्हापरिषदांनी, नगरपरिषदांनी व महानगरपालिकांनी सहकार्य द्यावे अशी माझी त्या सर्वांना प्रेमाची, कळकळीची व आग्रहाची विनंती आहे.

ज्या थोर स्त्रीपुरुषांनी माझी मनोरंजक सुबोध गोष्टी भाग १ ते ६ ही पुस्तके वेळात वेळ काढून वाचली व अभिप्राय दिले त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

पहिल्या सहा भागांप्रमाणेच याही भागाचे सर्व श्रेय त्या संत महात्म्याच्या चरणी अर्पण करून व त्यांना शतशः प्रणाम करून मी हे निवेदन संपवितो.

आपला नम्र,

**ग. शि. पाटणकर**

**१०१ ब्राह्मण वाडी, माटुंगा, मुंबई १९**
**टेलिफोन ४७६९०१**

शिक्षणशास्त्र संस्था, महाराष्ट्र राज्य
पुणे ४११०३०

प्रती,
डॉ. ग. शि. पाटणकर
१०१ ब्राह्मण वाडी,
माटुंगा, मुंबई ४०००१९

विषयः पुस्तके व प्रकाशने

शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणावयाच्या पुस्तकांबाबत ... महोदय ! महोदया,

उत्कृष्ट पुस्तकांना उत्तेजन देण्याच्या योजनेखाली व संचालनालयाकडून काही पुस्तकांच्या प्रती विकत घेऊन त्यांचे शैक्षणिक संस्थांना वाटप केले जाते व इतर सर्व पुस्तके शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणली जातात. खाली दिलेली आपली पुस्तके त्या त्या परिपत्रकान्वये त्या त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत शाळांच्या व महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात आलेली आहेत.

कळावे.

आपला विश्वासू
शिक्षण संचालकांकरिता, पुणे.

| | |
|---|---|
| **मनोरंजक सुबोध गोष्टी भाग १ ला,** | **किंमत ५ रुपये** |
| पत्रक क्र. उपऊ।१०७४।१८७४। स ( पुस्तके ) | दि. २१ मार्च १९७५ |
| **मनोरंजक सुबोध गोष्टी भाग २ रा,** | **किंमत ४ रुपये** |
| पत्रक क्र. उपऊ।११७५।५६३। स ( पुस्तके ) | दि. ३ डिसेंबर १९७५ |
| **मनोरंजक सुबोध गोष्टी भाग ३ रा** | **किंमत ५ रुपये** |
| पत्रक क्र. उपऊ।११७५।५६३। स ( पुस्तके ) | दि. ३ डिसेंबर १९७५ |
| **मनोरंजक सुबोध गोष्टी भाग ४ था** | **किंमत ५ रुपये** |
| पत्रक क्र. उपऊ। ११६९। ५६३ स ( पुस्तके ) | दि. २ जून १९७५ |
| **मनोरंजक सुबोध गोष्टी भाग ५ वा** | **किंमत ५ रुपये** |
| पत्रक क्र. उपऊ।१०७६।८५८। स ( पुस्तके ) | दि.२८ ऑक्टो.१९७६ |
| **मनोरंजक सुबोध गोष्टी भाग ६ वा** | **किंमत ५ रुपये** |

( मंजूरीसाठी पाठविण्यात येत आहे. )

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | १७ |
| मृत्यू म्हणजे देवाची कृपा | १८ |
| आजच्या दुष्पट उद्या | १९ |
| मराठ्यांच्या महादेवाची महती | २१ |
| शिक्षकांचा आदर ठेवा | २४ |
| साठेबाजी करू नका | २७ |
| मास्तरांच्या माणुसकीचा मासला | २९ |
| वक्तृत्व–स्फुरण आणि साधना | ३२ |
| सत्कृत्ये करण्यास शिका | ३५ |
| दळ्यांचा दयाळू दामू | ३७ |
| चातुर्य, चिकाटी व सचोटी | ३९ |
| स्वातंत्र्याची गोडी न्यारी | ४२ |
| पशुवैद्याचे बुद्धिचातुर्य | ४६ |
| सुंगीपासून धडा घेतला | ४९ |
| विद्या विनयेन शोभते | ५१ |
| अतिलोभाचे फळ | ५३ |
| विनोदमूर्ती 'विकटकवि' | ५६ |
| सत्याची कास सोडू नका | ५८ |
| चक्रम विक्रमची विचित्र पैज | ६० |
| गरीब काटूरा राणी झाली | ६२ |
| खोडसाळपणाला योग्य उत्तर | ६५ |
| नेहमी चांगली कामे करा | ६८ |
| साधू व दोन कुत्रे | ७० |
| जगात थोर कोण ? | ७२ |
| एक दिवाळी दोन तऱ्हा | ७४ |
| उंदीरमामांची फटफजिती | ७७ |
| अक्कलहुषारीचे फळ | ८० |
| आंब्यांचा व्यापार | ८४ |
| आपण सारे भाऊ भाऊ | ८६ |
| कलावंतांच्या कलेची कसोटी | ८७ |
| राजाचे महत्त्वाचे कर्तव्य | ९१ |
| सिमेंटमधील भेसळ अंगाशी आली | ९३ |
| लोभी सावकाराची फजिती | ९५ |
| सिनेमा हे व्यसन आहे | ९७ |
| काम हाच प्रगतीचा मार्ग | ९९ |
| जातीयवाद सोडून द्या | १०१ |
| कष्ट करून सुखी व्हा | १०३ |
| यमदूतसुद्धा अन्नाला जागले | १०५ |
| सत्पात्री उपकार करा | १०७ |
| शेटजींच्या स्वप्नांतले भांडण | १०९ |
| मुलांचे प्रेम | १११ |

**महाराष्ट्र राज्य शासनाचे सेवानिवृत्त शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण ) व महाराष्ट्र लोकसेवा आयोग सभासद माननीय श्री. वा. खु. चौधरी लिहितात :**

डॉ. ग. शि. पाटणकर यांनी लिहिलेल्या मनोरंजक सुबोध गोष्टी बालांना मनोरंजक व सुबोध तर होतीलच पण त्याबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्वाची घडण घडविण्यास त्या फार उपयुक्त होतील अशी जबर आशा आहे. त्यांनी वापरलेली भाषा अत्यंत साधी व सोपी असून लहान मुलांना पेलेल अशीच आहे. गोष्टींतील प्रसंग नेहमीच्या जीवनांतील व शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या वातावरणांतील असल्यामुळे मुलांना त्यांतील निष्कर्ष सहज काढता येईल. अशा संस्कारक्षम व मनोरंजक गोष्टी लिहिण्याचा उपक्रम श्री. पाटणकर ह्यांनी हाती घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमास समाज व शासन सर्वतोपरी उत्तेजन देईल अशी आशा व विश्वास प्रगट करून मी हा छोटासा अभिप्राय संपवितो.

**कोकण एज्युकेशन सोसायटी शिक्षणसमितीचे माननीय अध्यक्ष श्री. ज्ञा. वि. नगरकर, बी. ए. बी. एड्. लिहितात :**

मनोरंजक सुबोध गोष्टी नावाची चार भागांतील पुस्तके वाचण्यात आली. डॉ. पाटणकरांनी वयाच्या सत्तरीनंतर आरंभिलेले हे कार्य खरोखरच स्पृहणीय आहे. नवीन पिढीला आवर घालणे हे सध्या कठीण होऊन बसले आहे. अशा वेळी अनुभवी लोकांनी अशा साहित्याने केलेल्या मार्गदर्शनाचा नवीन पिढीवर निश्चितच परिणाम होईल. शिक्षणाबरोबर संस्कृतिसंवर्धनाचे कार्य आवश्यक आहे. मनोरंजक सुबोध गोष्टींमध्ये असे कार्य अगदी सहजतेने झाले आहे. शिक्षक, पालक, पुढारी, समाजसेवक यांनी या साहित्याचे वाचन करून नवीन पिढीलाही ते वाचावयास लावून त्याबद्दल उत्सुकता निर्माण होईल असा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्यक्ष सदर पुस्तके वाचताना याची जाणीव निश्चितच होते आणि म्हणून त्यांतील कोणत्याही एका गोष्टीचा उल्लेख न करता त्यांतील आनंद प्रत्येकानेच मिळवावा—कारण प्रत्येक गोष्टीतून अनेक प्रकारच्या ज्ञानाची पाणपोई लेखकाने उपलब्ध करून ठेवली आहे.

**महाराष्ट्र राज्य शासनाच्या साहित्यिक व सांस्कृतिक कार्यालयाचे माननीय संचालक (सेवानिवृत्त) श्री. राजाराम हुमणे लिहितात :**

साहित्य, नाट्य, कविता, कथा या सर्वच बाबतींत मुलांची फार आबाळ होते. त्यांच्यासाठी खास लिहिलेले साहित्य एकदंरीत कमीच. अशा परिस्थितीत खास मुलांसाठी चुटकेवजा कथा लिहून डॉ. ग. शि. पाटणकर यांनी ही उणीव अंशतः भरून काढली आहे. डॉ. पाटणकरांचे म्हणूनच अभिनंदन करावेसे वाटते. " मनोरंजक सुबोध गोष्टी " या पुस्तकांतील कथा नुसत्या मनोरंजकच नाहीत तर उद्‌बोधकही आहेत.

**सातारा येथील रयत शिक्षण संस्थेचे माननीय सचिव श्री. आ. ज्ञा. साळुंखे लिहितात :**

सध्याच्या यांत्रिक व विज्ञान युगात बालकांचे चारित्र्य बनविणे ही एक अत्यंत अवघड बाब आहे. शिक्षक व पालक यांचे हे काम महत्त्वाचे असले तरी पालकांना व शिक्षकांना हल्लींच्या परिस्थितीत या बाबीकडे अधिक वेळ देता येणे कठीण आहे. यासाठी डॉ. ग. शि. पाटणकर यांची मनोरंजक सुबोध गोष्टी ही पुस्तके संग्रही असणे जरूर आहे. या पुस्तकांत लिहिलेली प्रत्येक गोष्ट बोधप्रद असून, त्यामुळे विद्यार्थ्यांचे चारित्र्य बनविण्यास निश्चितच मदत होणार आहे.

**कोल्हापूर येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे माननीय संस्थापक व कार्याध्यक्ष श्री. गो. ज्ञा. उर्फ बापूजी साळुंखे लिहितात :**

डॉ. ग. शि. पाटणकर यांच्या " मनोरंजक सुबोध गोष्टी " या वाचकांचे मनोरंजन करतात व नव्या बालमनावर सुसंस्कार करतात. म्हणून नव्या पिढीच्या वाचनात या गोष्टी येणे आवश्यक वाटते. सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, सेवा आणि त्याग या मानवी जीवन घडविणाऱ्या तत्त्वांचे वितरण बालमनावर परिणाम घडवील, अशा सुटसुटीत रीतीने व सुबोध रीतीने हा गोष्टीसंग्रह लिहिला आहे. अनेक गोष्टींत एकेक जीवनतत्त्व सांगून अनेक जीवनतत्त्वांचा गुच्छ बनविला आहे. याचा सुगंध भावी पिढीत दरवळत राहील असा मला विश्वास वाटतो.

**महाराष्ट्र राज्य शासनाच्या सेवानिवृत्त माननीय साहाय्यक शिक्षण निरीक्षक बृहन् मुंबई व मानद सचिव बालभवन म. राज्य, श्री. सुमति पायगांवकर (बाल वाङ्मयतज्ञ) लिहितात :**

'मनोरंजक सुबोध गोष्टी' या शीर्षकाखाली लिहिलेले डॉ. ग. शि. पाटणकरांचे तीन भाग वाचले. या पुस्तकांचा पहिला चांगला गुण लक्षात येतो तो हा, की त्यां सर्व अर्थपूर्ण व शक्य तितक्या छोटया आहेत. मुलांनी कसे वागावे व कसे वागू नये हे त्या त्या पात्रांच्या द्वारा दाखविले आहे. पाल्हाळ लावणाऱ्या व मुलांना कंटाळवाण्या वाटतील अशा बोजड भाषेत त्या लिहिलेल्या नाहीत. 'सुबोध' या शब्दावरूनच या गोष्टींमागचा पाटणकरांचा हेतू स्पष्ट होतो. 'मनोरंजक' या शब्दावरून सांगण्याचे माध्यम स्पष्ट होते. तिन्ही पुस्तकांतील भाषा सोपी, सुटसुटीत आहे. गोष्टींतील कथावस्तूंत खूपच विविधता असल्याने प्रत्येक पुस्तक एकदा हातात घेतले की आपोआपच शेवटपर्यंत वाचले जाते. या संस्कारदायी सुरेख पुस्तकांबद्दल डॉ. पाटणकरांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**पुणे महानगरपालिकेचे शिक्षण मंडळ साहाय्यक शिक्षण-प्रमुख डॉ. ए. व्ही. घाटगे, एम्. ए. पीएच्. डी., बी. एड्. लिहितात :**

डॉ. पाटणकर यांच्या गोष्टींत विविध प्रकारची मनोरंजकता आहे. त्यांच्या गोष्टींचा संग्रह वाचावयास हातात घेतल्यानंतर मला इसापनीतीच्या गोष्टींची आठवण झाली. त्यांनी आपल्या कथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणांची जोपासना कशी होईल याकडे प्रामुख्याने लक्ष दिले आहे. हल्लीच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्यांची जोपासना करण्याचे कार्य डॉ. पाटणकर करीत आहेत.

सोप्या छोटया गोष्टींतून स्वाभिमान, सद्गुण, चातुर्य, नीतिमूल्ये ही लहान मुलांच्या मनावर योग्य संस्कार होण्यास तीन भागांतील कथांचा संग्रह लहान मुलांना वाचण्यास उपयुक्त आहे.

**आर्यन एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल, मुंबई ४, या शाळेचे माननीय प्रिन्सिपॉल श्री. हेमचंद यशवंतराव रणदिवे. बी. ए. (ऑ.) बी. एड्., डीप., एड. लिहितात :**

—बालकाचे मन हे कोमल असते व या वयातच उत्तम संस्कारांचा फायदा होतो. ज्याप्रमाणे शेतकरी जून महिन्यात शेतात खपतो व त्याचे फळ चार महिन्यांनंतर त्यास मिळते, त्याचप्रमाणे या कोवळ्या वयात जर बालकांवर संस्कार केले तर तरुणपणी ते सुखाने व समाधानाने समाजात जगू शकतात. 'पुष्पसंगे मातीस वास लागे,' या न्यायाने या पुस्तकांतील लहान व थोरांच्या गोष्टींपासून कुमारांना आनंद तर मिळेलच पण त्यांच्या मनावर चांगले संस्कार जरूर घडतील व त्यांना व्यवहारज्ञानही प्राप्त होईल. असा हा सुगंधी कथासंग्रह कुमारांनी जरूर वाचावा म्हणजे त्यांना भावी आयुष्यात आनंद, समाधान व सेवावृत्ती यांची प्राप्ती होईल.

**राजा छत्रपती विद्यालय, दादर, मुंबई १४, या शाळेचे प्रिन्सिपॉल माननीय श्री. वसंत विठ्ठल हसबनीस बी. ए., बी. टी बी. एड्. लिहितात :**

ह. भ. प. डॉ. पाटणकर यांनी लिहिलेली मनोरंजक सुबोध गोष्टी ही पुस्तके आजच्या विदारक समाजस्थितीत सर्वांना, विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना, अत्यंत उपयुक्त आहेत. पंचतंत्राप्रमाणे बोधपर व इसापनीतीप्रमाणे तात्पर्ययुक्त अशी ही सोप्या व रसाळ भाषेत लिहिलेली पुस्तके संग्रही असावीत.

मला स्वतःला ही पुस्तके फार आवडली.

**मुंबई महानगरपालिकेचे माननीय शिक्षणाधिकारी श्री. प्रभाकर द. हळदणकर बी. एस्सी. ऑनर्स, एम्. एड्., डी. पी. एड. लिहितात :**

डॉ. पाटणकर यांनी लिहिलेल्या ' मनोरंजक सुबोध गोष्टी ' वाचल्या. या तिन्ही संग्रहांत असलेल्या गोष्टी हेतुपूर्ण व संस्कारक्षम आहेत. त्यांत केवळ कल्पनारंजन नाही. या गोष्टींच्या द्वारे मुलांच्या मनावर योग्य संस्कार होण्यास निश्चितच मदत होईल. आजच्या हेतुशून्य व अस्थिर वातावरणात अशा तऱ्हेच्या गोष्टी मुलांच्या वाचनात येणे आवश्यक आहे. या छोट्या गोष्टींतून चातुर्य, सद्गुण, स्वाभिमान वगैरे नीतिमूल्ये मुलांच्या मनावर चांगले परिणाम करण्यास निश्चितच मदत करतील. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुलांना या पुस्तकांचा अतिशय उपयोग होईल. अशा या सुगम व रसाळ गोष्टी लिहून डॉ. पाटणकरांनी बाल-वाङ्मयात फार मोलाची भर घातल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करून हा अभिप्राय संपवितो.

**सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी श्री. मंगेश पाडगांवकर लिहितात :**

गोष्टी ऐकणे मुलांना फार आवडते. आजीबाई सांगत आहेत आणि मुले तिच्या भोवती बसून तल्लीन होऊन ऐकत आहेत हे दृश्य 'गोष्ट' हा शब्द ऐकताच आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. आजीबाई हे घरातले एक विद्यापीठच होते. या गोष्टींच्या द्वारे मुलांची करमणूक होत असेच, पण त्याबरोबरच व्यावहारिक शहाणपणा, नीतिमूल्यांची जाणीव मुलांच्या मनावर ठसत असे. ' घरातल्या विद्यापीठाची ' ही परंपरा डॉ. ग. शि. पाटणकर या पुस्तकांच्या रूपाने पुढे चालवीत आहेत त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. गोष्ट सांगताना महत्त्वाची गोष्ट अशी, की ती कुणालाही ऐकावीशी वाटली पाहिजे. यासाठी नाट्य हवे, व्यक्तिचित्रे डोळ्यासमोर उभी करता यायला हवीत, कथनशैलीत ओघ हवा. डॉ. पाटणकर हे स्वतः कीर्तने करीत असल्यमुळे, श्रोत्यांची मने कथनशैलीने जिंकून घेण्याची कला त्यांच्या अंगी आहे. या गोष्टी लिहीत असताना करमणुकीबरोबरच नीतीचे संस्कार मुलांच्या मनावर व्हावेत असा प्रयत्न डॉ. पाटणकरानी सतत केला आहे.

# विद्यार्थ्याचे सुख

* * * * * * * * * * * * * * * * *

प्रत्येक प्राणी सुखासाठी धडपडत असतो. आपापल्या श्रमाचा पुरेसा मोबदला मिळावा, आरोग्य लाभावे, घरात आनंदी वातावरण असावे ही सर्वसाधारण सुखाची कल्पना असते.

विद्यार्थ्याचे सुख मात्र जरा निराळे असते. त्याला लाभणाऱ्या संधीवर व त्या संधीचा योग्य उपयोग करून घेण्यावर त्याचे सुख अवलंबून असते.

१ शिक्षक संतुष्ट होऊन जेव्हा ज्ञानप्राप्तीचा मार्ग दाखवीत असतो, तेव्हा एकाग्र चित्ताने तो मार्ग स्वीकारीत नसेल;

२ अनेक ग्रंथ हाताशी असताना, ज्ञानार्जनाची संधी समोर उभी असताना तो जर त्याकडे दुर्लक्ष करीत असेल;

३ श्रममय जीवनाकडे पाठ फिरवून तो आळशी, चैनी व सुखासीन बनत असेल;

तर त्याला विद्यार्थी-जीवनाचे सुख लाभणे व उपभोगता येणे कठीण आहे. आपली रोजची नियोजित कामे नियमाने व श्रद्धेने करीत ज्ञानप्राप्तीचा मार्ग चोखाळणे हाच खरा विद्यार्थ्याचा सुखाचा मार्ग आहे.

# १. राष्ट्रपिता महात्मा गांधी

* * * * * * * * * * * * * * * * *

महात्मा गांधी हे जसे थोर क्रांतिकारक होते, तसेच ते मानवतेचे महान सेवकही होते. असे थोर पुरुष युगायुगातून एखाद्या वेळीच निर्माण होतात. आजही त्यांचे विचार, त्यांचे वर्तन, आपणाला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरणार आहे.

गांधीजी आज आपणामध्ये नाहीत. पण सत्य, अहिंसा व शिस्त हे त्यांचे तीन सिद्धान्त आपणासमोर आहेत. या सिद्धान्तांप्रमाणे वागणे हेच आपले कर्तव्य आहे, आणि म्हणूनच त्यांच्या आयुष्यातील एका गोष्टीनेच मी या सातव्या भागातील गोष्टींची सुरुवात करणार आहे.

* * *

# २. मृत्यू म्हणजे देवाची कृपा

* * * * * * * * * * * * * * * * *

परमपूज्य महात्मा गांधी मृत्यूलाही देवाची दया मानीत. उपवासाच्या वेळी ते अनेकदा म्हणायचे, 'मी मेलो तरी ती देवाची कृपा समजा.'

१९१६–१७ मध्ये बिहारमध्ये ते शेतकऱ्यांचा लढा चालवीत होते. गोरे मळेवाले सरकारच्या साहाय्याने हवा तसा जुल्म करीत होते.

एकदा असाच एक तरुण शेतकरी लाठीहल्ल्यात बळी पडला. त्याची आई म्हातारी होती. ती शोक करीत गांधीजींकडे आली व म्हणाली, 'महाराज, माझा एकुलता एक मुलगा गेला, तुम्ही त्याला जिवंत करा.'

महात्माजी त्रस्त होऊन गंभीरपणे म्हणाले, 'मासाहेब, तुमचा बाळ मी जिवंत कसा करणार? मी का देव आहे? माझी कुठे आहे एवढी पुण्याई? एवढी शक्ती? आईसाहेब, प्रभूची इच्छा! असा शोक करणं बरं नाही. मी तुला दुसरा मुलगा देतो.'

असे म्हणून गांधीजींनी त्या वृद्ध बाईचे हात आपल्या डोक्यावर ठेवले व अश्रू आवरीत तिला म्हणाले, 'या लाठीहल्ल्यात गांधी मेला आहे. हा तुझा मुलगा जिवंत आहे. तुझा आशीर्वाद मागत आहे.'

त्या म्हातारीला अश्रू आवरत नव्हते. पण तिने महात्माजींना जवळ घेतले व 'माझा बापू–माझा बापू–' असे म्हणून 'शतायुषी व्हा–' असा प्रेमळ आशीर्वाद दिला.

* *

# ३. आजच्या दुप्पट उद्या

* * * * * * * * * * * * * * * * * *

एका गावात दोन मारवाडी राहात होते. एकाचे नाव मोहनदास व दुसऱ्याचे नाव करसनदास. मोहनदास अतिशय कंजुष व लोकांना फसवून पैसे मिळवीत असे. पाच वर्षांत त्याने पन्नास-साठ लाख रुपये जमा केले. तो स्वतःसाठीसुद्धा फारसा खर्च करीत नसे; मग गोरगरिबांना दानधर्म करण्याचे नावच नको. करसनदास चांगल्या वृत्तीचा, चतुर व सचोटीने व्यापार करीत असे. त्याला मोहनदासची वृत्ती आवडत नसे. करसनदासाने मोहनदासला चांगला धडा शिकविण्याचे ठरविले. तो मोहनदासाकडे गेला व म्हणाला, 'हे पाहा मोहनदास, आपण एक खेळ खेळू या. त्यात तुझा चांगलाच फायदा होईल.'

मोहनदास म्हणाला, 'माझा फायदा होणार असेल तर खेळू या. सांग कोणता खेळ खेळायचा तो!'

करसनदास म्हणाला, 'या खेळात अटी वगैरे काही नाहीत. मी तुला दररोज एक लाख रुपये देईन. तू मला फक्त एक रुपया द्यायचा. दुसऱ्या दिवशी मी तुला पुन्हा लाख रुपये दिले की आदल्या दिवशी तू मला जितके रुपये दिलेले असशील त्याच्या दुप्पट म्हणजे दोन रुपये द्यायचे. तिसऱ्या दिवशी मी तुला एक लाख रुपये देईन तर तू मला आदल्या दिवशीच्या दुप्पट म्हणजे फक्त चार रुपये द्यायचे. हा क्रम असाच पुढेही चालू ठेवायचा!'

मोहनदासाच्या तोंडाला पाणी सुटले. तो याला तयार होऊन म्हणाला, 'याशिवाय आणखी काही अटी असल्या तर आत्ताच सांगून ठेव.'

यावर करसनदास म्हणाला, 'माझी आणखी कोणतीही अट नाही. पण आपला हा खेळ निदान तेवीस दिवस तरी चालू राहिलाच पाहिजे. त्यानंतर तो चालू ठेवायचा की नाही हे तुझं तूच ठरव.'

मोहनदास अधीरतेने म्हणाला, 'ठीक आहे. या खेळाला सुरुवात कधीपासून करायची ?'

करसनदास म्हणाला, 'मी माझे पैसे तयार ठेवले आहेत उद्यापासून सुरुवात करू.'

करार पक्का झाला. मोहनदास दुसऱ्या दिवशी सकाळी करसनदासची आतुरतेने वाट पहात बसला.

ठरल्याप्रमाणे करसनदास एक लाख रुपये घेऊन आला व ते त्याने मोहनदासला दिले. मोहनदासने ते लाख रुपये मोजून घेतले व आपल्या पेटीतला एक रुपया करसनदासच्या अंगावर फेकला. करसनदास शांतपणे निघून गेला.

दुसऱ्या दिवशी करसनदासाने मोहनदासाला एक लाख रुपये देऊन त्याच्याकडून दोन रुपये घेतले. तिसऱ्या दिवशी त्याला एक लाख रुपये देऊन त्याच्याकडून चार रुपये घेतले. चौथ्या दिवशी आठ, पाचव्या दिवशी सोळा, सहाव्या दिवशी बत्तीस, सातव्या दिवशी ६४, आठव्या दिवशी १२८, नवव्या दिवशी २५६, दहाव्या ५१२ रुपये घेतले. मोहनदासाला दहा दिवसांत दहा लाख रुपये मिळाले होते. तो आपल्या नशिबावर व हुषारीवर बेहद्द खूष होता. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या व करसनदासाची त्याला कीव येत होती. त्यानंतरच्या पाच दिवसात मोहनदासाने करसनदासाकडून रोज एक लाख रुपये घेऊन त्याला १०२४, २०४८, ४०९६, ८१९२ व १६२८४ रुपये दिले. तरीही मोहनदास खूष होता. कारण त्याला तोपर्यंत पंधरा लाख रुपये मिळालेले होते.

पण पुढील आठ दिवसांत मात्र पारडे एकदम फिरले. मोहनदासाच्या तोंडचे पाणीच पळाले कारण त्याला सोळाव्या दिवशी ३२,५६८, सतराव्या दिवशी ६५,१३६, अठराव्या दिवशी १,३०,२७२, एकोणिसाव्या दिवशी २,६०,५४४, विसाव्या दिवशी ५,२१,०८८, एकविसाव्या दिवशी १०,४२,१७६, बाविसाव्या दिवशी २०,८४,३५२ व तेविसाव्या दिवशी

४१,६८,७०४ रुपये द्यावे लागले. त्याला करसनदासकडून मिळाले होते मात्र तेवीस लाख !

मोहनदास निष्कांचन बनला. पण करसनदास मोठ्या दिलाचा मारवाडी होता. त्याने मोहनदासाला कंजूसपणा सोडण्यास व गोरगरिबांना मदत करण्यास सांगून त्याच्याकडून घेतलेल्या पैशांपैकी आपले फक्त तेवीस लाख रुपये ठेवून बाकीचे पैसे त्याला परत दिले. आपल्या देखत मोहनदासाला पाच लाख रुपये गोरगरिबांना व चांगल्या उपयुक्त संस्थांना देणगी देण्यासाठी म्हणून वेगळे काढून ठेवायला लावले.

मुलांनो, पाहिलत नां ? कंजुस होऊ नका. गोरगरिबांना सढळ हाताने मदत करा. चतुराईने व सचोटीने वागा.

* * *

## ४. मराठ्यांच्या महादेवाची महती

* * * * * * * * * * * * * * * * *

शिवाजी महाराजांना वडिलांप्रमाणे माननीय असलेल्या कान्होजी जेध्यांनी खंडोजी खोपड्यांच्या जिवाची व त्याच्या वतनाबद्दलची रदबदली केली होती. ती ऐकताच शिवाजीराजांच्या डोळ्यांत नुसता अंगार फुलला. अत्यंत कमी बोलणारे शिवाजीमहाराज एकदम विजेप्रमाणे कडाडले, 'कान्होजी, ज्या खंडोजी खोपड्यानं आमच्याशी बेइमान होऊन आमच्यावर हत्यार उपसले, ज्याच्या वतनाला ठिकाणा नव्हता त्याची आम्ही वतनदारी स्थापली, तो निमकहराम स्वराज्याशी शत्रुत्व करतो, त्याच्या जिवाची व वतनाची आपण तरफदारी करता ?'

कान्होजीने हे शब्द ऐकले. पण महाराजांचे व त्यांचे संबंध अत्यंत निकटचे व आपुलकीचे होते. त्यांनी पुन्हा धीर करून बोलायला सुरुवात केली. 'महाराज, खोपड्यांना जीवदान देऊन त्यांच्या अपराधाबद्दलची शिक्षा आम्हास द्यावी. खोपड्यांना व त्याच्यातर्फे आलेल्या त्यांच्या जावयास,—हैबतराव शिळमकरास—आम्ही तसं वचन दिलं आहे.

प्रसंग अत्यंत महत्त्वाचा व गंभीर पेचाचा होता. हैबतरावही महाराजांचा आवडता व कान्होजी जेधे तर महाराजांना वडिलांप्रमाणे! पण महाराज चतुर होते, बुद्धिमान होते व यातच मराठ्यांच्या महादेवाची महती होती. ते म्हणाले, 'कान्होजी, शब्द दिला. खंडोजीस जीवदान दिलं.' पण खंडोजीस दररोज मुजऱ्यास येण्यास आज्ञा केली. कान्होजीचा जीव आभाळाएवढा झाला.

खंडोजी खोपडा रोज गडावर मुजऱ्यास येऊ लागला. महाराज बोलत नसत आणि खंडोजी हिंमत धरून महाराजांकडे पाहाण्याचे धाडस करीत नसे. एके दिवशी खंडोजीने मुजरा करण्यास मान वाकवली आणि बिजली कडाडल्यासारखा आवाज झाला. ज्वालामुखी भडकला. महाराज कडाडले, 'कोण आहे रे तिकडे? या हरामखोराला पकडा आणि याचा उजवा हात व डावा पाय कलम करा.'

महाराजांचा हुकूम ताबडतोब अमलात आला. खंडोजीने आक्रोश केला. पण महाराज अजिबात द्रवले नाहीत.

कान्होजी जेध्यांना ही वार्ता समजली. ते धावतच गडावर गेले. मनातून ते अतिशय रागावले होते. ते महाराजांच्या जवळ गेले व म्हणाले, 'महाराज, अभय दिलेल्याला शासन? आमची भीड वगैरे—'

त्यावर महाराज म्हणाले, कान्होजी, आम्ही जीवदान देण्याचा शब्द ततोतंत पाळला आहे. तुमची भीड म्हणूनच शब्द पाळला. पण स्वराज्यात फंदफितुरी, हरामखोरी—करणाराला शासन हे झालंच पाहिजे. ज्या दगलबाज लोकांच्या शरिराचे दहा दहा तुकडे करून दाही दिशांना फेकून द्यावे, अशा लोकांना राजांनी जर सुखरूप

ठेवलं तर लोक आम्हाला नावं ठेवतील. फंदफितुरी—हरामखोरी करणारांचं राज्यात पेव फुटून स्वराज्याची लक्तरं लोंबू लागतील. पश्चात्ताप व्यक्त केला की फितुरीसारखे गुन्हेसुद्धा माफ होतात असा लोकांचा समज होईल. राज्यकर्त्यांची जरब नाहीशी होईल. प्रजा हवालदिल होईल. तुमचेआमचे जीवन सुद्धा धोक्यात येईल. अशा परिस्थितीत सांगा कान्होजी सांगा—खंडोजीला शासन केलं यात आमचं काही चुकलं का ? सांगा—कान्होजीराव, सांगा !'

महाराजांच्या या सत्य व प्रभावी भाषणाचा कान्होजींवर अतिशय परिणाम झाला. त्यांना महाराजांचे म्हणणे तंतोतंत पटले. त्यांनी महाराजांचे पाय धरले व ते म्हणाले, 'महाराज, मला क्षमा करा. मीच चुकलो. मी रदबदली करायला नको होती. आपण स्वराज्याचे देव नव्हे तर महादेव आहात. आपण राजधर्म बरोबर पाळलात. अशामुळेच स्वराज्य उभे राहाणार आहे. भावनेला व मायेला बाजूला ठेवून कर्तव्य पार पाडणे हेच राज्यकर्त्यांचं ब्रीद असायला पाहिजे. महाराजांचे शब्द पृथ्वीमोलाचे आहेत व हीच आम्हा मराठ्यांच्या महादेवाची महती आहे—'

महाराजांनी गहिवरून कान्होजीरावांच्या पाठीवरून हात फिरविला. कान्होजींनी लवून महाराजांना मुजरा केला.

मुलांनो, शिवाजी महाराजांनी स्वराज्याला धोका आणणाऱ्या लोकांबद्दल जे धोरण व कृती अंमलात आणली, त्याच धोरणाचा व कृतीचा आदेश आजच्या राज्यकर्त्यांनी आपल्या समोर ठेवला तर भारताच्या उज्ज्वल भवितव्याची खात्री वेगळी द्यायला नको.

शिवाजी महाराजांची योग्यता स्वयंसिद्ध आहे. अलेक्झांडरप्रमाणे शिवाजीने आपल्या स्नेह्यासोबत्यांस ठार मारले नाही. सीझरप्रमाणे आपल्या बायकोला सोडून दिले नाही, नेपोलिअन बोनापार्टप्रमाणे परराष्ट्रांचे स्वातंत्र्य पायांखाली तुडविले नाही, क्रॉम्वेलप्रमाणे एखाद्या प्रांतातील जनतेची कत्तल उडविली नाही, फ्रेडरिक दि ग्रेटप्रमाणे नीच दुर्गुण

शिवाजीच्या अंगी नव्हते. त्याचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्मपरायणतेचे, परधर्मसहिष्णुतेचे होते. स्वराष्ट्राचा उद्धार, स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणे या लोकोत्तर कृत्यांनी जर कोणा पुरुषाने या भूमंडळाला अक्षय ऋणी करून ठेवले असेल तर ते शिवाजी महाराजांनीच होय !

* * *

## ५. शिक्षकांचा आदर ठेवा

* * * * * * * * * * * * * * * * * *

मुंबईचे एक सेवानिवृत्त देशपांडे नावाचे शाळाशिक्षक काही कामानिमित्त वाईला गेले होते. तेथील द्रवीड हायस्कूलचे हेडमास्तर गणपतराव ढवळीकर यांच्याकडेच उतरले होते.

एक दिवस हे देशपांडे कृष्णातीरावरील रम्य अशा गणपतिआळीच्या घाटावर फिरावयास गेले होते. ते बसले होते त्याच्याच पलीकडे शाळेतील मुलांचा एक कंपू बसला होता. त्यांचे एकमेकात त्यांच्या शाळेसंबंधाने बोलणे चालले होते. देशपांडे यांना शाळा या विषयाची गोडी असल्यामुळे त्यांचे लक्ष साहजिकच त्या मुलांच्या बोलण्याकडे गेले.

**एक मुलगा** : आपले ढवळीकर मास्तर किती तापट व चक्रम् आहेत ! एखाद्या शिक्षकाने एखाद्या विद्यार्थ्याविषयी काही जरी सांगितलं तरी ते चवताळून जातात आणि त्या मुलाला शिक्षा करतात !

**दुसरा मुलगा** : आणि ते आपले वर्ग शिक्षक आर. व्ही. देशपांडे ! ते काय कमी आहेत ? मी काल होमवर्क करून आणलं नव्हतं तर त्यांनी मला चार छड्या मारल्या !

**तिसरा मुलगा :** आणि ते जोशीमास्तर तरी काय कमी आहेत? सहामाही परीक्षेत त्यांच्या विषयात फक्त चार मार्कांनी नापास झालो तर माझी किती नालस्ती केली नि शिक्षाही केली!

**चौथा मुलगा :** अन् त्या हनुमानजयंतीला? मला वर्गात यायला थोडा उशीर झाला तर यार्डी मास्तरांनी मला तासभर बाकावर उभं केलं!

**पाचवा मुलगा :** छे छे! हे आता अगदी ओव्हर झालं! याचा एकदा समाचार घेतलाच पाहिजे. यांपैकी एका तरी मास्तराची शाळेच्या बाहेर पडल्यावर हजेरी घ्यायलाच हवी—

हा सर्व संवाद देशपांडे मास्तर ऐकत होते. तो ऐकून त्यांना अतिशय वाईट वाटले. स्वतंत्र भारताच्या तरुण पिढीचा शिक्षकांविषयीचा अनादर व तिरस्कार पाहून देशपांडे मास्तरांच्या डोळ्यांना न कळत पाणी आले. तरी पण त्यांनी थोडासा विचार करून त्या मुलांना थोडीफार समज देण्याचे ठरविले. ते त्या मुलांजवळ गेले व त्यांनी त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखविली. या त्यांच्या सहानुभूतीचा फार चांगला परिणाम झाला व ती मुले त्यांच्याबरोबर मनमोकळेपणाने बोलू लागली. सर्व मुलांचे बोलणे ऐकून घेतल्यावर देशपांडे मास्तर त्यांना म्हणाले, 'तुमचं सगळं म्हणणं मी एकलं. आता मी तुम्हाला काही प्रश्न विचारू का? माझ्या प्रश्नांची तुम्ही सरळ आणि खरी उत्तरं द्याल का?'

सर्व मुले एकदम म्हणाली, 'जरूर विचारा जरूर विचारा—आम्ही अगदी खरी उत्तरं देऊ.'

**देशपांडे**— तुमचे शिक्षक तुमच्यापेक्षा अधिक शिकलेले व शहाणे आहेत की नाही?

**पहिला मुलगा** — आहेत—नक्कीच आहेत.

**देशपांडे** — तुमच्यापेक्षा त्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव अधिक आहे की नाही?

**दुसरा मुलगा** — नक्की आहे.

**देशपांडे** — तुम्हाला परीक्षेत चांगलं यश मिळावं यासाठी ते शक्य तितके प्रयत्न करतात की नाही ?

**तिसरा मुलगा** — करतात. अतोनात करतात !

**देशपांडे** — तुम्ही बुद्धिवान बनलात म्हणजे त्यांना अभिमान वाटतो की नाही ?

**चौथा मुलगा** — त्यांना आमच्याविषयी फार अभिमान वाटतो व तसं ते बोलूनही दाखवतात.

**देशपांडे** — आता शेवटचा प्रश्न. तुम्हाला वारंवार उपदेश करून — तुम्ही त्यांच्या विरुद्ध वारंवार कारवाया करीत असून सुद्धा तुम्हाला सदुपदेश करून सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न ते करतात की नाही ?

**पाचवा मुलगा** — नक्कीच करतात.

**देशपांडे** — मग आता असं सांगा की जर यदाकदाचित् त्यांच्या हातून लहानशी चूक झाली तर त्याबद्दल तुम्ही त्यांच्यावर रागावणं बरं का ?

सर्व मुले एकदम गप्प झाली. त्यांचे डोळे पाणावले. सर्व मुलांनी देशपांडे मास्तरांना नमस्कार केला व वेळीच योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार मानून शिक्षकांविषयी आदर बाळगण्याचे आश्वासन दिले.

**मोलाचे बोल** : मुलांनो, विद्यार्थी आपले ज्ञान चार मार्गांनी मिळवितो. (१) वर्गातील अध्ययन, (२) घरी केलेला अभ्यास, (३) मित्रांच्या बरोबर केलेला अभ्यास व (४) झालेल्या अभ्यासाचे मनन व चिंतन.

पहिल्या मार्गाने ज्ञान मिळवायचे म्हणजे तुमच्या शिक्षकांबद्दल तुम्हाला आदर असला पाहिजे. त्यांचे वय, अनुभव, शिक्षण व अधिकार या सर्व बाबतींत श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीबद्दल प्रेम, आदर व त्यांच्यावर नितांत श्रद्धा व विश्वास पाहिजे. तरच तुमचे कल्याण होईल. पूर्वीच्या काळी गुरू म्हणजे परब्रह्म मानीत असत. नंतरच्या काळात मित्र व आताच्या काळात काय ते न लिहिलेलंच बरं—म्हणजेच जितका मान द्यायला पाहिजे तितका दिला जात नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट. गेल्या वीस वर्षांत शाळेतील वातावरण एकदम बदलून गेलेले आहे. अभ्यासाचे विषय वाढले, अभ्यासक्रम वाढला. याच्या उलट, मुलांना शाळेत शिकविण्याचे तास कमी झाले, सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढली. मुलांनो, या सर्व गोष्टींमुळे तुमची स्वतः अभ्यास करण्याची जबाबदारी वाढलेली आहे. शिक्षक फक्त वर्गात शिकवू शकतात. विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घ्यायला त्यांना वेळच नसतो. म्हणून विद्यार्थ्यांनी वर्गात झालेला अभ्यास पक्का करण्याचे काम स्वतः केले तरच तरणोपाय आहे.

तिसरी अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजकालच्या शिक्षणात परीक्षा आणि पदवी यांना फाजील महत्त्व दिले गेलेले आहे. ज्ञान आणि विद्या यांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. तरी मुलांनो, तुम्ही ज्ञानार्जन आणि परीक्षा यांना सारखेच महत्त्व दिले पाहिजे. तुमच्या पुढच्या आयुष्यात तुमच्या पदवीमुळे तुम्हाला काम मिळेल पण कामातील प्रगती व उत्कर्ष होण्याकरिता भरीव ज्ञान मिळविणेच जरुरीचे आहे. तरी तुम्ही दोन्ही गोष्टींकडे लक्ष देऊन अभ्यास करा व नेटाने व निश्चयाने झटा. या गोष्टी करताना चारित्र्य ही एक फार मोठी समस्या आहे हेही लक्षात ठेवा.

* * *

## ६. साठेबाजी करू नका

* * * * * * * * * * * * * * * *

बाजारात एखादी वस्तू जरा कमी मिळू लागली की लोक त्या वस्तूची साठेबाजी करायला लागतात. अशामुळे ती वस्तू जास्तच दुर्मिळ होते. साठेबाजी करणे, कोणत्याही वस्तूचा मोह धरून जास्त हव्यास धरल्यामुळे नाश होण्याचा धोका उत्पन्न होतो हे दर्शविणारी एक काल्पनिक गोष्ट :

**देशपांडे** — तुम्हाला परीक्षेत चांगलं यश मिळावं यासाठी ते शक्य तितके प्रयत्न करतात की नाही ?

**तिसरा मुलगा** — करतात. अतोनात करतात !

**देशपांडे** — तुम्ही बुद्धिवान बनलात म्हणजे त्यांना अभिमान वाटतो की नाही ?

**चौथा मुलगा** — त्यांना आमच्याविषयी फार अभिमान वाटतो व तसं ते बोलूनही दाखवतात.

**देशपांडे** — आता शेवटचा प्रश्न. तुम्हाला वारंवार उपदेश करून — तुम्ही त्यांच्या विरुद्ध वारंवार कारवाया करीत असून सुद्धा तुम्हाला सदुपदेश करून सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न ते करतात की नाही ?

**पाचवा मुलगा** — नक्कीच करतात.

**देशपांडे** — मग आता असं सांगा की जर यदाकदाचित् त्यांच्या हातून लहानशी चूक झाली तर त्याबद्दल तुम्ही त्यांच्यावर रागावणं बरं का ?

सर्व मुले एकदम गप्प झाली. त्यांचे डोळे पाणावले. सर्व मुलांनी देशपांडे मास्तरांना नमस्कार केला व वेळीच योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार मानून शिक्षकांविषयी आदर बाळगण्याचे आश्वासन दिले.

**मोलाचे बोल** : मुलांनो, विद्यार्थी आपले ज्ञान चार मार्गांनी मिळवितो. (१) वर्गातील अध्ययन, (२) घरी केलेला अभ्यास, (३) मित्रांच्या बरोबर केलेला अभ्यास व (४) झालेल्या अभ्यासाचे मनन व चिंतन.

पहिल्या मार्गाने ज्ञान मिळवायचे म्हणजे तुमच्या शिक्षकांबद्दल तुम्हाला आदर असला पाहिजे. त्यांचे वय, अनुभव, शिक्षण व अधिकार या सर्व बाबतींत श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीबद्दल प्रेम, आदर व त्यांच्यावर नितांत श्रद्धा व विश्वास पाहिजे. तरच तुमचे कल्याण होईल. पूर्वीच्या काळी गुरू म्हणजे परब्रह्म मानीत असत. नंतरच्या काळात मित्र व आताच्या काळात काय ते न लिहिलेलंच बरं–म्हणजेच जितका मान द्यायला पाहिजे तितका दिला जात नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट. गेल्या वीस वर्षांत शाळेतील वातावरण एकदम बदलून गेलेले आहे. अभ्यासाचे विषय वाढले, अभ्यासक्रम वाढला. याच्या उलट, मुलांना शाळेत शिकविण्याचे तास कमी झाले, सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढली. मुलांनो, या सर्व गोष्टींमुळे तुमची स्वतः अभ्यास करण्याची जबाबदारी वाढलेली आहे. शिक्षक फक्त वर्गात शिकवू शकतात. विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घ्यायला त्यांना वेळच नसतो. म्हणून विद्यार्थ्यांनी वर्गात झालेला अभ्यास पक्का करण्याचे काम स्वतः केले तरच तरणोपाय आहे.

तिसरी अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजकालच्या शिक्षणात परीक्षा आणि पदवी यांना फाजील महत्त्व दिले गेलेले आहे. ज्ञान आणि विद्या यांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. तरी मुलांनो, तुम्ही ज्ञानार्जन आणि परीक्षा यांना सारखेच महत्त्व दिले पाहिजे. तुमच्या पुढच्या आयुष्यात तुमच्या पदवीमुळे तुम्हाला काम मिळेल पण कामातील प्रगती व उत्कर्ष होण्याकरिता भरीव ज्ञान मिळविणेच जरुरीचे आहे. तरी तुम्ही दोन्ही गोष्टींकडे लक्ष देऊन अभ्यास करा व नेटाने व निश्चयाने झटा. या गोष्टी करताना चारित्र्य ही एक फार मोठी समस्या आहे हेही लक्षात ठेवा.

* * *

## ६. साठेबाजी करू नका

* * * * * * * * * * * * * * *

बाजारात एखादी वस्तू जरा कमी मिळू लागली की लोक त्या वस्तूची साठेबाजी करायला लागतात. अशामुळे ती वस्तू जास्तच दुर्मिळ होते. साठेबाजी करणे, कोणत्याही वस्तूचा मोह धरून जास्त हव्यास धरल्यामुळे नाश होण्याचा धोका उत्पन्न होतो हे दर्शविणारी एक काल्पनिक गोष्ट :

गोदावरी नदीच्या तीरावर एका गावात एक मोठे पिंपळाचे झाड होते. त्या झाडावर अनेक पक्ष्यांनी आपले निवासस्थान केले होते. त्या झाडावर एक क्रौंच पक्ष्याचे जोडपे मोठ्या आनंदात राहात होते. दोन्ही पक्षी सूर्योदयाबरोबर घरट्याबाहेर पडायचे आणि दिवसभरात भरपूर अन्न गोळा करून मग परत घरट्यात यायचे. एक दिवस असा आला की मादी जरा आजारी असल्यामुळे नरपक्षी एकटाच बाहेर पडला. आकाशात उंच उंच भराऱ्या घेत, वळणावर वळणे घेत घेत उडत होता. पण त्याचे लक्ष होते जमिनीवर मिळणाऱ्या भक्ष्यावर व मन होते घरट्यात आजारी असलेल्या मादीवर.

बऱ्याच वेळाने त्याला एका ठिकाणी खाद्याचा मोठा साठा दिसला. तो अगदी खूष झाला. कसलाही विचार न करता त्याने घेता येतील तेवढे पदार्थ आपल्याबरोबर घेतले व आपल्या घरट्याची वाट धरली. त्याला आपल्या मादीला भेटण्याची घाई झाली होती.

त्या पक्ष्याच्या तोंडातील ते पदार्थ दुसऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याने पाहिले. बरेच दिवस त्या पक्ष्यांना चांगले खाद्य मिळाले नव्हते. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. भुकेने व्याकूळ झालेला मनुष्य जसा कसल्याही पापपुण्याचा विचार न करता वाटेल ते करतो त्याप्रमाणे त्या सर्व पक्ष्यांनी त्या एकाकी क्रौंचावर हल्ला चढविला. क्रौंच आपल्यावर एकाएकी हल्ला झालेला पाहून घाबरून गेला. पण त्यातल्या त्यात जोर करून त्याने त्या हल्ल्याला तोंड देण्याचा प्रयत्न केला. पण तो एकटा एवढ्या थव्याला तोंड काय देणार? तो घायाळ झाला. आपली सुटका व्हायची तर त्या पक्ष्यांच्या तोंडावर काही तरी टाकले पाहिजे असा त्याने विचार केला. तेव्हा त्याने आपल्याला आवश्यक नसलेले अन्न त्यांच्याकडे फेकले. ते सगळे पक्षी त्या खाद्यात गुंतले व तो क्रौंच आपल्या घरट्याकडे सुखरूपपणे परतला.

मुलांनो, माणसाने कसल्याही गोष्टीचा फाजील हव्यास धरू नये. फार मोह धरणे हे दुःखाचे कारण आहे. केवळ दुःखच नव्हे तर त्यामुळे काही वेळां आपल्या प्राणांवर सुद्धा गदा येते. म्हणून जरुरीपेक्षा जास्त साठा

करणे म्हणजे दु:खाला निमंत्रण देणेच होय. त्या क्रौंच पक्ष्याने जर मोहाला बळी पडून एवढं अन्न आणलं नसतं तर त्याच्यावर असा दु:खद प्रसंग आला नसता. 'साठेबाजी करू नका' हेच या गोष्टीचे तात्पर्य.

* * *

## ७. मास्तरांच्या माणुसकीचा मासला

* * * * * * * * * * * * * * * * *

एका तालुक्याच्या गावी सोमनाथ नावाचे एक मास्तर राहात असत. स्वभावाने ते अत्यंत शांत व साळस असून त्यांची वृत्ती परोपकारी होती.

मास्तरकी व फावल्या वेळात थोडीफार भिक्षुकी करून ते आपला संसार चालवीत असत. त्यांना जातीयवाद बिलकुल पसंत नव्हता. आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी ते आपल्या स्वतःच्या खोल विहीरीतून पाणी ओढून काढून चार मोठे हंडे भरून ठेवीत व खेड्यापाड्यांतून येणाऱ्या हरिजनांना पाणी पिण्याची सोय करून देत. गावातील काही सनातनी लोक त्यांना कुचेष्टेने एकनाथ महाराज म्हणत असत. पण सोमनाथ मास्तरांनी कुचेष्टेने देण्यात आलेल्या आपल्या पदवीला यथार्थता कशी आणून दिली ते दर्शविणारी एक गोष्ट.

मे महिना संपत आला होता. सोसाट्याचा वारा सुटला होता. अशा वाऱ्यात माणूस सापडला म्हणजे फजितीला पारावार उरत नाही. छत्री उडून जाते आणि ती धरण्याकरिता तिच्या मागे धावावे लागते. घट्ट धरून ठेवावी तर फक्त दांडा हातात राहातो. छत्री उलटी होते. धुळीचे लोट उधळतात. त्यामुळे डोळ्यांत व नाकातोंडात धूळच धूळ जाते.

अशाच प्रकारच्या सोसाट्याच्या वाऱ्यात त्या गावातील नर्मदा नावाची एक हरिजन मुलगी सापडली. वाऱ्याबरोबर पाऊसही पडू लागला. तिच्या डोळ्यांत माती गेल्यामुळे तिला दिसेनासे झाले. डोळे चोळीत, चोळीत, कपड्याचा बोळा तोंडाने वाफवून डोळ्याला लावीत, लावीत ती उभी होती. काही केल्या तिच्या डोळ्यांत गेलेले कण निघत ना! डोळे खुपत होते, त्यांतून पाणी वहात होते. आजूबाजूचे लोक आपापले घर गाठण्याच्या घाईत होते. जाताना ते त्या मुलीकडे नुसते बघितल्यासारखे करीत. एकही मनुष्य तिला मदत करील तर शपथ! आपण हरिजन असल्यामुळे हे लोक आपल्याला असे वागवतात याचे नर्मदेला अतिशय वाईट वाटले. ती रडू लागली. ती मनातल्या मनात म्हणाली, 'देवा, यावेळी माझी आई असती तर तिने मला मदत केली असती! पण माझ्या लहानपणीच देव तिला आपल्याकडे घेऊन गेला. बाबा तर घरात फारसे नसतातच, मी आणि माझा धाकटा भाऊ कसलं न कसलं काम करून

आपलं पोट भरतो. माझ्या अंगाची व कपडयांची माझी मलाच घाण येते आहे, पण काय करणार ? रोज कपडे बदलणंही शक्य नाही.

ती अशा विचारात असतानाच आमच्या सोमनाथ मास्तरांचे तिच्याकडे लक्ष गेले. त्यांनी तिच्या पाठीवर हात ठेवला. नर्मदा दचकली. कोणीतरी आपला पाठीराखा आहे असे तिला वाटले. मास्तरांनी तिला तिच्या रडण्याचे कारण विचारले. तिच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवीत ते तिला म्हणाले, 'बाळ, रडू नकोस. मी तुझे डोळे बरे करतो. माझं घर जवळच आहे, तिकडे चल.'

असे म्हणून त्यांनी तिला आपल्या घरी नेले. सोमनाथांची पत्नी त्या मुलीची हकिगत ऐकून लगेच तिला मदत करण्यासाठी पुढे सरसावली. मास्तरांनी पाच सहा चुळा भरून आपले तोंड स्वच्छ केले. मग त्यांनी नर्मदेच्या डोळ्यांच्या पापण्या उलट्या करून त्या जिभेच्या टोकाने हळूच पुसून काढल्या. त्यामुळे डोळ्यात शिरलेले मातीचे कण बाहेर आले. पुन्हा चुळा भरून त्यांनी आपले तोंड स्वच्छ केले व पुन्हा दुसऱ्या डोळ्यावरही तोच प्रयोग केला. त्या डोळ्यातला कचराही बाहेर पडला. नर्मदेने डोळे उघडले. मास्तरांनी ते पुन्हा तुरटीच्या पाण्याने स्वच्छ केले. नर्मदेला आराम वाटू लागला. मग सोमनाथांच्या पत्नीने नर्मदेला स्वच्छ आंघोळ घातली. तिने आपल्या स्वतःच्या मुलीचे कपडे तिला घालायला दिले व तिच्या हातावर पाच रुपये ठेवून तिला निरोप दिला. ही पति-पत्नी माणुसकीचा उत्कृष्ट मासला होता.

गावाला ही बातमी लगेच समजली. सर्वांनी सोमनाथ मास्तरांना धन्यवाद दिले व मग त्यांचे नाव खरोखरच एकनाथ महाराज असे पडले. जी सनातनी मंडळी त्यांना कुचेष्टेने एकनाथ महाराज म्हणत त्यांची तोंडे एकदम बंद पडली हे सांगणे नकोच.

मुलांनो, जातीयवादाला मूठमाती द्या. महात्मा गांधी, डॉ० आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व राजार्षी शाहू महाराज या चार महापुरुषांचा आदर्श पुढे ठेवून आपले स्वातंत्र्य सार्थ करण्यासाठी, अस्पृश्यतेचे लांछन

धुवून काढण्यासाठी, सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणि माणुकीचा धर्म आचरण्यासाठी एक गाव-एक पाणवठा झालाच पाहिजे हे आपले सरकारी धोरण लक्षात ठेवून आचरण करा.

* * *

## ८. वक्तृत्व–स्फुरण आणि साधना

* * * * * * * * * * * * * * * *

मुंबईच्या एका उपनगरातील शाळेतली ही गोष्ट. या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे या मुलींच्या शाळेतील दहावी व अकरावी या इयत्तांना मराठी हा विषय शिकविणाऱ्या शिक्षिका उत्कृष्ट वक्त्या होत्या. हा गूण आपल्या विद्यार्थिनींनीही आत्मसात् करावा अशी त्यांची मनापासून इच्छा होती व त्या दृष्टीने त्या वर्गात डिबेटिंगकरिता निरनिराळे विषय देऊन वक्तृत्व हा गूण कसा मिळवावा याचे मार्गदर्शन करीत असत. एक दिवस त्यांनी, 'वक्तृत्व, स्फुरण आणि साधना' हा विषय अकरावीच्या वर्गाला डिबेटिंग-करिता दिला व सांगितले, 'मुलींनो, विषय काहीसा अवघड आहे. तेव्हा तुम्ही याची तयारी मासिके, वर्तमानपत्रे व निरनिराळी पुस्तके वाचून चांगल्या प्रकारे करून ठेवा. ही एक प्रकारची स्पर्धाच आहे असं समजा. मी तीन बक्षिसं देणार आहे. स्पर्धेच्या अटी अशा : भाषण अतिशय प्रभावी व कमीत कमी वेळात संपवलं पाहिजे. जगातील एखाद्या थोर वक्त्याचं उदाहरण देऊन भाषण केलं तरी चालेल.

डिबेटचा दिवस ठरला व तो तास सुरू झाला. बऱ्याच मुलींची भाषणे झाली. बाईंना पुढील भाषणे विशेष आवडली त्यांना बक्षिसे देण्यात आली.

**उषा भोसेकर** — भगिनींनो, आजचा विषय वक्तृत्व—स्फुरण आणि साधना असा आहे. माणसाची पछवीत झालेली सारी सामर्थ्ये जेव्हा एकवटून येतात, शब्दसंपदा जेव्हा रसवंतीच्या रूपाने साकार होऊ पाहाते, त्यावेळी बाहेर पडणारे स्वयंभू स्फुरण हेच खरे वक्तृत्व असते. कोणताही वक्ता स्फूर्तीशिवाय बोलूच शकत नाही. स्फूर्ती हा वक्तृत्वाचा प्राणभूत अंश आहे. वक्ता आणि त्याची स्फूर्ती जरी जन्मसिद्धी असली तरी ती संस्कारित असावी लागते. वाणीवरून माणसाच्या करणीची कल्पना येते. भाषा समृद्ध आणि समर्थ बनविण्यासाठी वक्त्याने भाषेच्या चरणाजवळ बसून अखंड आराधना केली पाहिजे. वक्तृत्वाची आराधना केल्याने वाणीही नादवती, गुणवती, ओघवती आणि अर्थवती होते. इतके बोलून मी आपली रजा घेते.

**प्रमिला गोंधळेकर** — भगिनींनो, आपण सर्वांनी आपली मैत्रीण उषा हिचं भाषण ऐकलं. स्फूर्ती ही वक्तृत्वाला प्राणभूत आहेच. तरीही उत्तम वक्ता होण्यासाठी फार खडतर अशी तपश्चर्याही करावी लागते. मी याचं एक उदाहरणही सांगणार आहे. डेमॉस्थेनीस हा प्राचीन ग्रीक मर्द एक विचारवंत अपंग होता. त्याचे शब्दोच्चार स्पष्ट नव्हते आणि शिवाय

बोलताना काही तरी विक्षिप्त अंगविक्षेप करण्याची त्याला सवय होती. तरीही त्याला जगप्रसिद्ध वक्ता होण्याची महत्त्वाकांक्षा होती व तो तशी स्वप्नंही पाहात होता. त्याचं स्वप्न सत्यसृष्टीत उतरविण्यासाठी त्याने अखंड साधना केली. सागरतीरावर उसळत्या लाटांच्या साक्षीने त्याने आपलं तप सुरू केलं. उच्चारामधील दोष घालवण्यासाठी त्याने तोंडात गारगोट्या धरल्या. दीर्घ श्वसनाची सवय लावून घेतली, आरोह आणि अवरोह यांच्यामध्ये असणारी जी श्वसनक्रिया असते तिच्यावर वक्तयाने आपला ताबा ठेवला पाहिजे हे त्याला माहीत झालं होतं. डेमॉस्थेनीस याने खरोखरच दीर्घ तपश्चर्या केली व मगच तो महान वक्ता झाला. भगिनींनो, तुम्ही सर्वांनी अशीच तपश्चर्या करून वक्तृत्वकला साध्य करून घ्यावी अशी विनंती करून मी आपली रजा घेते.

**निशा पवार** – भगिनींनो, उत्तम वक्ता होण्याकरिता गणिताची जोड लागते. सुसंगत भाषण करता यावं म्हणून अब्राहाम लिंकनने यूक्लिडच्या भूमितीचा अभ्यास केला होता. विचारांच्या ऐरणीवर प्रमेयांची फोड करण्यासाठी माणसाला भूमितीचं ज्ञान असावं लागतं हे लिंकन जाणून होता. लोकमान्य टिळकांचेही गणित आणि संस्कृत हे दोन विषय उत्तम होते. एकदा एका गृहस्थाने यासंबंधाने त्यांना विचारलं असताना तो बुद्धिमंतांचा राजा म्हणाला, 'गणित आणि संस्कृत या दोन्ही विषयांत अचूकतेला स्थान आहे. उत्तम वक्ता होण्यासाठी नुसतं ज्ञान आणि जिज्ञासा उपयोगी पडत नाहीत. विचारांच्या पाठीमागे, उच्चारांच्या पाठीमागे चिंतन उभं असावं लागतं. चांगल्या वक्तयांची भाषणं ऐकून त्यांतील विचार समजावून घेतल्याने आणि त्या वक्तयाच्या चांगल्या गुणांचं अनुकरण केल्याने वक्तृत्व अधिक रेखीव व प्रसादयुक्त होऊ शकतं. भगिनींनो, आपण सर्वांनी उत्तम वक्ते व्हावं अशी त्या परमेश्वरचरणी प्रार्थना करून मी आपली रजा घेते.

शिक्षिकेने या तिन्ही मुलींना धन्यवाद दिले व उत्तम वक्तया होण्याबद्दल आशीर्वाद दिला. एस. एस. सी. बोर्डाच्या त्या वर्षीच्या परीक्षेत या तिन्ही मुलींना मराठी विषयात ऐशी टक्के गूण मिळाले.

# ९. सत्कृत्ये करण्यास शिका

* * * * * * * * * * * * * * * * *

पुणे शहरात गणू शिंदे नावाचा एक महाविद्यालयीन विद्यार्थी होता. मुलगा अतिशय हुषार, साळस व परोपकारी वृत्तीचा होता. एकदा तो बसने कॉलेजमध्ये जात होता. त्याच्या शेजारी एक म्हातारे गृहस्थ बसले होते. त्यांच्या डोळ्यांवर जाड भिंगांचा चष्मा होता. सर्व शरिरावर सुरकुत्या! डोक्यावरील काळ्या टोपी खालूनही त्यांचे पांढरे केस डोकावत होते. पण त्या म्हाताऱ्याच्या तोंडावर एक प्रकारचे तेज दिसत होते. 'किट-किट' आवाज करीत कंडक्टर त्या दोघांजवळ आला तेव्हा गणूने त्याला पैसे देऊन आपले तिकीट काढले. म्हाताऱ्याने आपल्या तिकिटासाठी दहा पैसे पुढे केले व पुणे स्टेशनचे तिकीट मागितले. स्टेशनला जाण्यासाठी वीस पैसे लागतात हे म्हातारबुवांच्या लक्षात आले नाही. कंडक्टरने त्यांच्याजवळ आणखी दहा पैसे मागितले. म्हातारबुवा आपले खिसे चाचपू लागले. पण त्यांच्या खिशात आणखी पैसेच नव्हते. कंडक्टर पैशांसाठी घाई करू लागला. म्हातारबुवांचा चेहरा कावराबावरा झाला. 'मला दहा पैशाचंच तिकीट द्या. वेळ झाली की मला खाली उतरायला सांगा.' असे ते कंडक्टरला सांगू लागले. त्यांना दुसऱ्या कोणाकडे पैसे मागण्याचा धीर होईना. त्यांना स्टेशनवर जावयाचे होते हे त्यांच्या चेहऱ्याच्या चलबिचलीवरून स्पष्टच दिसत होते. आमच्या गणूला हे समजून चुकले होते व त्याने पटकन आपल्या खिशातले दहा पैसे काढून कंडक्टरच्या हातावर ठेवले. म्हाताऱ्याने गणूकडे कृतज्ञतेने पाहून कंडक्टरने दिलेले तिकीट घेतले.

या गोष्टीला काही वर्षे लोटली. गणू शिंदे आता एक बडा माणूस झाला होता—गणपतराव शिंदे. ते असेच एकदा एका लग्न समारंभाला बसने निघाले होते. बसमध्ये शिरल्यावर खूप जागा मोकळ्या असल्यामुळे ते

एका खिडकीशी बसले. कंडक्टर त्यांच्याकडे आल्यावर त्यांनी खिशात हात घातला आणि....आणि तो तसाच बाहेर काढला. लग्नाचा मुहूर्त साधण्याच्या गडबडीत गणपतराव पैशाचे पाकीट घ्यायला विसरले होते. त्यांनी त्या कंडक्टरला वस्तुस्थिती समजावून सांगितली व 'पुढच्या स्टॉपवर उतरतो' असे केविलवाण्या स्वरात म्हणाले. इतक्यात गणपतरावांच्या समोर बसलेल्या माणसाने ही परिस्थिती ओळखून, गणपतराव नको नको म्हणत असतांना सुद्धा कंडक्टरच्या हातावर वीस पैसे ठेवले. कंडक्टरने गणपतरावांना तिकीट दिले.

'हिस्टरी रिपीट्स इटसेल्फ' (इतिहासाची पुनवृत्ती होत असते.) अशी इंग्रजीत एक म्हण आहे. अनेक घटना पुनः पुन्हा घडतात. मुलांनो, एखादा माणूस माणुसकीला जागून अडचणीत पडलेल्याला स्वयंस्फूर्तीने मदत करायला पुढे धावतो तेव्हा त्याचा मोबदला मिळावा अशी त्याची मुळीच अपेक्षा नसते. पण जेव्हा तो स्वतः एखाद्या अडचणीत सापडतो तेव्हा त्याला मदतीचा हात देण्याकरिता कोणी ना कोणी पुढे येतो. मदत करणाऱ्या त्या माणसाच्या संकटकाळी त्यालाही एखादा उपकारकर्ता भेटतो व ज्याला मदत केली जाते तोही कधी तरी कोणाला तरी आधार देतच असतो.

* * *

# १०. दळण्यांचा दयाळू दामू

* * * * * * * * * * * * * * * * * *



संध्याकाळची वेळ. शाळा सुटली. शाळेतील मुलेमुली आपापल्या घराकडे सैरावैरा धावत सुटली. आमचा दामू मात्र अगदी हळूहळू जात होता. रस्त्याने मोटारी-टांगे-सायकली-रिक्षे वगैरे वाहनांची गर्दी होती. त्या रस्त्याच्या एका बाजूला याच गर्दीत एक म्हातारा मनुष्य उभा होता. तो आंधळा असून त्याला रस्ता ओलांडून पलीकडे जावयाचे होते, हे त्याच्या हालचालीवरून स्पष्ट दिसत होते. पण वाहनांच्या गर्दीमुळे तो गांगरून गेला होता. त्या म्हाताऱ्या आंधळ्याकडे कोणाचे लक्ष नव्हते. एवढ्यात दळण्यांच्या दामूचे लक्ष त्या म्हाताऱ्याकडे गेले व तो लगेच त्याच्या जवळ गेला. दामूच्या शाळेतील मित्रांचेही लक्ष त्या म्हाताऱ्याकडे गेले. ते आपापसात बोलत होते, 'त्या म्हाताऱ्याची आपण

जरा गंमत पाहू या.' दामूला हे सहन झाले नाही. तो त्या म्हाताऱ्या आंधळ्याला म्हणाला, 'आजोबा, आपल्याला कुठे जायचं आहे?'

तो म्हातारा हळूच म्हणाला, 'बाळ, मला रस्त्याच्या पलिकडे जायचं आहे. पण दिसत नसल्यामुळे व वाहनांची गर्दी असल्यामुळे मला जाता येत नाही.'

त्यावर दामू म्हणाला, 'आजोबा, तुम्ही काही काळजी करू नका. मी आपल्याला रस्त्याच्या पलिकडेच काय, पण आपल्या घरीसुद्धा नेऊन पोहोचवीन.'

त्यावर तो म्हातारा म्हणाला, 'बाळ, तुझ्या या बोलण्याने मला फार बरं वाटलं. मला तू फक्त रस्त्याच्या पलीकडे घेऊन चल—तिथून मी एकटा माझ्या घरी जाऊ शकेन.'

दामूने म्हाताऱ्याचा हात धरला व त्याला रस्त्याच्या पलिकडे सुखरूपपणे पोहोचविले. नंतर तो आपल्या मित्रमंडळीत आला. त्याचे मित्र त्याची टिंगल करू लागले. दामू त्यांना शांतपणे म्हणाला, 'मित्रांनो, मला असं चिडवू नका. उद्या तुमचे व माझे वडील असेच म्हातारे झाले व असेच रस्त्यात एकटे सापडले तर त्यांनाही कोणीतरी मदत करील.'

मुलांनो, सहानुभूतीचे व माणुसकीचे दर्शन घडविणारी, अडचणीत सापडलेल्यांची सुटका करणारी व समर्थ माणसाला सत्कृत्य केल्याच्या सात्त्विक आनंदाचा लाभ करून देणारी ही एक सत्कृत्याची साखळी आहे. आपण एका हाताने दिले तर आपल्या दुसऱ्या हाताला कुठून तरी आपोआप मिळते. म्हणून स्वतःच्या स्वार्थाकरिता तरी सत्कृत्य करण्याची संधी सोडू नये, हेच या गोष्टीवरून शिकावयाचे.

* * *

# ११. चातुर्य, चिकाटी व सचोटी

* * * * * * * * * * * * * * * * * *

गुलाबचंद नावाचे एक फार मोठे उद्योगपती गुजराथेत राहात असत. स्वभावाने साल्स, उदार व गरिबांना त्यांची हुषारी ओळखून मदत करणाऱ्या या गृहस्थाच्या आयुष्यातील एक सत्यकथा :

बारातेरा वर्षांच्या एका मुलाने गुलाबचंदांपुढे हात पसरून याचना केली, 'महाराज, गरिबाला दहापाच पैसे देता का ?'

भिकारी पोरगा ! त्याचे वर्णन काय करायचे ? पोट पाठीला चिकटलेले. चेहरा केविलवाणा व आवाज व्याकुलवाणा ! पण असे असूनही त्या त्या पोराच्या डोळ्यांतील चमक मात्र काही विशेष दिसत होती. ती चमक गुलाबचंदांच्या नजरेत भरली. एकवार त्यांनी त्या मुलाकडे निरखून पाहिले व त्याला म्हणाले, "काय रे मुला, तू जन्मतः भिकारी दिसत नाहीस. मग ही भिक्षा मागण्याची अवदसा तुला का आठवली ? काही

शिक्षण घे, काम कर व पोटाला मिळवून खा.' तो मुलगा मोठा धीर करून म्हणाला, 'साहेब, आपलं म्हणणं खरं आहे. पण आईबापाविना पोरक्या झालेल्या माझ्यासारख्या मुलानं शिक्षण कसं घ्यावं? या महागाईच्या दिवसांत पोटाला मिळण्याचीच पंचाईत, मग पुस्तकांना नि फीला पैसे कुठून आणणार? शिवाय माझी ना कुणाशी ओळख ना देख! मला कसला धंदा मिळणार? मला कोणी थोडा जरी आधार दिला तरी मी नक्कीच काही तरी करून दाखवीन. पण माझ्याजवळ एक पैसा सुद्धा नाही. तेव्हा मी भीक मागायची नाही तर काय करायचं. सांगा महाराज, तुम्हीच सांगा.'

त्यावर गुलाबचंद म्हणाले, 'दहा पैसे दिले तर काही करून दाखवशील का? तसं असेल तर मी तुला दहा पैशांऐवजी एक रुपया देतो– दाखव पाहू तुझं कर्तृत्व–'

त्या मुलाने तो रुपया हातात घेतला व तो धीटपणाने म्हणाला, 'महाराज, मी आपला फार आभारी आहे. माझी आपल्याला एक लहानशी विनंती आहे. या आपल्या बागेतली थोडीशी फुलं मला आजच्या दिवस मोफत द्या. उद्यापासून मी त्या फुलांबद्दल पैसे देत जाईन. आजसुद्धा पैसे हवे असल्यास या रुपयातले पन्नास पैसे कापून घ्या.

गुलाबरावांचा चेहरा रुबाबदार, नजर भेदक व आवाज करडा होता. तरी पण त्या मुलाचे हे भाषण ऐकून त्यांना मनातून त्याचे कौतुक वाटले. पण ते उघड न दाखविता ते करड्या स्वरात म्हणाले, 'आजचा दिवस फुलं फुकट घेऊन जा. पण उद्यापासून मात्र फुलांना पैसे पडतील.' त्यावर तो मुलगा म्हणाला, 'मोठे उपकार झाले महाराज!'

असे म्हणून त्याने एका टोपलीत मावतील इतकी फुले घेतली व तो जवळच असलेल्या एका मंदिराच्या दरवाजाजवळ जाऊन ती फुले विकू मंदिरात जाणाऱ्या भाविक लोकांनी त्याच्या जवळून थोडी थोडी फुले घेतली. त्याची सगळी फुले लौकरच विकली गेली. विक्री करून आलेल्या पैशांतून त्याने अर्धे पैसे खर्च करून आपली भूक भागवली व अर्धे पैसे दुसऱ्या दिवशी फुले विकत घेण्याकरिता बाजूला ठेवले.

दुसऱ्या दिवशी तो मुलगा गुलाबचंदांच्या बागेशी आला. त्याने गुलाबचंदाला नमस्कार केला. गुलाबचंद त्याच्याकडे पाहून हसले व म्हणाले, 'काय रे, तू फुलं न्यायला आलास का? फुलं मिळतील पण ती तुला आज विकत घ्यावी लागतील.

त्या मुलाने गुलाबचंदांना आदल्या दिवशीची सर्व हकिगत सांगितली व फुले विकत घेण्यासाठी पैसे पुढे केले. गुलाबचंदांना त्याचे कौतुक वाटले, त्यांनी त्याला रोज फुले घेऊन जायची परवानगी दिली. त्याचप्रमाणे त्या मुलाचा रोजगार सुरू झाला. दिवसे दिवस त्याची कमाई वाढू लागली. काही दिवसांनी त्या गावात एक जत्रा आली. त्यावेळी त्या मुलाने फुलांबरोबर इतर पूजासाहित्यही विक्रीसाठी ठेवले. त्यात त्याला चांगलाच फायदा झाला. तो मुलगा त्यानंतर नवे नवे उद्योग करू लागला. त्याने एक लहानशी जागा भाड्याने घेऊन एक दुकान काढले व एक छोटासा समारंभही आयोजित केला. सदर समारंभाचे सन्माननीय पाहुणे म्हणून गुलाबचंदांना निमंत्रित केले. समारंभात त्यांचे आभार मानले व कृतज्ञता व्यक्त केली. एके काळी भीक मागणारा मुलगा आपल्या चातुर्याने, चिकाटीने व सचोटीने एक उद्योगपती बनला.

मुलांनो, या गोष्टीतील मुलाप्रमाणे चातुर्य, चिकाटी व सचोटी आपल्या अंगी बाणविण्याचा प्रयत्न करा. जीवनात सफल व्हा!

* * *

# १२. स्वातंत्र्याची गोडी न्यारी

* * * * * * * * * * * * * * * * * *



एका गावात मोहनसिंग नावाचा एक श्रीमंत व्यापारी राहात होता. तो अतिशय लोकप्रिय होता. लोकांना तो सढळ हाताने मदत करीत असे. त्याला पोपट बाळगण्याची मोठी हौस होती. एक दिवस त्याच्या दुकानात एक पोपटवाला आला व म्हणाला, 'शेटजी, माझ्याजवळ एक फार चांगला पोपट आहे. बोलका पोपट आहे, बोलका!'

शेटजींनी पोपटाची किंमत विचारली व पाच रुपयांला सौदा ठरला. पाच रुपये देऊन शेटजींनी पोपट विकत घेतला व तो पोपट ठेवण्याकरिता एक रुपयाचा एक पिंजराही विकत घेतला. पोपटाचा पिंजरा घरात लटकत राहिला. पोपटाचे नाव त्यांनी गणराया असे ठेवले. शेटजींचे त्या

पोपटावर अतिशय प्रेम बसले. पोपट बोलका असल्यामुळे शेटजींची करमणूकही होऊ लागली. शेटजी दररोज त्याला निरनिराळी फळे, डाळ, मिरच्या वगैरे खायला देत असत. त्या पोपटासाठी एक सुंदरसा नवीन पिंजरा तयार करण्यात आला. पोपटाला एवढे सुख मिळत असून सुद्धा तो पोपट मात्र अंग धरीत नव्हता. त्याने बोलणेही सोडून दिले. फक्त शेटजींबरोबर तो थोडेथोडे बोले. तो पोपट निसर्गाकडे पाहात असे व त्याला आपले बांधव भराऱ्या मारताना दिसले की तो कावराबावरा होत असे. तो मनातल्या मनात म्हणे, 'मी जर स्वतंत्र असतो तर अशाच भराऱ्या मारल्या असत्या. या झाडावरून त्या झाडावर एकसारखा उडत राहिलो असतो.'

त्या पोपटाने आपल्या पिंजऱ्यातून उडून जाण्याचे खूप प्रयत्न केले पण व्यर्थ. त्याची शक्ती अपुरी पडत असे. जीव लहान होता पण स्वातंत्र्याच्या विचाराने तो अधिकच खंगत जात होता. तो व्यापारी मनात म्हणे, 'मी या पोपटाला दररोज चांगलं चांगलं खायला देतो आणि हा अंग न धरता वाळतच चाललेला आहे.'

मग त्याने त्या पोपटाला एका पशुवैद्याचे औषध सुरू केले. पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. पोपटाच्या पारतंत्र्याची जाणीव शेटजींना नव्हती व पशुवैद्यालाही ती झालेली नव्हती.

शेटजी माल आणण्यासाठी आठवड्यातून एकदा गावाशेजारच्या शहरात जात असत. जातांना ते आपल्या बायकोला, मुलांना त्यांच्या आवडीच्या, त्यांना पाहिजे असणाऱ्या वस्तूंची यादी बरोबर नेत असत. आणि येतांना त्या वस्तू घेऊन येत असत. त्यांनी एकदा त्या पोपटालाही विचारले, 'गणराया, तुला काय हवं असेल ते सांग.'

गणराया म्हणाला, 'मला काही नको. मला फक्त एक निरोप पोहोचवायचाय.'

शेटजींनी विचारले, 'काय निरोप व कोणाला सांगायचा आहे?'

गणराया म्हणाला, 'शेटजी, तुम्ही शहरात जातांना एक जंगल लागतं. त्या जंगलात एक पेरूचं झाड आहे. त्या झाडावर माझे नातेवाईक राहतात. त्यांना सांगा की तुमचा एक नातेवाईक माझ्या पिंजऱ्यात आहे.'

शेटजी म्हणाले, 'ठीक आहे. तुझा निरोप आठवणीनं सांगेन.'

शेटजी शहरात गेले. हवा तो माल खरेदी करून परत निघाले. वाटेत त्यांना ते पेरूचं झाड लागले. त्या झाडावर त्यांना पोपटांची चाहूल लागली. ते त्या पोपटांना म्हणाले, 'पोपट बंधूंनो, तुमचा एक नातेवाईक माझ्या पिंजऱ्यात आहे.'

शेटजींचे हे शब्द ऐकताच त्यांतील एक पोपट धाडकन खाली पडला. शेटजींना काही बोध होईना. त्या घटनेवर विचार करीत करीत ते घरी आले. आणलेला माल त्यांनी खाली ठेवला. इतक्यात त्यांना 'शेटजी' अशी हाक ऐकू आली. त्यांनी वळून मागे पाहिले तर गणराया बोलला होता. आज तो पोपट स्वत:हून बोलल्यामुळे शेटजींना मनापासून बरे वाटले. शेटजींनी पोपटाला विचारले, 'काय गणराया, कशाला हाक मारलीस?'

पोपटाने विचारले, 'माझा निरोप माझ्या बांधवांना सांगितलात का?'

त्यावर शेटजी म्हणाले, 'गणराया, तुझा निरोप सांगितला व तो ऐकून एक पोपट धाडकन खाली पडला.'

हे ऐकून तो पोपट म्हणाला, 'माझा एक बांधव खाली पडला?' असे विचारून गणराया पिंजऱ्यात आडवा पडला.

व्यापाऱ्याला वाटले, तो त्या झाडावरचा पोपट आपल्या या पोपटाचा कोणीतरी नातेवाईक असला पाहिजे. म्हणून आपल्या या पोपटाला असा धक्का बसला असावा.

परंतु बराच वेळ झाला तरी गणराया उठून बसेना. शेटजींना वाटले की आपला पोपट मरून पडला! त्यांनी त्या पोपटाला बाहेर काढले व खाली ठेवले. तेवढ्यात तो पोपट उडून गेला व दारावर बसून शेटजींना

म्हणाला, 'शेटजी, तुमचा गैरसमज झाला. मला त्या पेरूच्या झाडावरील पोपटाने मेल्याचं सोंग करण्यास सांगून पळण्याचा मार्ग सांगितला. शेटजी, जे काम मी शक्तीने करू शकलो नाही ते मी माझ्या मित्रामुळे युक्तीने करू शकलो. मी आता स्वतंत्र झालो. शेटजी, स्वातंत्र्याची भाजीभाकरी–चटणीभाकरी सुद्धा, पारतंत्र्यातील मिठाईपेक्षा लाखपटीने श्रेष्ठ असते. बरंय् शेटजी, मी आता जातो—' असे म्हणून तो पोपट उडून गेला. शेटजी आ वासून पाहात राहिले. आपला पोपट का खंगत होता हे शेटजींना कळले.

* * *

# १३. पशुवैद्याचे बुद्धिचातुर्य

* * * * * * * * * * * * * * * * *

अश्विनीकुमार नावाचा एक राजा होता. या राजाला घोड्यांचे अतिशय वेड होते. त्याने आपल्या पदरी उत्तमोत्तम घोडे पाळले होते. त्याची खूप मोठी घोडशाळा होती. त्या घोड्यांना शिकविण्याकरिता उत्तम अश्वशिक्षक व घोड्यांच्या रोगांवर उपचार करण्यासाठी अनेक पशुवैद्य त्याने आपल्या नोकरीत ठेवले होते.

शेजारच्या राजाने अश्विनीकुमाराचे हे वेड लक्षात घेऊन त्या राजाच्या वाढदिवशी त्याला एक उमदा घोडा भेट म्हणून दिला. अश्विनीकुमाराला तो घोडा फारच आवडला. तो घोडा फारच लहान असल्याने त्याला एका अश्वशिक्षकाकडे उत्तम शिक्षण देण्याकरिता सुपूर्द केला. त्या

अश्वशिक्षकाने त्या तट्टाला उत्तम शिक्षण दिले. त्यानंतर ते राजाच्या अश्वशाळेत ठेवण्यात आले व राजाला त्याप्रमाणे कळविण्यात आले. कामाच्या धांदलीत राजाला तो घोडा पाहाण्यास सवड झाली नाही. काही दिवसांनी राजा तो आपला नवा घोडा पाहाण्यास गेला. तो घोडा लंगडत असल्याचे राजाच्या लक्षात आले. पशुवैद्याला बोलावण्यात येऊन त्या घोड्याची पुन्हा परीक्षा करण्यात आली. पशुवैद्याने तो घोडा लंगडत असल्याचे मान्य केले व आठ दिवस त्याला आपल्या दवाखान्यात ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या घोड्याला त्याच्या दवाखान्यात पाठवण्यात आले. त्या पशुवैद्याने त्या घोड्याचे नाल बदलून नवीन नाल बसवून घेतले. पायात काटा वगैरे रुतलेला आहे की काय याची तपासणी केली. त्या पायाला तेल वगैरे चोळून त्याचे मालिश केले. इतके सगळे करूनही घोड्याचे लंगडण्याचे थांबेना. हे वर्तमान राजेसाहेबांना कळले. ते त्या पशुवैद्यावर संतापले. तो पशुवैद्य मोठा धोरणी व हुशार होता. त्याने राजाला सांगितले की, 'राजेसाहेब, ज्या अश्वशिक्षकाने या घोड्याला शिकवून तयार केले त्याची व माझी आपण गाठ घालून द्या. मग मी या घोड्याचं बरोबर निदान करतो.'

राजाने त्या अश्वशिक्षकाला बोलावून घेतले.

एक दिवस सदर पशुवैद्य आपल्या दवाखान्यात काम करीत असताना त्याला तो अश्वशिक्षक आपल्याकडे हळू हळू येताना दिसला. पशुवैद्याने आपल्या हातातले काम बाजूला सारून त्या अश्वशिक्षकाकडे दृष्टी रोखली. पशुवैद्याचे व त्या अश्वशिक्षकाचे औपचारिक संभाषण झाले व तो अश्वशिक्षक निघून गेला.

त्यानंतर त्या पशुवैद्याने राजाची भेट घेतली व म्हणाला, 'महाराज, या घोड्याला दुसऱ्या अश्वशिक्षकाकडे काही दिवस शिकायला ठेवा. घोडा अगदी उत्तम होईल.'

राजाने त्या घोड्याला दुसऱ्या अश्वशिक्षकाच्या स्वाधीन केले. त्या शिक्षकाने त्या घोड्याला शिकवायला सुरुवात केली. पशुवैद्याचा यात काय हेतू होता ते मात्र राजेसाहेबांच्या लक्षात आले नाही.

हा नवा अश्वशिक्षक त्या घोड्याला शिकवताना तो पशुवैद्य स्वतः हजर राहात असे. तो घोडा थोड्याच दिवसांत उत्तम रीतीने चालू लागला. त्याचे लंगडणे अजिबात बंद झाले. राजाच्या कानावर ही बातमी आलीच. राजा घोडा पाहायला आला. घोडा अगदी ऐटीत चालू लागला. राजा एकदम खूष झाला. औषधपाणी न देता घोड्याचे लंगडणे बंद झाले! राजाने मोठ्या आनंदाने व कौतुकाने त्यासंबंधाने पशुवैद्याला विचारले. भोवतालचे सर्व लोक त्या पशुवैद्याकडे कुतूहलाने पाहू लागले. पशुवैद्य नम्रतेने म्हणाला, 'राजेसाहेब, पूर्वीचा अश्वशिक्षक स्वतः लंगडत असल्यामुळे त्याला सरळ चालता येत नसे. पण या घोड्याला असे वाटायचे की, हा आपण कसं चालावं याचा धडाच देत आहे! म्हणून घोड्यानेही आपल्या शिक्षकाप्रमाणे लंगडत चालायला सुरुवात केली! दुसरा शिक्षक लंगडा नव्हता. तो सरळ चालत होता. त्याचे पाहून घोडाही सरळ चालू लागला. घोडा हा अनुकरण करणारा हुशार प्राणी आहे.' त्याचे हे बोलणे ऐकून राजा एकदम खूष झाला व त्याने त्या वैद्याच्या बुद्धिचातुर्याचे कौतुक केले. त्या पशुवैद्याला त्याने बढती दिली.

मुलांनो, या गोष्टीवरून तुमच्या सहज लक्षात येईल की चांगल्याचे अनुकरण का करावे? सज्जनांची संगत का करावी. वाईट आणि दुर्जन यांपासून नेहमी दूर राहा.

* * *

# १४. मुंगीपासून धडा शिकला

* * * * * * * * * * * * * * * * *

श्रीक्षेत्र वाई या गावी एका म्युनिसिपल शाळेत मी शिकत असतानाची गोष्ट. आमचे पत्की नावाचे मास्तर आम्हा मुलांवर फार प्रेम करीत असत. ते हुशार मुलांचे कौतुक करीत तर मठ्ठ मुलांना कानपिचक्या देऊन त्यांना हुषार बनविण्याचा प्रयत्न करीत. आमच्या वर्गात गोविंदा देशपांडे नावाचा अतिशय कामचुकार व मठ्ठ मुलगा होता. तो अभ्यास करीत नसे. दरवर्षी तो ढकलत ढकलत सातवीपर्यंत आला होता. सातवीची परीक्षा ही बोर्डाची परीक्षा असल्यामुळे पत्की मास्तरांना गोविंदाची अतिशय काळजी वाटू लागली. एक दिवस काय झाले? शेवटच्या तासाला मास्तरांनी आम्हाला एक नवीनच दहा कडवी असलेली कविता शिकविली व ती पाठ करण्यासाठी आठ दिवसांचा अवधी दिला. गोविंदाला मास्तरांनी खूप दम भरला, त्याची भरवर्गात निंदा केली व ती कविता पाठ न केल्यास शिक्षा करण्याचे भयही दाखविले. गोविंदाला फार वाईट वाटले आणि त्या मास्तरांचा रागही आला. त्याच्या डोक्यात विचारांचे थैमान सुरू झाले. तो एका बागेत जाऊन बसला. तेथे विचार करीत बसलेला असताना त्याची नजर एका मुंगीकडे गेली. तो त्या मुंगीकडे एकटक पाहू लागला. ती मुंगी साखरेचा एक खडा फोडून त्याचे लहान लहान कण वाहून नेत होती. तिची गती मात्र अतिशय मंद होती. ती सारख्या येरझारा घालीत होती. शेवटी तिने सर्व साखर आपल्या बिळात नेली.

हे पाहून आमचा गोविंदा दचकला. तो भानावर आला. एकदम त्याला ज्ञान प्राप्त झाल्यासारखे वाटू लागले. त्याच्या मनात विचार आला की, या लहानशा मुंगीला एवढा मोठा साखरेचा खडा आपल्या बिळात नेण्याची युक्ती सुचली मग मला तरी परीक्षेचा अभ्यास करणे कठीण का वाटावे?

म. रा. म. ग्रं., ग्रंथालय शाखा.
२६०
विषय फेडोर क्र. २३९

# १५. विद्या विनयेन शोभते

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

फार पूर्वी काशीक्षेत्री सूर्यवान नावाचा एक राजा होऊन गेला. तो राजा सूर्यासारखाच तेजस्वी, गुणी व विद्वान पंडितांचा मोठा चहाता होता. त्याने आपल्या पदरी विष्णुशास्त्री व शंकरशास्त्री असे दोन मोठे विद्वान पंडित ठेवले होते. राज्यकारभारातही तो त्यांचा सल्ला घेत असे. ते दोघे विद्वान होते. पण तसेच अतिशय अहंकारीही होते. ते परस्परांचाही मत्सर करीत असत. राजाला कोणीतरी हे सांगितले तेव्हा त्याने आपली त्याबद्दल खात्री करून घेण्याकरिता एक योजना आखली.

एकदा विष्णुशास्त्री काही कामानिमित्त बाहेरगावी गेले असताना, राजाने शंकरशास्त्र्यांना जवळ बोलावून घेतले व त्यांना विचारले, 'का हो शंकरशास्त्री, विष्णुशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दल आपलं काय मत आहे? अगदी खरं सांगा.'—

शंकरशास्त्री म्हणाले, 'राजेसाहेब, तुम्ही विचारताच म्हणून सांगतो. विष्णुशास्त्री म्हणजे नुसता म्हशीचा प्राणनाथ म्हणा किंवा बैलोबा म्हणा —असा आहे. मी हे केव्हा तरी तुम्हाला सांगणारच होतो'—राजा काय ते समजला.

काही दिवसांनी शंकरशास्त्री बाहेरगावी गेले. तेव्हा राजाने विष्णुशास्त्र्यांना बोलावून घेतले व त्यांनाही तसाच प्रश्न विचारला. 'काय हो विष्णुशास्त्री, शंकरशास्त्र्यांबद्दल आपलं काय मत आहे? अगदी न घाबरता काय असेल ते स्पष्ट सांगा.'

विष्णुशास्त्री हसले व म्हणाले, 'महाराज, या बाबतीत न बोलणं बरं. यात काय ते समजा.'

राजा म्हणाला, 'ते काही नाही. तुम्हाला प्रश्नाचं उत्तर दिलंच पाहिजे.'

गोविंदाने आपल्या मनाशी असा विचार करून त्याने त्या मुंगीच्या गतीने आपला अभ्यास करण्याचे ठरविले. मास्तरांनी दिलेली कविता त्याने चारपाच दिवसांतच पाठ केली. त्यानंतर दोन दिवस तिची उजळणी केली व कविता अगदी पक्की पाठ केली. काही मुलांना वाटत होते की, त्यांना ती कविता शेवटच्या दिवशी सुद्धा पाठ होईल व त्यांनी त्याप्रमाणेच केले. पण उजळणी न मिळाल्यामुळे त्या मुलांची कविता पक्की पाठ झाली नाही.

ठरलेल्या दिवशी ती कविता म्हणून दाखवायला शिक्षकांनी पहिल्याने मलाच सांगितले. कारण वर्गातला मी एक बऱ्यापैकी विद्यार्थी गणला जात होतो. कवितेची उजळणी न केल्यामुळे मला ती कविता बरोबर म्हणता आली नाही. बऱ्याच मुलांची माझ्यासारखीच स्थिती झाली. पक्की मास्तरांनी कविता कोण बरोबर म्हणून दाखवतो असे विचारले. गोविंदाने ताबडतोब हात वर केला व 'मी कविता म्हणून दाखवतो,' असे म्हटले.

मास्तरांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी गोविंदाला कविता म्हणण्यास सांगितले. गोविंदाने ती सबंध कविता बरोबर म्हणून दाखविली. सर्व मुले व पक्की मास्तरसुद्धा गोविंदाकडे आश्चर्याने पाहात राहिले, काही मुलांनी तर टाळ्यासुद्धा वाजविल्या. मास्तरांनी गोविंदाला विचारल्यावर त्याने त्या मुंगीची हकिगत सांगितली. आपण मुंगीपासून धडा घेतला हे त्याने कबूल केले. सर्वांनी त्याचे अभिनंदन केले. पुढे गोविंदा बोर्डाची परीक्षाही उत्तम तऱ्हेने पास झाला.

मुलांनो, ही गोष्ट वाचून झाल्यावर तुमच्या ध्यानात आले असेल की, हळुहळू का होईना, नेटाने प्रयत्न केल्यास त्याचे फळ चांगलेच मिळते.

* * *

म. प्र. रा. ठा., ग्रंथालय शाखा.
२६०
विषय फिक्शन क्र. २३९

# १५. विद्या विनयेन शोभते

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

फार पूर्वी काशीक्षेत्री सूर्यवान नावाचा एक राजा होऊन गेला. तो राजा सूर्यासारखाच तेजस्वी, गुणी व विद्वान पंडितांचा मोठा चहाता होता. त्याने आपल्या पदरी विष्णुशास्त्री व शंकरशास्त्री असे दोन मोठे विद्वान पंडित ठेवले होते. राज्यकारभारातही तो त्यांचा सल्ला घेत असे. ते दोघे विद्वान होते. पण तसेच अतिशय अहंकारीही होते. ते परस्परांचाही मत्सर करीत असत. राजाला कोणीतरी हे सांगितले तेव्हा त्याने आपली त्याबद्दल खात्री करून घेण्याकरिता एक योजना आखली.

एकदा विष्णुशास्त्री काही कामानिमित्त बाहेरगावी गेले असताना, राजाने शंकरशास्त्र्यांना जवळ बोलावून घेतले व त्यांना विचारले, 'का हो शंकरशास्त्री, विष्णुशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दल आपलं काय मत आहे? अगदी खरं सांगा.'—

शंकरशास्त्री म्हणाले, 'राजेसाहेब, तुम्ही विचारताच म्हणून सांगतो. विष्णुशास्त्री म्हणजे नुसता म्हशीचा प्राणनाथ म्हणा किंवा बैलोबा म्हणा —असा आहे. मी हे केव्हा तरी तुम्हाला सांगणारच होतो'—राजा काय ते समजला.

काही दिवसांनी शंकरशास्त्री बाहेरगावी गेले. तेव्हा राजाने विष्णुशास्त्र्यांना बोलावून घेतले व त्यांनाही तसाच प्रश्न विचारला. 'काय हो विष्णुशास्त्री, शंकरशास्त्र्यांबद्दल आपलं काय मत आहे? अगदी न घाबरता काय असेल ते स्पष्ट सांगा.'

विष्णुशास्त्री हसले व म्हणाले, 'महाराज, या बाबतीत न बोलणं बरं. यात काय ते समजा.'

राजा म्हणाला, 'ते काही नाही. तुम्हाला प्रश्नाचं उत्तर दिलंच पाहिजे.'

गोविंदाने आपल्या मनाशी असा विचार करून त्याने त्या मुंगीच्या गतीने आपला अभ्यास करण्याचे ठरविले. मास्तरांनी दिलेली कविता त्याने चारपाच दिवसांतच पाठ केली. त्यानंतर दोन दिवस तिची उजळणी केली व कविता अगदी पक्की पाठ केली. काही मुलांना वाटत होते की, त्यांना ती कविता शेवटच्या दिवशी सुद्धा पाठ होईल व त्यांनी त्याप्रमाणेच केले. पण उजळणी न मिळाल्यामुळे त्या मुलांची कविता पक्की पाठ झाली नाही.

ठरलेल्या दिवशी ती कविता म्हणून दाखवायला शिक्षकांनी पहिल्याने मलाच सांगितले. कारण वर्गातला मी एक बऱ्यापैकी विद्यार्थी गणला जात होतो. कवितेची उजळणी न केल्यामुळे मला ती कविता बरोबर म्हणता आली नाही. बऱ्याच मुलांची माझ्यासारखीच स्थिती झाली. पक्की मास्तरांनी कविता कोण बरोबर म्हणून दाखवतो असे विचारले. गोविंदाने ताबडतोब हात वर केला व 'मी कविता म्हणून दाखवतो,' असे म्हटले.

मास्तरांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी गोविंदाला कविता म्हणण्यास सांगितले. गोविंदाने ती सबंध कविता बरोबर म्हणून दाखविली. सर्व मुले व पक्की मास्तरसुद्धा गोविंदाकडे आश्चर्याने पाहात राहिले, काही मुलांनी तर टाळ्यासुद्धा वाजविल्या. मास्तरांनी गोविंदाला विचारल्यावर त्याने त्या मुंगीची हकिगत सांगितली. आपण मुंगीपासून धडा घेतला हे त्याने कबूल केले. सर्वांनी त्याचे अभिनंदन केले. पुढे गोविंदा बोर्डाची परीक्षाही उत्तम तऱ्हेने पास झाला.

मुलांनो, ही गोष्ट वाचून झाल्यावर तुमच्या ध्यानात आले असेल की, हळुहळू का होईना, नेटाने प्रयत्न केल्यास त्याचे फळ चांगलेच मिळते.

* * *

# १५. विद्या विनयेन शोभते

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

२६०
विषय १८२।२ क्र. २३९

फार पूर्वी काशीक्षेत्री सूर्यवान नावाचा एक राजा होऊन गेला. तो राजा सूर्यासारखाच तेजस्वी, गुणी व विद्वान पंडितांचा मोठा चहाता होता. त्याने आपल्या पदरी विष्णुशास्त्री व शंकरशास्त्री असे दोन मोठे विद्वान पंडित ठेवले होते. राज्यकारभारातही तो त्यांचा सल्ला घेत असे. ते दोघे विद्वान होते. पण तसेच अतिशय अहंकारीही होते. ते परस्परांचाही मत्सर करीत असत. राजाला कोणीतरी हे सांगितले तेव्हा त्याने आपली त्याबद्दल खात्री करून घेण्याकरिता एक योजना आखली.

एकदा विष्णुशास्त्री काही कामानिमित्त बाहेरगावी गेले असताना, राजाने शंकरशास्त्र्यांना जवळ बोलावून घेतले व त्यांना विचारले, 'का हो शंकरशास्त्री, विष्णुशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दल आपलं काय मत आहे? अगदी खरं सांगा.'—

शंकरशास्त्री म्हणाले, 'राजेसाहेब, तुम्ही विचारताच म्हणून सांगतो. विष्णुशास्त्री म्हणजे नुसता म्हशीचा प्राणनाथ म्हणा किंवा बैलोबा म्हणा —असा आहे. मी हे केव्हा तरी तुम्हाला सांगणारच होतो'—राजा काय ते समजला.

काही दिवसांनी शंकरशास्त्री बाहेरगावी गेले. तेव्हा राजाने विष्णुशास्त्र्यांना बोलावून घेतले व त्यांनाही तसाच प्रश्न विचारला. 'काय हो विष्णुशास्त्री, शंकरशास्त्र्यांबद्दल आपलं काय मत आहे? अगदी न घाबरता काय असेल ते स्पष्ट सांगा.'

विष्णुशास्त्री हसले व म्हणाले, 'महाराज, या बाबतीत न बोलणं बरं. यात काय ते समजा.'

राजा म्हणाला, 'ते काही नाही. तुम्हाला प्रश्नाचं उत्तर दिलंच पाहिजे.'

त्यावर विष्णुशास्त्री म्हणाले, 'महाराज, शंकरशास्त्री म्हणजे पुण्याच्या टांगेवाल्याचा घोडा–रेसचा सुद्धा नाही.' राजा काय समजायचे ते समजला.

त्यानंतर काही दिवस गेले. एके दिवशी राजाने बाहेरच्या दोघा पंडितांना भोजनाला बोलावले. पाने वाढली. राजेसाहेबांच्या जोडीला काही मित्रमंडळी व ते दोन पंडित बसले होते. दरबारातल्या त्या दोन पंडितांची पाने दुसऱ्या पंक्तीत वाढली होती. विष्णुशास्त्र्यांच्या ताटात फोडलेले हरभरे वाढले होते व शंकरशास्त्र्यांच्या पानात हिरव्या गवताचे लहान तुकडे, फोडलेली पेंड व भुसा वाढला होता. राजाच्या व मित्रमंडळीच्या ताटांत मिष्टान्ने होती. राजाने सर्वांना भोजनास सुरुवात करण्यास सुचविले. पण शंकरशास्त्री व विष्णुशास्त्री एकमेकांकडे पाहातच राहिले. मनातून ते अगदी खजील झाले होते. पण राजापुढे काय बोलणार?

दोघांनाही आपापली चूक कळून आली. कारण एकाने दुसऱ्याला बैल व दुसऱ्याने पहिल्याला टांग्याचा घोडा म्हणून हिणवले होते. दोघेही आपापल्या पाटावर उभे राहिले व हात जोडून त्यांनी राजाची क्षमा मागितली. त्यांनी पुन्हा अशी चूक न करण्याची शपथ घेतली. एखाद्या पंडिताची त्याच्या मागे निंदा करणे ही पण स्वतः पढतमूर्ख असल्याची कबुली देणे होय हे त्या दोघांनाही पटले.

मुलांनो, अहंकार व मत्सर हे विद्वत्तेचे फार मोठे शत्रू आहेत, हेच या गोष्टीवरून सिद्ध होते.

**विद्या विनयेन शोभते—विद्वान् सर्वत्र पूज्यते।**

* * *

# १६. अतिलोभाचे फळ

* * * * * * * * * * * * * * * * *

पुष्पकनगरीच्या राज्यात दुर्जनसिंग नावाचा एक राजा होता. नावाप्रमाणेच तो अतिशय दुष्ट, चैनी आणि विलासी होता. प्रजेवर वाटेल तसे कर बसवून, त्यांच्याकडून पैसे उकळून, तो आपली चैन भागवी व प्रजेवर वाटेल ते जुल्म करी. त्यामुळे त्याची प्रजा नेहमी असंतुष्ट असे.

त्या राज्यात एक कोळी राहात असे. दररोज तो समुद्रातील मासे पकडून आपली उपजीविका करीत असे. असाच एक दिवस तो मासे पकडण्यासाठी गेला असताना, पाण्यात अनेकदा जाळे टाकूनही त्याला एकसुद्धा मासा मिळाला नाही. परंतु निराश न होता अखेरचा प्रयत्न म्हणून त्याने पुन्हा एकदा आपले जाळे पाण्यात टाकले. या वेळी आपले जाळे ओढताना ते त्याला जड लागले. आनंदाने व आतुरतेने त्याने जाळे वर

काढले. जाळ्याकडे पाहून तो आश्चर्यचकितच झाला. जाळ्यात एक सोनेरी रंगाचा, हिऱ्यासारख्या डोळ्यांचा व अंगावर चांदीसारखे ठिपके असलेला असा एक गुबगुबीत मासा दिसला. कोळी आनंदित झाला. इतक्यात तो मासा मनुष्यवाणीने म्हणाला, 'हे पाहा कोळीदादा, तू जर मला आज विकलंस तर त्या पैशांतून तुझा आजचा दिवस निभावेल. पण जर तू मला सोडलंस तर मी तुला अशी एक वस्तू देईन की, ती तुला जन्माची सुखी करील.'

कोळ्याला त्या माशाची दया आली व त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्याने त्याला सोडून दिले.

मासा चटकन पाण्याच्या तळाशी गेला व लगेच वर आला. येताना त्याने एक अंगठी बरोबर आणली होती. त्या माशाने ती त्या कोळ्याला देऊन म्हटले, 'ही अंगठी जमिनीवर आपटताच तुला सोन्याचांदीच्या नाण्यांनी भरलेलं ताट मिळेल. पण ही अंगठी दिवसातून फक्त एकदाच आपटली पाहिजे. त्यातून तुला कसली गरज लागली तर इथं येत जा—' इतके बोलून तो मासा पुन्हा पाण्याच्या तळाशी निघून गेला.

कोळी आनंदाने घरी आला. त्याने त्या अंगठीची प्रचीती पाहिली. त्याने आपल्या घराचे दार बंद करून टाकले होते. ती अंगठी जमिनीवर आपटल्याबरोबर सोन्याचांदीच्या नाण्यांनी भरलेले ताट उत्पन्न झाले. घरात सर्वत्र झगझगाट झाला. कोळ्याच्या बायकोला अतिशय आनंद झाला. तिच्याप्रमाणेच त्या कोळ्याचा आनंदही गगनात मावेनासा झाला.

नवराबायको एकमेकांच्या तोंडाकडे पाहातच राहिली!

त्या जादूच्या अंगठीच्या प्रभावामुळे तो कोळी थोड्याच दिवसांत खूप श्रीमंत झाला. परंतु त्याच्या दुर्दैवाने अंगठीचे गुपित बाहेर फुटले व ती बातमी हळूहळू दुर्जनसिंगाच्या कानापर्यंत पोहोचली. तो राजा बोलूनचालून लोभी! त्याने त्या कोळ्याला लगेच बोलावून घेतले व म्हणाला, 'मी तुला वाटेल तितके द्रव्य देतो पण ती तुझी आंगठी तू मला दे.'

त्यावर कोळी नम्रतेने म्हणाला, 'महाराज, या एवढ्याशा अंगठीने आपल्यासारख्या थोरामोठ्यांचा काय मोठासा फायदा होणार आहे? मी तुम्हाला यापेक्षाही अधिक द्रव्य देणारी दुसरी अंगठी आणून देतो.' राजा एकदम खूष झाला व त्याने ते मान्य केले.

तो कोळी लगेच समुद्रावर गेला व त्याने त्या माशाला हाक मारली. तो मासा वर आला. कोळ्याने त्याला सर्व हकिगत सांगितली. मासा म्हणाला, 'तू काही काळजी करू नकोस. मी तुला दुसरी अंगठी आणून देतो'—असे म्हणून तो पुन्हा पाण्यात गेला व लगेच दुसरी एक अंगठी घेऊन वर आला. त्याने ती अंगठी कोळ्याला दिली व म्हणाला, 'हे पहा कोळीदादा, ही अंगठी फक्त राजासाठीच आहे. हिचा उपयोग तू करू नकोस—' असे सांगून तो मासा पुन्हा पाण्यात निघून गेला.

माशाने दिलेली ती दुसरी अंगठी घेऊन तो कोळी राजवाड्यात गेला व त्याने ती अंगठी राजाला दिली. तिचा उपयोग कसा करावयाचा हे त्याने राजाला समजावून सांगितले.

कोळी गेल्यावर राजाने मोठ्या उत्सुकतेने व अधीरतेने ती अंगठी जमिनीवर आपटली. त्याबरोबर मोठा आवाज होऊन सगळीकडे धूरच धूर झाला. त्या धुरात एक अतिशय अक्राळविक्राळ असा सर्प निर्माण होऊन त्याने त्या राजाला कडकडून चावा घेतला. राजा मरून पडला. राजाला त्याच्या लोभीपणाचे व दुष्टपणाचे असे प्रायश्चित्त मिळाले.

ही सर्व हकिगत प्रजेला कळल्यावर तिने त्या कोळ्याचे अभिनंदन केले व त्यालाच आपला राजा केले. मग ते सर्व राज्य सुखी झाले.

* * *

# १७. विनोदमूर्ती 'विकटकवि'

* * * * * * * * * * * * * * * * * * *



हजरजबाबीपणा व विनोदी स्वभाव या दोन गुणांमुळे मनुष्य अतिशय लोकप्रिय होतो. या दोन गुणांचा फायदा दर्शविणारी ही एक कथा.

तेलंगणात एक कृष्णदेवराय नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्यातील तेनाली नावाच्या एका खेड्यात एक ब्राह्मण कुटुंब राहात होते. त्या ब्राह्मणाला विजय नावाचा एक अतिशय हुषार, हजरजबाबी व विनोदी असा मुलगा होता. गावातील सगळ्या लोकांचा तो अतिशय लाडका होता. त्याच्या गुणांचे सगळे लोक कौतुक करीत.

एक दिवस विजयची त्या गावच्या नदीतीरावर राहाणाऱ्या एका साधूशी भेट झाली. विजयच्या विनोदप्रचुर बोलण्यामुळे तो साधू एकदम खूष झाला व त्याने विजयला एक मंत्रविद्या शिकविली. तो विजयला

म्हणाला, 'हुषार मुला, मध्यरात्री तू कालीमातेसमोर या मंत्राचे चिंतन कर. तुझी भक्ती पाहून ती प्रसन्न होऊन तुला प्रत्यक्ष दर्शन देईल. तरी तिचा तो अवतार पाहून न भिता स्वस्थ उभा राहा म्हणजे ती तुला तू मागशील तो वर देईल.' विजयने साधूला नमस्कार केला व मंत्र दिल्याबद्दल त्याला धन्यवाद देऊन आपल्या घरी परतला.

दुसऱ्या दिवशी मध्यरात्री त्याने देवीच्या मंदिरात जाऊन साधूने सांगितल्याप्रमाणे देवीचे ध्यान केले. देवीच्या आराधनेत विजय इतका रंगून गेला की, तो आपले देहभानही विसरला. इतक्यात विजेचा कडकडाट व्हावा तसा प्रचंड आवाज झाला. विजयने शांतपणे डोळे उघडले. समोर त्याला सहस्रमुखांची कालीमाता दिसली. विजय मुळीही न भिता तिच्याकडे पाहून हसत होता. कालीमातेला त्याच्या बेडरपणाचे कौतुक वाटले व ती म्हणाली, 'मुला, तुला हसायला काय झालं?'

विजय म्हणाला, 'माते, हसू नको तर काय करू? आम्हा लोकांना एक नाक व दोनच हात असतात. आम्हाला जर पडसं आलं, सर्दी झाली तर आमचा जीव नकोसा होतो. नाक स्वच्छ करता करता आम्हाला नाकी नव येतात. तुझं सगळंच वेगळं आहे माते! तुझी हजार मुखं आणि हजार नाकं! पण हात मात्र आमच्यासारखे दोनच आहेत तुला! तेव्हा देवी, माझ्यावर रागावू नकोस. तुला मी असं विचातो की, जर तुला पडसं-सर्दी झाली तर तुझी काय अवस्था होत असेल?'

देवी मनातून त्याच्यावर खूष झाली व तिला हसू आले. तिला विजयच्या हजरजबाबीपणाचे व विनोदी वृत्तीचे कौतुक वाटले व ती त्याला म्हणाली, 'हे बालका, अखेरीस तुझ्या विनोदाने तू मला हसवलंस. आजपासून सर्व लोक तुझा 'विकटकवि' म्हणून सन्मान करतील.'

कालीमातेच्या या बोलण्यावर विजय एकदम हसला व म्हणाला, 'माते जगदंबे! तू तर माझ्यापेक्षा हजार पटीने विनोदी आहेस. तू मला असं नाव दिलं आहेस, की ते सरळ वाचा किंवा उलटं वाचा, अक्षरं तीच आहेत.'

'विकटकवि' हा शब्द शेवटच्या अक्षरापासून वाचला तरी अक्षरं तीच येतात—'विकटकवि!'

विजयचे हे विलक्षण बुद्धिचातुर्य पाहून कालीमाता संतुष्ट झाली व म्हणाली, 'तुझी बुद्धिमत्ता बाळा, फार तीव्र आहे. आपल्या चातुर्यामुळे तू पुढे राजाचं मन मोहून टाकशील आणि त्याच्या दरबारचा मुख्य विदूषक होशील—' एवढे बोलून कालीमाता अंतर्धान पावली.

विजयची कीर्ती वायुवेगाने पसरू लागली. हळूहळू विजयनगरच्या राजाच्या कानावर त्याची कीर्ती गेली. राजाने त्यास बोलावून घेतले. त्याची परीक्षा घेतली. विजय राजाच्या कसोटीस उत्तम प्रकारे उतरला. राजाने त्यास दरबारच्या प्रमुख विदूषकाचे पदक देऊन त्याचा सन्मान केला. त्याला कायमचे दरबारात ठेवून घेतले. पुढे तामीळ साहित्यात आपल्या विनोदाने धवल कीर्ती मिळविणारा हाच तो 'विकटकवि!'

* * *

## १८. सत्याची कास सोडू नका

* * * * * * * * * * * * * * * * * *

मुलांनो, गोपाळ कृष्ण गोखले हे नाव तुम्हा सर्वांना परिचित आहेच. त्यांनी 'भारत सेवक' या नावाची संस्था स्थापन केली व देशसेवेचे व्रत आमरण चालविले. त्यांच्या आयुष्यातील त्यांच्या लहानपणची एक मजेदार व धडा शिकण्यासारखी गोष्ट.

गोपाळ मराठी चौथी इयत्ता शिकत होता. एके दिवशी त्याच्या गणिताच्या शिक्षकाने त्यांच्या वर्गाला घरून सोडवून आणण्याकरिता एक कठीण उदाहरण दिले. ते उदाहरण फारच कठीण असल्यामुळे

# १९. चक्रम विक्रमची विचित्र पैज

* * * * * * * * * * * * * * * * * *

एका गावातल्या चावडीवर दोन रिकामटेकडे बसले होते. एकाचे नाव होते चक्रम व दुसऱ्याचे नाव होते विक्रम. गावातही ही जोडी प्रसिद्ध होती. ते दोघेही हजरजबावी व विनोदी होते व त्यामुळे अतिशय लोकप्रियही होते. ते चावडीवर बसलेले असताना त्यांना दुरून एक बैलगाडी येताना दिसली. तेव्हा चक्रम विक्रमला म्हणाला, 'समोरून काय येत आहे ते सांग.'

त्यावर चक्रम म्हणाला, 'ती तर बैलगाडी आहे.'

मग चक्रम म्हणाला, 'ती काय बैलगाडी आहे? बोल—काय पैज?'

विक्रम म्हणाला, 'ती बैलगाडीच आहे. ती बैलगाडी असली तर मी तुझ्या थोबाडीत मारीन. नसली तर तू माझ्या एक तोंडात मार.' चक्रमने याला मान्यता दिल्यामुळे पैज पक्की झाली.

थोड्याच वेळात ती बैलगाडी जवळ आली. तेव्हा विक्रम म्हणाला, 'ही पहा, आहे की नाही बैलगाडी ?'

चक्रम म्हणाला, 'काय म्हणतोस ? ही बैलगाडी आहे ? मला कबूल नाही. जी बैलगाडी आहे असं तू म्हणतोस ती मला हात लावून दाखव.'

विक्रमने त्या गाडीचे धुरांडे धरले व म्हणाला, 'पाहा ही बैलगाडी आहे की नाही !'

चक्रमने मोठ्या चातुर्याने गाडीवानाला विचारले, 'गाडीवानदादा, आता या माझ्या मित्राने हात लावला ते काय आहे ?'

त्यावर तो गाडीवान म्हणाला, 'ते तर धुर आहे.'

नंतर चक्रमने गाडीच्या चाकाला हात लावून ते काय आहे म्हणून विचारले. त्यावर गाडीवान म्हणाला, 'तुम्हा दोघांनाही वेड लागलेलं आहे की काय ? हे चाक आहे एवढंही तुम्हाला कळत नाही ?'

झाले. दोघांचा वाद वाढत चालला. चक्रम विक्रमला हात लावून बैलगाडी दाखवू शकला नाही. त्याने आपण हरल्याचे कबूल केले. लगेच विक्रम म्हणाला, 'तू पैज हरला आहेस. तेव्हा मला तुझ्या एक तोंडात मारू दे.'

त्यावर चक्रम म्हणाला, 'ठीक आहे. पण तू जिथं मारणार ती जागा मला दाखव.'

विक्रमने चक्रमच्या गालाला हात लावून दाखवला. चक्रमने मोठ्या युक्तीने त्याच गाडीवानाला विचारले, 'का हो गाडीवानदादा, ह्या माझ्या मित्राने ज्याला हात लावला त्याला तुम्ही काय म्हणाल ?'

गाडीवान आश्चर्याने पाहातच राहिला व म्हणाला, 'अहो, तो गाल आहे.' त्यावर चक्रम विक्रमला म्हणाला, 'आपली पैज तोंडात मारण्याची आहे. गालावर मारण्याची नाही. तू मला कोणतं तोंड ते दाखव व तेथे क चापट मार.'

मग विक्रमने चक्रमच्या नाकास हात लावला. चक्रमने पूर्वीसारखे गाडीवानाला विचारले. गाडीवानाने सांगितले, 'अहो, ते नाक आहे, समजत कसं नाही तुम्हाला?'

नंतर विक्रमने चक्रमच्या ओठांला हात लावला व गाडीवानाला विचारले. तो संतापून म्हणाला, 'तुम्ही दोघेही मूर्ख आहात. अहो, ते ओठ आहेत. तुम्ही मला आता काही विचारू नका—' असे म्हणून तो गाडी घेऊन निघून गेला.

चक्रम-विक्रमचा वाद चालूच होता. विक्रमसुद्धा चक्रमला प्रत्यक्ष तोंड कोणते ते दाखवू शकला नाही. म्हणून त्याला चक्रमच्या तोंडावर हात मारता आला नाही. त्या दोघांपैकी कोणालाच पैज जिंकता आली नाही.

मुलांनो, होती की नाही चक्रम-विक्रमची विचित्र पैज?

* * *

## २०. गरीब काटूरा राणी झाली

* * * * * * * * * * * * * * * * *

ग्रीस देशात एक राजा होता. त्याला एकुलता एक मुलगा होता. राजकुमार मोठा झाला व त्याच्या लग्नाचा विचार सुरू झाला. राजाने त्याला तीन बाण दिले व सांगितले, 'युवराज हे तीन बाण या तीन मनोऱ्यांवर मार आणि ज्या मनोऱ्यावर बाण पडेल तेथील मुलीशी तुझं लग्न होईल.'

एका इमारतीत मुख्य मंत्री राहात होते, दुसऱ्या इमारतीत राज्याचे सरसेनापती राहात होते व तिसऱ्या इमारतीत एक गरीब विधवा राहात होती. तिला काटूरा नावाची एक मुलगी होती.

राजपुत्राने पहिल्या इमारतीवर बाण मारला पण तो चुकला. मग त्याने दुसऱ्या इमारतीवर बाण मारला, तोही चुकला. राजपुत्राने जेव्हा तिसऱ्या इमारतीवर बाण मारला त्यावेळी मात्र तो बरोबर बसला.

काटूरा ही एका विधवेची मुलगी. राजपुत्राचे तिच्याशी लग्न करून देणे म्हणजे प्रतिष्ठेचा प्रश्न आला. राजपुत्राला काहीच वाटले नाही. त्याचे काटूरावर प्रेम बसले. दिसायला ती सुंदर होती. तो तिच्याशी लग्न करायला तयार झाला. राजाच्या मनात विचार आला, राजपुत्र उद्या राजा होणार आणि ही विधवेची गरीब मुलगी त्याची राणी होणार. तो राजपुत्र जरी अत्यंत आज्ञाधारक होता तरी या बाबतीत तो राजाचे ऐकेना. त्याने काटूराशीच लग्न करण्याचे ठरविले. तो राजाला म्हणाला, 'राजाजी, आपण दिलेली आज्ञा मी पाळली आहे. बाण तिसऱ्या इमारतीवर म्हणजे काटूराच्या इमारतीवरच पडला. तेव्हा मी काटूराशीच लग्न करणार!'

राजा निराश झाला पण त्याने आणखी एक प्रयत्न करण्याचे ठरविले. तो राजपुत्राला म्हणाला, 'राजकुमारा, काटूराने मला राजवाड्यातील सर्व संत्र्यांच्या फुलाचं पाणी आणून दिलं तरच मी तिच्याबरोबर तुझं लग्न लावून देईन. जर प्रधानमंत्री किंवा सरसेनापती यांच्या मुली संत्र्यांच्या फुलांचं पाणी आणून देण्यात यशस्वी झाल्या तर तुला त्या विजयी मुलीबरोबर लग्न करावं लागेल.'

राजपुत्राने ही सर्व हकिगत काटूराला सांगितली. काटूराची आई म्हणाली, 'राजकुमारांनी काही काळजी करण्याचं कारण नाही. मला जादू अवगत आहे. मी सर्व गोष्टी व्यवस्थित करते. मी सारी संत्र्यांची फुलं गोळा करते. दुसऱ्या कोणाच्याही हाताला एकही फूल लागू देत नाही.'

काटूराने फुलांचे पाणी आणले. दुसऱ्या मुलींना पाणी अजिबात आणता आले नाही. काटूराने पण जिंकला. राजपुत्राशी काटूराचेच लग्न ठरविणे क्रमप्राप्त झाले. तरीपण राजाने अखेरचा प्रयत्न करून पाहाण्याचे ठरविले. त्याने दरबारातील जादूगाराला बोलावले व त्याला सल्ला विचारला.

जादूगार म्हणाला, 'राजेसाहेब, प्रधानमंत्र्यांच्या मुलीच्या झग्यात तांदूळ ठेवा व तिला नृत्य करायला सांगा. तिच्या झग्यातून मोती पडतील व मग तिच्याबरोबर राजकुमाराचं लग्न लावून द्या.'

झाले. दरबार भरला. प्रधानमंत्र्यांची मुलगी नाचू लागली. राजा तिच्या झग्यातून मोती बाहेर पडण्याची वाट पाहू लागला. पण झग्यातून तांदूळच पडले. राजा संतापला. त्याने सेतापतीच्या मुलीला नृत्य करण्यास आज्ञा केली. तिनेही नाच केला पण तिच्या झग्यातूही तांदूळच बाहेर पडले. राजाच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली. जादूगाराला राज्याच्या बाहेर हाकून देण्याचा हुकूम सुटला. नंतर काटूराने नाचण्यास सुरुवात केली. तिने थोडेसे तांदूळ आपल्या झग्याच्या खिशात घातले व ती नाचू लागली. तो काय आश्चर्य ! ती नाचता नाचता तिच्या झग्यातून मोत्यांचा सडा बाहेर पडला. राजाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने काटूराला जवळ बोलावून विचारले, 'काटूरा, तुला ही जादू कोणी शिकवली ? माझ्या दरबारातील जादूगारापेक्षा तुझी जादू जास्त मोलाची आहे.'

त्यावर काटूरा म्हणाली, 'मला जादू येत नाही माझ्या आईला जादूची कला अवगत आहे.'

राजा खूष झाला व त्याने राजकुमाराचे लग्न काटूराबरोबर मोठ्या थाटामाटाने लावून दिले. काटूराची आई दरबारची जादूगार झाली.

माणसाने लग्नाच्या बाबतीत खोट्या प्रतिष्ठेला बळी पडू नये. जातपात लक्षात न घेता गुणांकडेच लक्ष द्यावे ही गोष्ट राजाला कळून चुकली.

* * *

# २१. खोडसाळपणाला योग्य उत्तर

* * * * * * * * * * * * * *

मुलांच्या एका वसतीगृहात वसंत जोशी नावाचा एक सालस, बुद्धिमान व सामाजिक कार्याची आवड असलेला मुलगा राहात होता. त्या वसतीगृहातील इतर खोडसाळ मुले वसंताच्या गरिबीचा फायदा घेऊन त्याला फार त्रास देत असत. परंतु वसंताने आपल्या बुद्धिचातुर्याने मुलांच्या खोडसाळपणाला कसे योग्य उत्तर दिले ते पाहा—

सकाळची वेळ. वसंत अजून आपल्या खोलीत झोपलेलाच होता. इतक्यात त्याच्या खोलीच्या दारावर थापा मारल्याचा आवाज झाला. त्याने घाबरत घाबरतच दार उघडले. पाहातो तो त्याच्या दारात चारपाच मुले उभी. त्याला आश्चर्यच वाटले. त्या मुलांपैकी एकजण म्हणाला, 'अहो

जादूगार म्हणाला, 'राजेसाहेब, प्रधानमंत्र्यांच्या मुलीच्या झग्यात तांदूळ ठेवा व तिला नृत्य करायला सांगा. तिच्या झग्यातून मोती पडतील व मग तिच्याबरोबर राजकुमाराचं लग्न लावून द्या.'

झाले. दरबार भरला. प्रधानमंत्र्यांची मुलगी नाचू लागली. राजा तिच्या झग्यातून मोती बाहेर पडण्याची वाट पाहू लागला. पण झग्यातून तांदूळच पडले. राजा संतापला. त्याने सेतापतीच्या मुलीला नृत्य करण्यास आज्ञा केली. तिनेही नाच केला पण तिच्या झग्यातूही तांदूळच बाहेर पडले. राजाच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली. जादूगाराला राज्याच्या बाहेर हाकून देण्याचा हुकूम सुटला. नंतर काटूराने नाचण्यास सुरुवात केली. तिने थोडेसे तांदूळ आपल्या झग्याच्या खिशात घातले व ती नाचू लागली. तो काय आश्चर्य ! ती नाचता नाचता तिच्या झग्यातूनं मोत्यांचा सडा बाहेर पडला. राजाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्याने काटूराला जवळ बोलावून विचारले, 'काटूरा, तुला ही जादू कोणी शिकवली ? माझ्या दरबारातील जादूगारापेक्षा तुझी जादू जास्त मोलाची आहे.'

त्यावर काटूरा म्हणाली, 'मला जादू येत नाही माझ्या आईला जादूची कला अवगत आहे.'

राजा खूष झाला व त्याने राजकुमाराचे लग्न काटूराबरोबर मोठ्या थाटामाटाने लावून दिले. काटूराची आई दरबारची जादूगार झाली.

माणसाने लग्नाच्या बाबतीत खोट्या प्रतिष्ठेला बळी पडू नये. जातपात लक्षात न घेता गुणांकडेच लक्ष द्यावे ही गोष्ट राजाला कळून चुकली.

* * *

वसंतराव, आज आम्ही वनभोजनास जाणार आहोत. तुम्हाला पण आमच्याबरोबर आलं पाहिजे.'

वसंत आढेवेढे घेऊ लागला पण अखेर नाइलाजाने कबूल झाला. वनभोजनासाठी जी जागा ठरविण्यात आलेली होती ती शहरापासून तीन ते चार किलोमिटर दूर एका नदीकिनाऱ्यावर होती. रस्ता थोडा अवघड असल्यामुळे मुलांना पायीच जावे लागले. तीन-चार किलोमिटर चालत जाऊन इतर मुले आठ साडेआठपर्यंत नदीकिनारी पोहोचली. पण वसंत मात्र मेटाकुटीला आला होता. कारण वाटेत त्या टवाळ मुलांनी आपापल्या वस्तू त्याच्याच हातात दिल्या होत्या. दुपारी जेवणाची तयारी सुरू झाली. त्या टवाळ मुलांनी भाकऱ्या भाजण्याचे काम वसंताकडेच दिले होते. जेवण तयार झाल्यावर सर्व मुले जेवायला बसली. वसंत वाढण्याकरिता थांबला. कारण ती कामगिरीही मुलांनी त्याच्यावरच लादली होती. मुलांनी एकमेकांना आग्रह करकरून जेवणावर यथेच्छ ताव मारला. वसंत जेवायला बसला तेव्हा त्याला जेमतेम दोन घास भात–नव्हे–खरपुड्या शिळक उरल्या होत्या! वरण संपून गेले होते. भाजीचे पातेले साफ झाले होते. वसंताला मनातून अतिशय राग आला. पण बिचारा करतो काय? तो एकटा पडला. इतर मुले तेरा चौदा होती. कसेबसे त्याने दोन घास खाल्ले. मुलांनी आपल्याला चांगलेच बनविले आहे तर आपणही त्यांची खोड मोडली पाहिजे, असा विचार त्याच्या मनात आला व त्याला एक युक्ती सुचली.

दुपारी चार वाजता मुले परत निघाली. वसंत त्या बाकीच्या मुलांमागून चालू लागला. तो एकदोन किलोमिटर चालून गेला असेल तोच त्याने मोठ्याने आरडाओरडा केला. सर्व मुले मागे परतली. जवळ येऊन पाहातात तो वसंत निश्चेष्ट पडलेला! त्याचा कावराबावरा चेहरा पाहून सारी मुले घाबरून गेली. ती त्याला विचारू लागली, 'काय झालं रे वसंता?'

वसंत विव्हळत ओरडला, 'मला साप चावलाय!'

सर्व मुलांची पाचावर धारण बसली. आता इथे डॉक्टर वैद्य कसे मिळणार? पण त्यांतल्या दोन मुलांनी शेजारच्या खेड्यात जाऊन एक खाटले विकत आणले. वसंताला त्या खाटेवर झोपवून इतर मुले ती खाट आळीपाळीने उचलून घेऊ लागली. वसंत त्या मुलांना उसंत घेऊ देत नव्हता. तो त्या खाटेवर जोरजोराने पाय आपटी, या कुशीवरून त्या कुशीवर वळे. कधीकधी खाट उचलून नेणाऱ्या मुलांपैकी एखाद्याला लाथ मारी, याप्रमाणे त्याने त्या सर्व मुलांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडले.

शहरात पोहोचल्यावर त्या मुलांनी ती खाट एका डॉक्टरच्या बंगल्यासमोर ठेवली व एक मुलगा वसंताला सर्पदंश झाला असल्याचे सांगण्याकरिता डॉक्टरांकडे गेला. डॉक्टर खाटेजवळ आले. झोपेतून खडबडून जागा झाल्यासारखा वसंत उठून बसला. डॉक्टरांनी त्याला विचारले, 'तुझ्या कुठे चावला साप? मला दाखव ती अचूक जागा.'

वसंत म्हणाला, 'साप? कुठला साप? कोणाला चावला?' डॉक्टर म्हणाले, 'अरे, तुला साप चावलाय म्हणून या खाटल्यावरून माझ्याकडे आणलं आहे.'

वसंत म्हणाला, 'अहो डॉक्टरसाहेब, सकाळपासून या मुलांनी माझा छळवाद मांडला. माझी इच्छा नसताना जबरदस्तीने त्यांनी मला वनभोजनाला नेलं, माझी संमती नसताना प्रत्येकाने आपापलं सामान माझ्याजवळ दिलं, संगनमत करून मला भाकऱ्या बडवायला लावलं, हावरेपणाने सगळं अन्न खाऊन फस्त केलं. आज एप्रिलची एक तारीख नसतानाही या सगळ्या मुलांनी मला एप्रिलफूल बनविण्याचं ठरवलं. म्हणून मी सुद्धा साप चावल्याचं नाटक करून या मुलांना त्यांच्या खोडसाळपणाचं प्रायश्चित्त भोगवलं—नि त्यांनाच एप्रिल-फूल केलं.'

त्या डॉक्टरांनी वसंताच्या बुद्धिचातुर्याची तारीफ केली. बाकीच्या मुलांची तोंडे पोस्टाच्या पेटीसारखी झाली. यानंतर वसंताची खोडी काढण्याचे एकाही मुलाने धाडस केले नाही.

* * *

# २२. नेहमी चांगली कामे करा

* * * * * * * * * * * * * * * * *



अवंती नगरीमध्ये चंद्रसेन नावाचा राजा राज्य करीत होता. राजा अत्यंत प्रजादक्ष असून तो आपला सारा वेळ प्रजेच्या हितासाठी खर्च करीत असे. तो रोज रात्री साधा वेश करून राज्यात हिंडत असे. तो साऱ्या प्रजेची सुखदुःखे व तक्रारी समजून घेण्याचा प्रयत्न करी व योग्य ती प्रजेच्या हिताची प्रत्येक गोष्ट करीत असे.

असाच एक दिवस तो राजा भल्या पहाटे राज्यात फिरायला निघाला. फिरत फिरत तो एका वडाच्या पारावर येऊन बसला. पहाटेचा मंद वारा सुटला होता, पक्ष्यांची किलबिल सुरू झाली होती, मधूनच बायकांचे जात्यावरील गाणे राजाला ऐकू येत होते. एकाएकी राजाला बैलांच्या घुंगूर माळांचा आवाज ऐकू आला. दुरून एक बैलगाडी येत होती.

गाडीवान आपल्याच तंद्रीत होता. इतक्यात एक मोठा आवाज झाला व एक बैल मटकन खाली बसला. त्यामुळे तो गाडीवान खडबडून जागा झाला व गाडीच्या खाली उतरला. रस्त्यात एक खूप मोठा दगड पडलेला त्याला दिसला. त्याने लोकांना शिव्या द्यायला सुरुवात केली पण दगड बाजूला न करताच तो गाडी घेऊन निघून गेला. काही वेळाने त्या रस्त्यावर गवळ्यांची रहदारी सुरू झाली. एक गवळी त्या दगडाला अडखळून खाली पडला. त्याच्या डोक्यावरचा दुधाचा हंडा उपडा झाला, त्याचे सगळे दूध सांडून गेले. परंतु गंमत अशी की, त्या गवळ्याने सुद्धा उठल्यावर तो दगड बाजूला केला नाही. त्यानेही गाडीवानाप्रमाणेच लोकांना शिव्या दिल्या व तिथून निघून गेला. राजा हे सर्व पाहात होता. नंतर एक पूजारी आला. त्याच्या हातांत पूजेचे साहित्य होते. तो देवाचे नामस्मरण करीत चालला होता. त्यालासुद्धा त्या दगडाची ठेच लागली व त्याच्या हातांतील पूजासाहित्य इकडे तिकडे विखरून गेले. परंतु त्या पूजाऱ्यानेसुद्धा तो रस्त्यातील दगड बाजूला केला नाही. तोही पूजेचे पडलेले साहित्य गोळा करून निघून गेला.

इतका वेळ होईतो चांगलेच उजाडले. मुले शाळेत जाऊ लागली. त्या मुलांना तो दगड दिसला, त्याच्या आजूबाजूला पडलेली फुले दिसली व सांडलेले दूध दिसले. मुलांनी खरा प्रकार काय तो ओळखला. त्यांना वाईट वाटले व या दुर्घटनेला जबाबदार असलेला तो दगड बाजूला करण्याचे त्यांनी ठरविले. सर्वांनी आपापली दप्तरे बाजूला ठेवली. त्या सर्वांनी आपली चिमुकली शक्ती पणाला लावून तो दगड रस्त्यातून दूर केला व ती हसत हसत शाळेत जावयास निघाली.

राजा पारावर बसून सर्व प्रकार पाहात होता. त्याने त्या मुलांना जवळ बोलावून घेऊन त्या प्रत्येकाला बक्षीस दिले, शाबासकी दिली व म्हटले, 'बाळांनो, अशीच चांगली कामं नेहमी करीत जा.'

* * *

# २३. साधू व दोन कुत्रे

* * * * * * * * * * * * * * * * * *

एका जंगलात दोन कुत्रे राहात होते. एकाचे नाव होते काळू नि दुसऱ्याचे नाव होते बाळू. ते दोघे मित्र होते. त्यांचे एकमेकांवर फार प्रेम होते. ते दोघे बरोबर फिरायचे, बरोबर खायचे प्यायचे व मजा करायचे.

त्या जंगलाजवळ एका झाडाखाली एक साधू राहात असे. काळू व बाळू रोज नेमाने त्याच्याकडे जात. त्यांची मैत्री पाहून त्या साधूला समाधान वाटे व अतिशय आनंद होई.

पण काही दिवसांनी काळू व बाळू यांच्यात भांडण झाले. ते एकमेकांशी बोलत नाहीसे झाले. त्यानंतर पहिले एकदोन दिवस त्या साधूकडे त्या दोघांपैकी कोणीही फिरकले नाही. त्यानंतर ते एकेकटे त्याच्याकडे जाऊ लागले. साधूला या गोष्टीचे नवल वाटले. पहिल्याने

त्याला वाटले की नसतील आले दोन तीन दिवस. परंतु ते जेव्हा एकेकटेच येऊ लागले तेव्हा साधूने त्यांचे भांडण झाले असल्याचे ताडले. साधूला याचे वाईट वाटले. तो मनात म्हणाला, 'गेले कित्येक दिवस हे दोघे एकमेकांशी प्रेमाने हसत-खेळत होते व त्यांचं प्रेम पाहून मलाही आनंद होत असे. पण आज?'

काय करावे हे साधूला कळेना. तेवढ्यात काळू आला. साधूने त्याला दुसऱ्या दिवशी दुपारी येण्यास सांगितले. बाळू पण तेथे आला. त्यालाही साधूने दुसऱ्या दिवशी दुपारी येण्यास सांगितले.

दुसरा दिवस उजाडला. ठरल्याप्रमाणे दुपारी काळू बाळूची जोडी त्या साधूच्या सांगण्याप्रमाणे त्या झाडाखाली आली. एकमेकांना पाहाताच ते दोघे एकमेकावर गुरगुरू लागले. भूंकू लागले, रागाने शेपट्या हालवू लागले.

साधू हे सगळे पाहात होता. त्या दोघांना शांत करून तो म्हणाला, 'बाबांनो, तुम्ही आजपर्यंत एकमेकांशी प्रेमाने वागत होता, मग आताच तुम्ही असे का वागता?'

बाळू म्हणाला, 'आमचं भांडण झालं आहे. म्हणून आम्ही एकमेकांशी बोलत सुद्धा नाही.'

साधू म्हणाला, 'बाबांनो, या जगात द्वेष, मत्सर, लोभ ज्याप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे भांडण सुद्धा एक आहे. भांडणं माणसांतसुद्धा होतात, मग तुमच्यात का नाही होणार? एकमेकांची मते एकमेकांस पटली नाहीत की भांडण होतंच. परंतु लक्षात ठेवा की, भांडणाचं रूपांतर शत्रुत्वात करू नये. भांडण कायमचं ठेवू नका. पाहिजे तर काही दिवस अबोला ठेवा पण नंतर पुन्हा एक व्हा व प्रेमाने राहा.'

त्या साधूचे हे शब्द ऐकून त्या कुत्र्यांच्या मनावर फार परिणाम झाला. त्यांनी माना खाली घातल्या. दोघांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. मग काळूबाळूने एकमेकांना प्रेमाने मिठी मारली. ते दोघे आनंदाने जंगलात परत गेले.

तेव्हापासून कुत्र्याची जात एकमेकाशी प्रेमाने वागू लागली. कधी कधी ते भांडतील, एकमेकांवर भुंकतील, इतकेच नव्हे तर एखादे वेळी ते एकमेकांना चावतील सुद्धा. पण काही वेळाने ते एकत्र येतील व गळ्यात गळा घालून खेळीमेळीने वागू लागतील.

मुलांनो, हाच उपदेश जर मानवजातीने ऐकला तर जगातील किती तरी अनर्थ दूर होतील.

* * *

## २४. जगात थोर कोण ?

* * * * * * * * * * * * * * * *



एका खेडेगावातील शेतातून जनावरे घरी परत येत होती. काही बासरे, काही गाई, काही बैल अशी निरनिराळ्या मालकांची निरनिराळी जनावरे होती. वाटेत एक गाय बैलास म्हणाली, 'काय रे बैलोबा ? या जगात सर्वांत थोर कोण ?'

त्यावर बैलोबा म्हणाला, 'अहा रे वेडी! अग, जगात मीच सर्वांत थोर! एवढं सुद्धा तुला समजत नाही?'

गाय म्हणाली, 'साऱ्या जगात मीच थोर आहे! माझ्या पोटात तेहतीस कोटी देव आहेत. मग मी देवाहूनही थोर नाही का? सांग.'

त्यावर बैलोबा संतापून म्हणाले, 'अगदीच खुळी आहेस तू! माझ्यावाचून जग चालणार नाही हे माहीत नाही का तुला?'

गाय तुसडेपणाने म्हणाली, 'मूर्ख आहेस तू! म्हणूनच लोक तुला नंदीबैल म्हणतात. सगळे हिंदू लोक माझी पूजा करतात. माझ्या दुधामुळे लोक जगतात. माझ्याच पोटी तुझा जन्म झाला आणि वर तू ही अशी बडबड करतोस?'

बैलोबा म्हणाले, 'तुझे ते उपकार असतील माझ्यावर पण त्यामुळे काही तू माझ्याहून थोर ठरणार नाहीस. मी रानातून कामं करतो, शेतीही माझ्यामुळेच होते, माझ्यामुळेच पीक येते आणि तुम्हा सर्वांना चाराही माझ्यामुळेच मिळतो.' बैलोबा ऐटीत म्हणाला. अखेर त्या दोघांचे कडाक्याचे भांडण जुंपले.

जवळच एक गाढव हिंडत होते. त्या दोघांचे हे भांडण पाहून ते धावतच त्यांच्याजवळ आले. त्याने त्यांचे भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! दोघेही ऐकेनात. तेव्हा ते गाढव ओरडून म्हणाले, 'तुम्ही दोघेही मूर्ख आहात. जगात मीच सर्वांत थोर आहे.' झाले. दोघांचे भांडण आता तिघांचे झाले.

बैल त्या गाढवाच्या अंगावर धावून आला, गाय त्या गाढवाला शिंगे मारू लागली, गाढवाने त्या दोघांवर लाथांचा सुकाळ केला. सारा दंगा सुरू झाला.

त्या वाटेने एक धनगर आपल्या मेंढरांना बाभळीच्या झाडाकडे नेत होता. त्यांतील एका मेंढराने आपल्या धन्याचा डोळा चुकवला व ते त्या भांडणाच्या जागी आले. ते त्या तिघांचे भांडण सोडविण्याचा प्रयत्न

तेंव्हापासून कुत्र्याची जात एकमेकाशी प्रेमाने वागू लागली. कधी कधी ते भांडतील, एकमेकांवर भुंकतील, इतकेच नव्हे तर एखादे वेळी ते एकमेकांना चावतील सुद्धा. पण काही वेळाने ते एकत्र येतील व गळ्यात गळा घालून खेळीमेळीने वागू लागतील.

मुलांनो, हाच उपदेश जर मानवजातीने ऐकला तर जगातील किती तरी अनर्थ दूर होतील.

* * *

## २४. जगात थोर कोण ?

* * * * * * * * * * * * * * * *



एका खेडेगावातील शेतातून जनावरे घरी परत येत होती. काही वासरे, काही गाई, काही बैल अशी निरनिराळ्या मालकांची निरनिराळी जनावरे होती. वाटेत एक गाय बैलास म्हणाली, 'काय रे बैलोबा ? या जगात सर्वांत थोर कोण ?'

त्यावर बैलोबा म्हणाला, 'अहा रे वेडी! अग, जगात मीच सर्वांत थोर! एवढं सुद्धा तुला समजत नाही?'

गाय म्हणाली, 'साऱ्या जगात मीच थोर आहे! माझ्या पोटात तेहतीस कोटी देव आहेत. मग मी देवाहूनही थोर नाही का? सांग.'

त्यावर बैलोबा संतापून म्हणाले, 'अगदीच खुळी आहेस तू! माझ्यावाचून जग चालणार नाही हे माहीत नाही का तुला?'

गाय तुसडेपणाने म्हणाली, 'मूर्ख आहेस तू! म्हणूनच लोक तुला नंदीबैल म्हणतात. सगळे हिंदू लोक माझी पूजा करतात. माझ्या दुधामुळे लोक जगतात. माझ्याच पोटी तुझा जन्म झाला आणि वर तू ही अशी बडबड करतोस?'

बैलोबा म्हणाले, 'तुझे ते उपकार असतील माझ्यावर पण त्यामुळे काही तू माझ्याहून थोर ठरणार नाहीस. मी रानातून कामं करतो, शेतीही माझ्यामुळेच होते, माझ्यामुळेच पीक येते आणि तुम्हा सर्वांना चाराही माझ्यामुळेच मिळतो.' बैलोबा ऐटीत म्हणाला. अखेर त्या दोघांचे कडाक्याचे भांडण जुंपले.

जवळच एक गाढव हिंडत होते. त्या दोघांचे हे भांडण पाहून ते धावतच त्यांच्याजवळ आले. त्याने त्यांचे भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! दोघेही ऐकेनात. तेव्हा ते गाढव ओरडून म्हणाले, 'तुम्ही दोघेही मूर्ख आहात. जगात मीच सर्वांत थोर आहे.' झाले. दोघांचे भांडण आता तिघांचे झाले.

बैल त्या गाढवाच्या अंगावर धावून आला, गाय त्या गाढवाला शिंगे मारू लागली, गाढवाने त्या दोघांवर लाथांचा सुकाळ केला. सारा दंगा सुरू झाला.

त्या वाटेने एक धनगर आपल्या मेंढरांना बाभळीच्या झाडाकडे नेत होता. त्यांतील एका मेंढराने आपल्या धन्याचा डोळा चुकवला व ते त्या भांडणाच्या जागी आले. ते त्या तिघांचे भांडण सोडविण्याचा प्रयत्न

करू लागले. गाढवाने त्याला लाथ मारून विचारले, 'बोल, कोण थोर आहे? ही गाय, हा बैल की मी?

ते मेंढरू विचारे घाबरून गेले. ते कापतकापत हळू आवाजात म्हणाले, 'तुम्ही तिघंही गाढव आहात! या जगात मीच सर्वांत थोर आहे. मी लोकांसाठी जीव देतो व त्यांचे थंडीपासून रक्षण करतो.'

ती चौकडी जमल्यावर तर त्यांच्या भांडणाला खूपच रंग भरला. तो मेंढपाळ आपले चुकलेले मेंढरू शोधायला आला. ते भांडण पाहून तो शांतपणे म्हणाला, 'बाबांनो, असं एकमेकांत भांडणं बरोबर नाही. यामुळे सर्वांचाच नाश होतो. जगात सगळ्यांचाच उपयोग आहे. आपापल्या परीने सगळेच थोर आहेत. आपण सगळेच एकमेकांचे मित्र आहोत. आपण एकमेकांवर प्रेम करू या. चला सगळी आता आपापल्या घरी!'

त्या धनगराचे म्हणणे सर्वांना पटले. गाय घरी गेली, बैलोबाही घरी गेले. गाढवही निघून गेले. मेंढरूही आपल्या धन्याबरोबर निघून गेले.

* * *

## २५. एक दिवाळी--दोन तऱ्हा

* * * * * * * * * * * * * * * * *

मुलांनो, सुख हे संपत्तीवर अवलंबून नसून ते मनाच्या श्रीमंतीवर अवलंबून असते हे दर्शविणारी दिवाळीतली एक गोष्ट.

भगवानराव भडकमकरांचा वाडा म्हणजे राजमहाल झाला होता. जिकडे तिकडे विजेचा लखलखाट, अत्तराचा घमघमाट! वाड्यामध्ये संपत्तीचे भव्य प्रदर्शनच जणू मांडलेले होते. नाव भगवानराव पण ते प्रत्यक्षात होते मात्र सैतानराव! पैसा हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. त्यांचे आडनाव

मात्र त्यांना शोभेसेच होते. भडकमकर सारखे भडकल्यासारखेच वागत. त्यांच्या पत्नी इंदूताई. त्यांना श्रीमंतीचा तोरा व महिलामंडळाचा छंद. त्यांची सुरेश आणि लता ही दोन मुलंही लाडात वाढलेली. त्यामुळे अतिशय चिरचिरी. सगळ्या घरादारात दिवाळी दिसत होती तरी घरातील प्रत्येक माणसाच्या तोंडावर अमावास्येचा अंधारच दिसत होता. भगवानराव म्हणजे बापूसाहेबांचा ड्रायव्हर सुखदेव त्यांच्या वाड्याच्या दारातच देवडीला लागून असलेल्या खोलीत राहात असे. सुखदेवाच्या बायकोचे नाव होते सुखिया. सुखदेव व सुखिया हे जोडपे अगदी नावाप्रमाणेच सुखी होते. बाहेरून कोणी वाड्यात आले तर सुखदेव त्यांचे गोड स्वागत करी व येणारा प्रत्येक मनुष्य आनंदित होई. येणारा मनुष्य विचारी, 'काय सुखदेव, ठीक आहे ना ?' सुखदेव म्हणे, 'हां साब. करनेवाला भगवान तो है अपने पास.'

वाड्यात शिरल्यावर मात्र येणाराची स्थिती काय होत असे कोण जाणे ! कुणी मालकांना विचारले, 'काय बापूसाहेब, ठीक चाललं आहे ना ?' ह्यावर बापूसाहेब आपल्या चेहऱ्यावर दहावीस सुरकुत्या पाडून उत्तर देत, 'कसचं बरं चाललंय ? सध्या धंदा अगदीच कमी ! आणीबाणीमुळे केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. मिळतं त्यातला बराचसा आयकर जातो—उरलेल्या पैशांत कसं तरी भागवावं लागतं—' असे म्हणून समोरील नोटांची चवड मोजण्यात ते गर्क होऊन जात.

भाऊबिजेचा दिवस उजाडला. बापूसाहेबांनी आपल्या धाकट्या बहिणीला—त्या दिवाळीला—मुद्दाम बोलावून घेतले होते. माळती त्यांची लाडकी बहीण होती.

इकडे वाड्याच्या देवडीजवळील खोलीत सुखदेवाचा मेहुणा-सुखियाचा भाऊ-मोहनलाल आला होता. दोन्ही घरांतील निरांजने पेटली. तबकात जाऊन बसली. ओवाळणीची सर्व तयारी झाली. सुखियाने मोहनलालला ओवाळले. त्याने तबकात पाच रुपयांची नोट घातली. सुखिया

लाडिकपणे आपल्या भावाकडे पाहून हसली. सगळ्यांनी मिळून हसतखेळत फराळ केला. हे एक दृश्य.

इकडे बापूसाहेबांच्या वाड्यात मालतीताईंनी लावलेल्या निरांजनातील तूप संपत आले तरी बापूसाहेबांचा पत्ता नाही. इंदुरी पातळ, हिऱ्याची कुडी, अशी भरघोस ओवाळणी येऊन पडली होती. पण ज्याला ओवाळायचे त्या भावाचाच पत्ता नव्हता. मालतीबाई आतुरतेने वाट पाहात होत्या. बऱ्याच वेळाने बापूसाहेबांच्या गडयाने निरोप आणला, 'मी काही तातडीच्या कामासाठी दिल्लीला जात आहे. घरी यायला वेळ नाही. तरी मालतीला म्हणावं, ओवाळून घे. इंदुरी पातळ व हिऱ्याची कुडी आणून ठेवली आहेत ती घे. राग मानू नकोस.' हे दुसरे दृश्य.

मालतीताईंच्या डोळ्यांना पाणी आले. त्या मनातल्या मनात म्हणाल्या, 'मी काही इंदुरी पातळाकरिता व हिऱ्यांच्या कुडयांकरिता आले नव्हते. भावाला प्रेमाने ओवाळण्याकरिता व मानसिक आनंदाकरिता आले होते. पाच रुपयांची नोट घेणारी सुखिया माझ्यापेक्षा खरोखरच जास्त सुखी. सुख हे पैशांच्या श्रीमंतीवर अवलंबून नसून मनाच्या श्रीमंतीवर अवलंबून असतं हेच खरं.'

* * *

# २६. उंदीरमामांची फटफजिती

* * * * * * * * * * * * * * * *



दोन उंदीरमामा होते. एक राहात होते गावात व दुसरे राहात होते रानात. दोघेही मामा मधूनमधून एकमेकाना भेटून एकमेकांची ख्यालीखुशाली विचारीत असत. दिवाळीचे दिवस आले. गावातला उंदीर रानातल्या आपल्या दोस्ताला म्हणाला, 'मामा, यंदा तुम्ही आमच्या गावातली दिवाळीची मजा बघण्याकरिता आमच्याकडे या. मजाच मजा असते आमच्या गावात दिवाळीच्या सणाला ! त्या करंज्या, कडबोळी, काटेकडबोळी, शंकरपाळे, बेसन लाडू, रवा लाडू आणि बुंदीचे लाडू ! मजाच मजा ! डबेच्या डबे भरलेले–खमंग खमंग वास !'

गावातल्या उंदीरमामाचे हे बोलणे ऐकून रानातल्या उंदीरमामांच्या तोंडाला पाणी सुटले. मग दिवाळी आल्याबरोबर तो रानातला उंदीर

गावात राहाणाऱ्या उंदराकडे पाहुणचारासाठी आला. घरात तळणी सुरू झाली. फराळाच्या पदार्थांचा खमंग वास घरात दरवळू लागला. या खमंग वासाने तो पाहुणा उंदीर एकदम खूष झाला. त्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याला वाटले, 'काय हा गावातला उंदीर सुखी आहे! दिवाळीत निरनिराळी पक्कान्नं खातो! भाग्यवान आहे खरा!'

घरात फराळाचे डबे भरले गेले. उंदीरमामा रात्र केव्हा होते याची वाट पाहात बसले. माणसांचे रात्रीचे जेवण झाले. त्यांच्या गप्पागोष्टी संपल्या व ती झोपली. दिवे विझले. काळोख झाला. ती माणसे घोरू लागली. मग गावातील उंदीरमामा रानातल्या उंदीरमामांना म्हणाला, 'मामा, चला. आता आपण दिवाळीचा फराळ करू या. चकल्या, कडबोळी, लाडू! दिवाळीची मेजवानी झोडू या. आनंदीआनंद करू. मजाच मजा करू!'

मामा वाटच पाहात होते. दोघेही उंदीर बिळाबाहेर पडले. ते स्वयंपाकघरात आले. त्या दोघांनी डबे उघडण्याची खटपट सुरू केली. डबे उघडले गेले व दोघांचा फराळ सुरू झाला. एकमेकांना आग्रह करकरून फराळावर झोड उठवीत होते. त्यांचे दात करकरा वाजत होते. त्यांचे आपसात हळूहळू बोलणे चालू होते. पण हे सर्व बोलणे मनीमावशीच्या कानावर गेले. ती म्याव म्याव करीत पुढे आली. गावातले उंदीरमामा रानातल्या उंदीरमामांना म्हणतात, 'मामा, मामा, पळा-पळा, प्राण घेऊन पळा, अहो, घात झाला! मनीबाई आल्या आहेत!'

दोघेही मामा फराळाचे सर्व सामान मागे टाकून पळून बिळात शिरले. अशी झाली त्या दोन उंदीरमामांची गावातली दिवाळी व त्या दोघा मामांची फटफजिती!

दोघेही मामा डगमगले नाहीत. त्यापुढच्या वर्षी रानातल्या मामांनी रानातच ती दिवाळी साजरी करण्याचे ठरवून गावातल्या मामांना आपल्याकडे निमंत्रण दिले. गावातले मामा खूष होऊन दिवाळीची वाट

पाहू लागले. दिवाळी जवळ आल्याबरोबर गावातले मामा रानातल्या मामांकडे आले. दिवाळीची मजा सुरू झाली. त्यांनी भाताच्या गोडगोड लोंब्या खाल्ल्या, माती उकरून भुईमुगाच्या चवदार शेंगा खाल्ल्या, भाज्यांचे कोवळे कोवळे कोंब खाल्ले. गावातल्या उंदीरमामांना अतिशय मजा वाटली. त्यांना वाटू लागले, 'काय हा रानातला उंदीर सुखी आहे! केवढं मोठं हे शेत, किती भात, किती शेंगा! खूप खूप खावं, हवं तितकं हिंडावं व मग आनंदाने आपल्या बिळात जाऊन झोपावं!' अशा विचारात दिवाळीची ती ताजी ताजी मेजवानी खाऊन गावातले उंदीरमामा तट्ट फुगून बिळात स्वस्थ पडले होते. इतक्यात रानातले उंदीरमामा घाबऱ्या घाबऱ्या त्यांच्याजवळ येऊन ओरडले, 'पळा हो पळा! जीव घेऊन पळा! नागोबा आला रे आला हुडकीत बिळा-पळा, पळा, पळा!'

मग गावातल्या उंदीरमामांना पळता भुई थोडी झाली. दोघेही मामा नागोबाला भिऊन पळत सुटले. त्यांची अगदी घाबरगुंडी उडाली होती.

रानातल्या उंदीरमामांना करंज्या-कडबोळी दिसली पण बोकोबा मात्र दिसला नाही. गावातल्या मामांना भातांच्या लोंब्या, भुईमुगांच्या शेंगा दिसल्या पण नागोबा दिसला नाही. त्यामुळे दोन्ही मामांची अशी फटफजिती झाली आणि ते दोघे म्हणू लागले,

घरात बोकोबा शेतात नागोबा
नको रे देवा। नको रे देवा!
लपून खायला। चोरून खायला
जीव जायला। दिवाळीत आपला॥
नको रे देवा। नको रे देवा!

* * *

# २७. अक्कलहुषारीचे फळ

* * * * * * * * * * * * * * * * * *

फार पूर्वी विदर्भ देशात अजितसिंग नावाचा राजा राज्य करीत होता. तो राजा फार गुणी, विद्वान असून प्रजेच्या हितासाठी अतिशय दक्ष असे. त्याला इतर सर्व सुखे अनुकूल होती. पण पुत्रसंतान नव्हते. फक्त रूपवती नावाची एक कन्या होती. नावाप्रमाणे ती राजकन्या अत्यंत रूपवान असून गुणी व कलोपासकही होती. ती योग्य वेळी उपवर झाली. राजाने जावयालाच आपले राज्य देण्याचा बेत केला व त्याप्रमाणे वरसंशोधनास सुरुवात केली. राजकन्येचा सल्ला घेऊन राजाने तिच्या स्वयंवराकरिता एक पण जाहीर केला. त्याने तीन प्रश्न तयार केले. जो राजपुत्र वा अन्य कोणीही मनुष्य राजकन्येच्या रूपागुणांना योग्य असेल त्याने तीन प्रश्नांची समाधानकारक उत्तरे द्यावी व ती उत्तरे बरोबर

असल्याचे सप्रमाण सिद्ध करावे म्हणजे राजकन्या त्याला देण्यात येईल असा तो पण होता. स्वयंवराची घोषणा सर्व राज्यात करण्यात आली; व पुढील प्रश्न जाहीर करण्यात आले.

**प्रश्न पहिला :** राजाचे शयनगृह बंद असता रात्रीच्या वेळी न बोलावता शयनगृहात येणारी कोण ?

**प्रश्न दुसरा :** राजा, रंक व आबालवृद्धांना अत्यंत प्रिय असणारी गोष्ट कोणती ?

**प्रश्न तिसरा :** राजा, रंक, पशुपक्षी या सर्वांना समान वाटली जाणारी गोष्ट कोणती ?

स्वयंवराचा दिवस निश्चित करण्यात आला होता. बरेच राजपुत्र व लायक उमेदवार जमा झाले. दरबार भरला. पंतप्रधानांनी पुन्हा ते तीन प्रश्न सर्वांना समजावून सांगितले. ज्यांना या प्रश्नांची अचूक उत्तरे देता येणार नाहीत त्यांना राजकन्या सांगेल ती शिक्षा भोगावी लागेल असेही जाहीर केले.

हे ऐकून अनेक राजपुत्र बुचकळ्यात पडले. जो तो विचार करू लागला. वरवर पाहाता प्रश्नांची उत्तरे सोपी वाटत होती. पण राजाला नेमके कोणते उत्तर अभिप्रेत असेल त्याचा अंदाज त्यांना येत नव्हता. कारण त्या प्रश्नांना निरनिराळी उत्तरे असण्याची शक्यता होती; आणि आपले उत्तर सप्रमाण सिद्ध करणे तर विशेषच कठीण होते. कोणताही राजपुत्र शिक्षेच्या भीतीने पुढे येईना. हे पाहून एका शेतकऱ्याचा सतेज व बाणेदार मुलगा पुढे सरसावला व त्याने राजाचे आव्हान स्वीकारले. तो म्हणाला, 'राजेसाहेब, मी आपल्या प्रश्नांची उत्तरं देतो. माझी उत्तरं चुकल्यास मी होईल ती शिक्षा भोगायला तयार आहे. पण प्रश्नांची मी दिलेली उत्तरं पटवून देण्याकरिता मी जे करायला सांगेन ते करायला महाराजांनी तयार झालं पाहिजे. मी काहीही केलं तरी माझ्यावर रागावता कामा नये.'

राजाने त्याची ही अट मान्य केली. राजाने सर्व राजपुत्रांना बंदीत टाकण्याचा हुकूम केला. शेतकऱ्याचा मुलगा विठोबा राजासमवेत राजवाडयात गेला. त्यांची सर्व व्यवस्था करण्याचा राजाने प्रधानजींना हुकूम केला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी विठोबा पहिल्या प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता राजाच्या शयनगृहात गेला. राजा मंचकावर बसला होता. विठोबाने खूप खूप बोलायला सुरुवात केली. त्याच्या गोष्टी संपण्याचे चिन्ह दिसेना. विठोबाच्या त्याच त्याच रटाळ गोष्टी ऐकून राजा संतापला. त्याने चुटकी वाजवून जांभई दिली व रागाने विठोबाकडे पाहिले. विठोबा म्हणाला, 'राजेसाहेब, असं रागवायचं नाही. आपण तसं कबूलही केलं आहे. काय झालं ते सांगावं!'

राजा म्हणाला, 'अरे बाबा, हे तुझं चऱ्हाट बंद कर. मला आता झोप आली.'

त्यावर विठोबा म्हणाला, 'राजेसाहेब, काय म्हणालात? झोप आली? पण तुम्ही बोलावलं कुठे तिला? अन् हे तुमचे शयनगृह तर बंद आहे. मग ती आली कशी?'

राजा अतिशय आनंदाने म्हणाला, 'शाबास मुला. माझ्या पहिल्या प्रश्नाला तू दिलेलं उत्तर मला बरोबर पटलं.'

त्यावर विठोबा म्हणाला, 'आपण आता निद्रिस्त व्हा. तुमच्या दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर मी सकाळी देईन.'

दुसऱ्या दिवशी सकाळी विठोबा एका गारुड्याला घेऊन राजमहालात आला. त्या गारुड्याने आपल्याबरोबर एक पेटारा आणला होता. विठोबाने राजाला नमस्कार केला व गारुड्याला तो पेटारा उघडण्यास सांगितले. गारुड्याने आपला पेटारा उघडून हळूच एक नाग मंचकाजवळ सोडून दिला. आपल्या पायाला लिबलिबीत काय लागते आहे म्हणून राजाने खाली पाहिले. तो काय? एक भला मोठा नाग! राजा घाबरून सैरावैरा पळू लागला. राजा पुढे व नाग मागे! राजाला पळता भुई थोडी झाली. विठोबाने त्या गारुड्याला खूण केली. गारुडी राजाला म्हणाला,

'महाराज, तुम्ही एवढे पराक्रमी नि शूर, अन् सापाला इतके घाबरता? अहो, सापाचे विषारी दात काढून टाकल्यानंतरच आम्ही त्याला आमच्या पेटाऱ्यात ठेवतो.''

राजाने एकदम रागाने विचारले, 'गाढवा, प्रत्येकालाच आपला जीव प्यारा असतो. राजा झाला म्हणून काय झालं?'

त्यावर विठोबा हळूच म्हणाला, 'महाराज, हेच आपल्या दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर! पटलं ना बरोबर?'

राजाने आनंदाने हे मान्य केले. मग तो म्हणाला, 'तिसऱ्या प्रश्नाचं उत्तर असं जीव घेणारं असेल तर तो प्रयोगच नको.'

तिसऱ्या दिवशी विठोबा एक कोंबडा घेऊन भर दुपारी राजवाड्यात आला. कोंबड्याच्या एका पायाला दोरी बांधली होती. कोंबड्याला राजापुढे उभा करून विठोबा म्हणाला, 'राजेहो, याचं आपला हुकूम सर्व लोक मानतात. हा कोंबडा फार सुंदर बांग देतो. त्याला आपण बांग देण्याचा हुकूम द्यावा.'

राजा विठोबाच्या अंगावर ओरडून म्हणाला, 'मूर्खा, कोंबडा अशी अवेळी बांग कशी देईल? तो पहाटे तांबडं फुटल्यावरच बांग देणार!'

विठोबा म्हणाला, 'पण महाराज, हा राजवाडा आहे.'

राजा म्हणाला, 'अरे वेड्या, राजवाडा असला तरी सूर्योदय सगळीकडे सारखाच होत असतो. सूर्य सर्वांना सारखाच प्रकाश देतो. मग, कोणी राजा असो वा कोणी रंक असो, वृद्ध असो किंवा बालक असो-पशू असो किंवा या कोंबड्यासारखा पक्षी असो. तो सर्वांना सारखीच वेळ दाखवणार.'

विठोबा हसून म्हणाला, 'महाराज, हेच तुमच्या तिसऱ्या प्रश्नाचं उत्तर.'

राजा मनातून खजील झाला. त्याला विठोबाच्या चातुर्याचे कौतुक वाटले. राजाने विठोबाची राजकन्येजवळ तारीफ केली व तिच्याशी

विठोबाचे लग्न लावून दिले. त्याला राजाने आपला घरजावई करून घेतले. शेतकऱ्याचा मुलगा राजाचा घरजावई झाला. हे त्या शेतकऱ्याच्या मुलाच्या अक्कलहुषारीचे फळ.

* * *

## २८. आंब्यांचा व्यापार

* * * * * 'अरे * * * * * * * * * * * *

एका मोठ्या म्हणाल्ल चौकामध्ये एक फळांचे दुकान होते. आंब्यांचा हंगाम असल्यामुळे त्या दुकानात आंबेच जास्त होते. त्याच गावात मधू पवार नावाचा एक हुषार मुलगा सबंध दिवस काही ना काही काम करून पोटापुरते पैसे मिळवून व रात्रीच्या शाळेत जाऊन शिकत असे. एक दिवस मधू या फळांच्या दुकानात आला व त्याने दुकानदाराला आपल्याला काही तरी काम देण्याबद्दल विनंती केली. दुकानदाराने त्याला आपल्याला नोकराची गरज नसल्याचे सांगितले. त्यावर मधू म्हणाला, 'शेटजी, मी तुम्हाला एक कल्पना देतो. त्यामुळे तुमचाही फायदा होईल आणि मला गरिबालाही दोन पैसे मिळतील.'

दुकानदाराने त्याला संमती दिली. तो म्हणाला, 'तुमच्या दुकानातले लहान लहान आंबे मला द्या. मी ते पलीकडच्या कोपऱ्यात बसून विकतो. विक्रीचे पैसे येतील ते तुम्हाला आणून देत जाईन. तुम्हाला योग्य वाटतील तेवढे पैसे मला द्या. मी एक कामधंदा करून विद्या शिकणारा गरीब विद्यार्थी आहे. एवढी मदत मला करा.'

मधूच्या बोलण्याचा त्या दुकानदाराच्या मनावर परिणाम झाला व त्याने मधूला लहान लहान आंबे निवडून एका टोपलीत टाकून दिले. मधूने ती पाटी उचलली व बाजूला जाऊन ते आंबे विकायला बसला. जाताना त्याने त्या आंब्यांचा भाव विचारून घेतला होता.

त्या दिवशी दुकानात आंब्यांची विक्री रोजच्यापेक्षा जास्त झाली. संध्याकाळी मधूने भरलेली टोपली परत आणून मालकापुढे ठेवली व म्हणाला, 'शेटजी, माझ्या मेहनतीबद्दल तुमच्या मर्जीला येईल ते मला द्या.'

दुकानदार आश्चर्याने म्हणाला, 'अरे भल्या माणसा, तू तर एकसुद्धा आंबा विकला नाहीस. मग तुला पैसे कशाबद्दल द्यायचे?'

त्यावर मधू म्हणाला, 'शेटजी, तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे. पण तुमच्या दुकानातले सारे आंबे विकले गेले याचं श्रेय मलाच आहे. मी माझ्या टोपलीतल्या लहान आंब्यांचा भाव तुमच्या मोठ्या फळांच्या भावापेक्षा जास्त सांगितला. म्हणून गिऱ्हाईकांनी तुमचे सगळे आंबे घेतले. माझ्या या युक्तीचा उपयोग झाला हे तुम्हांला पटलं असेल तरच मला पैसे द्या. नाही तर मी जातो.'

दुकानदार चकित झाला. मधूचे बोलणे त्याला पटले व त्याच्या हुषारीचे कौतुकही वाटले. त्याने मधूला योग्य मोबदला देऊन निरोप दिला.

स्वकष्टाने व अक्कलहुषारीने पैसे मिळवून हा मधू एम. ए. झाला व सध्या तो एका कॉलेजमध्ये प्राध्यापकाचे काम करतो. ही एक सत्यकथा आहे.

* * *

# २९. आपण सारे भाऊ भाऊ

* * * * * * * * * * * * * * * * * *

पूर्वीच्या गुजराथ प्रांतातील तो एक नऊ वर्षांचा गुजराथी गोजिरवाणा मुलगा होता. रोज सकाळी उठून दात घाशीत तो ओटीवर आला की त्याला आपले अंगण झाडून स्वच्छ करणारा म्हातारा झाडूवाला दिसायचा. तो झाडूवाला नेहमी आपल्या कामात मग्न असायचा. पण हा छोटा मुलगा दिसला की तो प्रेमाने त्याला विचारी, 'काय बाळ, ठीक चाललंय ना?' त्यावर तो मुलगा गोड गोड हसे. त्या म्हाताऱ्या झाडूवाल्याला तो लहानगा मुलगा अतिशय आवडायचा.

एक दिवस तो मुलगा सहज त्या झाडूवाल्याजवळ गेला. त्याबरोबर तो झाडूवाला चटकन मागे झाला व म्हणाला, 'दूर हो बाळ. माझ्याजवळ येऊ नकोस, मला शिवू नकोस. अगदी स्पर्शसुद्धा करू नकोस मला!' इतक्यात त्या मुलाची आई त्या ठिकाणी आली. त्या मुलाने ताबडतोब आईला सांगितले, 'आई आई, हा झाडूवाला मला म्हणतो, दूर हो, दूर हो, मला शिवू नकोस.'

आई म्हणाली, 'खरं आहे त्याचं म्हणणं. त्याला आपण शिवू नये.'

मुलाने विचारले, 'का ग आई? त्याला का शिवू नये?'

आई म्हणाली, 'आपण त्याला शिवलो तर आपल्याला पाप लागेल.'

मुलाने विचारले, 'पाप का म्हणून? तो तर बिचारा रोज आपलं अंगण झाडून स्वच्छ करतो.'

आई म्हणाली, 'अरे, तो भंगी आहे ना?'

मुलाने विचारले, 'भंगी असला तरी तो माणूसच आहे ना?'

त्यावर आई रागावून म्हणाली, 'घरात चालता हो. जास्त बडबड करून शहाणपणा दाखवू नकोस.'

काम करतो. तो तुला पहिल्याने काही सांगणार नाही. तरी त्याच्या खनपटीस बसून राहा म्हणजे त्याच्याकडून नक्की उत्तरं मिळतील.' एवढे सांगून तो दिव्य पुरुष अदृश्य झाला.

राजा जागा झाला. त्याने त्या दिव्य पुरुषाने सांगितलेल्या प्रश्नांची आठवण केली. त्या पुरुषाने केलेल्या साधूचे वर्णनही त्याला आठवले.

राजा त्या साधूचा पत्ता काढीत त्याच्या झोपडीशी आला. तो साधू आपल्या जमिनीत वाफे तयार करीत होता. राजाने त्याच्या हातांतील कुदळ घेतली व स्वतः काम करू लागला. काम करताकरता राजाने साधूला ते तीन प्रश्न विचारले, व त्यांची उत्तरे सांगण्याची विनंती केली. पण तो साधू काहीच बोलेना. अखेर संध्याकाळ झाली.

इतक्यात एक व्यक्ती तेथे धावत धावत आली. तिने आपले दोन्ही हात पोटावर दाबून धरले होते. तरी पोटातून थोडे थोडे रक्त येतच होते. राजाने त्याला आधार दिला, त्याची शुश्रूषा केली व त्याला एका अंथरुणावर झोपवले. रात्र झाल्यामुळे तेथेच वस्ती करणे राजाला भाग पडले. साधूने त्याच्या भोजनाची व्यवस्था केली व निजण्याचीही सोय करून दिली. राजा सकाळी जागा झाला, तो, आदल्या रात्रीचा तो जखमी मनुष्य त्याच्यापुढे उभा राहिला. तो राजाची क्षमाही मागू लागला. तो म्हणाला, 'राजेसाहेब, तुम्ही मला ओळखलं नसलं तरी मी तुम्हाला ओळखलं आहे. आपण माझ्या मुलाला त्याच्या एका क्षुल्लक अपराधाबद्दल देहदंडाची शिक्षा दिली आहे. त्यामुळे मी आपला सूड घेण्याचं ठरवलं व संधी शोधू लागलो. आपण इथं येणार असल्याचं कळलं म्हणून मी आपला खून करण्याकरिता इथे आलो होतो. पण आपल्या शरीर संरक्षकांनी माझ्यावर हल्ला केला. तेव्हा मी पळतपळत या झोपडीकडे आलो. आपण माझी शुश्रूषा करून माझे प्राण वाचवलेत. मी आपला घोर अपराधी आहे. मला क्षमा करावी. यापुढे जन्मभर मी आपली सेवा करीन.'

राजाला मोठा आनंद झाला की आपला तर जीव वाचलाच पण त्याचबरोबर दुसऱ्याचाही! आणि मुख्य म्हणजे एका माणसाचे प्रेम मिळविता आले! राजाने त्या माणसाच्या मुलाचा देह दंड रद्द करण्याचे आश्वासन दिले व त्याला नोकरीस ठेवण्याचे कबूल केले.

इतके झाले तरी राजाचे तीन प्रश्न शिल्लकच होते. राजाने साधूला उत्तरे देण्यास सांगितले. साधू म्हणाला 'राजेश्वरा, तुझ्या तिन्ही प्रश्नांची उत्तरं तुला मिळालेली आहेत. तू माझ्या अशक्तपणामुळे मला वेळ फुकट न दवडता तावडतोब मदत केलीस. याचा अर्थ कोणत्याही चांगल्या कामाला कोणताही मुहूर्त फलदायी ठरतो. दुसरी गोष्ट म्हणजे तू जर मला मदत केली नसतीस व घरी गेला असतास तर वाटेत मरण पावला असतास. तुझा दुसरा प्रश्न त्यामुळे सोडविला गेला आहे. सल्ला घेण्यासाठी तू माझ्याकडे आलास, माझी सेवा केलीस, यावरून तुझ्या दृष्टीने मीच श्रेष्ठ व्यक्ती नाही काय? राजा, आता राहिला तुझा तिसरा प्रश्न. सर्वांत महत्त्वाचं कर्तव्य कोणतं? तू राजा आहेस. तुझ्या प्रजेचं कल्याण हे तुझं महत्त्वाचं कार्य आहे. प्रजेला सुखी करणं, काळाबाजारवाल्यांना शिक्षा करणं, जातीयवाद नष्ट करणं, गरीबी हटवणं, प्रसंगी शुश्रूषा करणं व प्रजेचं प्रेम जिंकणं (जसं तू कालच्या माणसाचं जिंकलंस तसं), हेच राजाचं महत्त्वाचं कर्तव्य होय.'

राजाने समाधानाने मान डोलावली. तो म्हणाला 'साधूमहाराज, मला माझ्या तिन्ही प्रश्नांची उत्तरं मिळाली. सर्वांत महत्त्वाची व्यक्ती म्हणजे समोरची गरजवंत व्यक्ती व सर्वांत महत्त्वाचं कर्तव्य म्हणजे सर्वांना कायावाचामनाने आणि निर्लोभवृत्तीने मदत करणं हेच होय. साधूमहाराज, या श्रेष्ठ ज्ञानदानाबद्दल मी आपला जन्मभर ऋणी राहीन व माझ्या प्रजेला जास्तीत जास्त सुखी करण्याचा प्रयत्न करीन.'

'तथास्तु' म्हणून त्या साधूने राजाला आशीर्वाद दिला. राजा प्रसन्न अंतःकरणाने राजवाड्यात परत आला.

* * *

मुलगा घरात गेला पण त्याला काही सुचेनासं झालं होतं. तो सारखा विचार करीत होता, 'आपण गाईला पाळतो. कुत्र्यामांजरांना आपण लाडाने खेळवतो. त्यांना खायलाप्यायला देतो. त्यांच्या अंगाखांद्यांवर हात फिरवून त्यांना प्रेमाने कुरवाळतो. मग हा भंगी तर मनुष्यच आहे— आपलं अंगण झाडून स्वच्छ करणारा. उत्तम काम करणारा झाडूवाला. त्याला का शिवायचं नाही? म्हणे त्याला शिवल्याने पाप लागेल!'

तो मुलगा त्या दिवशी मग कोणाशीच काही बोलला नाही. पण या वरील विचारांनी त्याच्या मनात कायमचे मूळ धरले. पुढे तो मोठा झाल्यावरही त्याच्या मनात हेच विचार खेळत असत.

मोठेपणी त्याने आपले नाव गाजविले. आपल्या कर्तृत्वाने तो जगात पूजनीय झाला—वंदनीय झाला. साऱ्या जगात त्याने आपल्या मतांचा प्रचार केला. तो सर्वांना सांगे, 'कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही. भंगी आपले भाऊ, आपण त्यांचे भाऊ. सुखाने राहू—प्रेमाने राहू. शांतीने, सत्याने नांदू. या साऱ्या जगावर आपण प्रेम करू या. जो असं करणार नाही तो पापी होय.'

मुलांनो, कोण बरं हा मुलगा? हा मुलगा म्हणजे आपले जगद्वंद्य राष्ट्रपिताजी महात्मा गांधी!

* * *

## ३०. कलावंताच्या कलेची कसोटी

* * * * * * * * * * * * * * * * *

उत्तर भारतात रामसिंग नावाचा एक थोर राजा होऊन गेला. हा राजा फार कलाप्रेमी म्हणून प्रसिद्ध होता. शिल्पकार, चित्रकार, सुवर्णकार,

सुतार वगैरे सर्व प्रकारचे कलाकार त्या राजाने आपल्या पदरी ठेवले होते. त्या सर्व कलाकारांत चित्रकारांची कला विशेषेकरून नजरेत भरण्याजोगी होती. सगळीकडेच त्या चित्रकारांचे विशेष कौतुक होई. माधवसिंग, गुरुदेवसिंग व सहदेव यांची चित्रे सर्वांना आवडत असत. एक दिवस त्या राजाने त्या तिघांत श्रेष्ठ चित्रकार कोण हे पाहायचे ठरवून त्या तिन्ही चित्रकारांना जवळ बोलावले. तो त्यांना म्हणाला, 'प्रिय चित्रकारांनो, तुम्ही सर्वच आपल्या कलेत वाकबगार आहात. मला तुम्हा तिघांविषयीही आदर आहे-अभिमान आहे. तुम्हा तिघांवरही माझं सारखंच प्रेम आहे. पण तुम्हा तिघांत अधिक श्रेष्ठ कोण हे गंमत म्हणून मला पाहायचं आहे. तेव्हा तुमच्यापैकी प्रत्येकाने एकेक उत्तम चित्र तयार करावं. ज्याचं चित्र सर्वोत्तम ठरेल त्याला एक हजार मोहरा बक्षीस देईन.'

परीक्षेचा दिवस ठरला. प्रत्येक चित्रकाराने आपले सर्व कसब पणाला लावून आपापले चित्र काढले होते. माधवसिंगाने फुलांचे, गुरुदेवसिंगाने फळांचे व सहदेवाने पडद्याचे चित्र काढले होते.

माधवसिंगाने फुलांचे चित्र इतके उत्तम रंगविले होते की चित्रात असलेली फुले खरीच फुले वाटत. त्या फुलांना खरी फुले समजून फुलपाखरे व मधमाश्यासुद्धा त्यावर बसू लागल्या. पण त्या सर्वांची विचाऱ्यांची निराशा झाली. गुरुदेवसिंगाचे फळांचे चित्र देखील उत्कृष्ट साधले होते. त्या फळांचा रंग अगदी पिकलेल्या खऱ्या फळांनाही लाजवील इतका परिपूर्ण साधला होता. ती फळे खाण्यासाठी पोपट वगैरे पक्षी त्यांकडे झेप घेऊ लागले. पण त्यांचीही निराशाच झाली.

परीक्षेचा दिवस उगवला. चित्रमंदिरातील एका सुंदर अशा दिवाणखान्यात त्या तिन्ही चित्रकारांची चित्रे मांडण्यात आली. ती पाहून सगळे लोक खूष होत होते. कोणता चित्रकार श्रेष्ठ ठरतो याचा अंदाज लोकांना करता येईना. शेवटी राजा आपल्या राणीसह ती चित्रे बघायला त्या दिवाणखान्यात आला. त्या दोघांनीही फुलांचे व फळांचे चित्र

पाहिले. त्यांच्या मते ती दोन्ही चित्रे उत्कृष्टच होती. मग ती दोघे तिसरे चित्र पाहायला गेली. परंतु त्यांना तिसरे चित्रच कुठे दिसेना. त्यांना वाटले की, ते तिसरे चित्र शेजारच्या दुसऱ्या दिवाणखान्यात ठेवलेले असावे. म्हणून त्या दिवाणखाण्यात जाण्यासाठी तो शेजारच्या भिंतीतील दरवाजा उघडायला गेला. पण त्याच्या हाताला दरवाजा न लागता गुळगुळीत भिंतच लागली. हा काय चमत्कार आहे, ते राजाला कळेना. तो अगदी गोंधळून गेला. बऱ्याच वेळाने त्याच्या लक्षात आले की तो खरा दरवाजा नसून सहदेवाने रंगविलेला पडदा होता; आणि तो पडदा भिंतीलाच टांगलेला होता.

आता इनाम कोणाला द्यावे याचा राजा विचार करू लागला. माधवसिंग व गुरुदेवसिंग यांच्या चित्रांमुळे फुलपाखरे व पक्षी फसले होते. पण या सहदेवाच्या चित्रामुळे सर्व प्राणीमात्रांत बुद्धिमान व व कलेचा उपासक असा राजा रामसिंग फसला होता. याच कसोटीवर राजाने सहदेवाला सर्वश्रेष्ठ चित्रकार ठरवून त्याला ते एक हजार मोहरांचे बक्षीस दिले. तसेच, त्या दोघांचीही चित्रे उत्तमच असल्यामुळे त्यांनाही प्रत्येकाला साडेसातशे मोहरा देऊन त्यांचाही गौरव केला.

मुलांनो, कोणती ना कोणती तरी कला हस्तगत करण्याचा प्रयत्न करा. कलावंताला मिळणाऱ्या मानसिक आनंदाची कशाशीही तुलना करता येणे शक्य नाही. लोकप्रियता मिळविण्याचा तो एक उत्तम मार्ग आहे.

* * *

# ३१. राजाचे महत्त्वाचे कर्तव्य

* * * * * * * * * * * * * * * * * *

चंद्रपूरचा चंद्रसेन राजा फार चिकित्सक होता. एकदा त्याला एक स्वप्न पडले. एक दिव्य पुरुष त्याला म्हणत होता, 'मी तुला तीन प्रश्न सांगून ठेवतो. त्या तीन प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळविलीस तर अत्यंत यशस्वी राजा म्हणून कीर्ती मिळविशील.' राजाने उत्तरे मिळविण्याचे मान्य केले. तेव्हा तो दिव्य पुरुष म्हणाला, 'पहिला प्रश्न–चांगल्या कामासाठी चांगला मुहूर्त कोणता? दुसरा प्रश्न-सर्वांत महत्त्वाची व्यक्ती कोण? तिसरा प्रश्न-सर्वांत महत्त्वाचं कर्तव्य कोणतं?' आणि मग तो पुरुष पुढे म्हणाला, 'हे राजेश्वरा, मी तुझा हितचिंतक आहे. तुला मी मार्ग सांगतो. तुझ्या राज्याच्या वेशीजवळ एक कृश साधू एका झोपडीत राहातो. झोपडीच्या आजूबाजूला त्याची थोडी शेती असून तो स्वतः माळ्यासारखं

# ३२. सिमेंटमधील भेसळ अंगाशी आली

* * * * * * * * * * * * * * * * * *

मुलांनो, काही औषधांचे व्यापारी औषधांत भेसळ करतात, तसेच जुनीपुराणी म्हणजेच फुकट गेलेली औषधेही विकतात. काही इमारती बांधून देणारे कॉंट्रॅक्टर लोक सिमेंटमध्ये भेसळ करतात तर काही वाणी लोक दररोजच्या खाण्याच्या पदार्थांत भेसळ करून ते विकतात. पण असे केल्याने आपण लोकांच्या जीवनाशी खेळतो आहो हे ते लक्षात घेत नाहीत. हीच गोष्ट दर्शविणारी ही एक गोष्ट.

एका शहरात विट्ठलराव व त्यांची पत्नी रखुमाबाई सुखाने संसार करीत होती. त्या नवराबायकोच्या मनात आपले स्वत:चे मोठे व सुंदर घर असावे असा विचार अनेक वर्षे खेळत होता. विट्ठलराव खूप मेहनत करून पैसे मिळवीत व रखुमाबाई काटकसरीने संसार करून पैसे साठवून ठेवीत. त्या जोडप्याने घरासाठी जरूर तेवढे पैसे शिल्लक टाकले व एका बिल्डिंग कॉंट्रॅक्टरला घरी बोलावून घेऊन त्याला म्हटले, 'या परिसरात आजपर्यंत कोणीही बांधलेलं नाही असं सुंदर घर आम्हाला बांधून द्या.'

त्या कॉंट्रॅक्टरने आकडेमोड करून एकूण हिशेब केला व अर्धी रक्कम आगाऊ घेऊन त्यांना घर बांधून देण्याचे कबूल केले. थोड्याच दिवसांत घर तयार झाले. विट्ठलराव सहकुटुंब मोठ्या आनंदाने त्या नव्या घरी राहायला आले.

विट्ठलरावांच्या जुन्या घरासमोरच माधवराव व त्यांच्या पत्नी रमाबाई हे जोडपे राहात होते. त्यांनी हे नवे घर पाहिले व त्यांना त्या घराचा हेवा वाटू लागला. विट्ठलरावांच्या घरापुढे आपले घर म्हणजे झोपडपट्टीतली एक झोपडीच आहे असे त्यांना वाटू लागले. आपले घरही त्यांच्यासारखेच सुंदर असायला हवे, किंबहुना त्याहूनही सुंदर हवे असे विचार त्यांच्या मनात येत.

रमाबाईंनी माधवरावांच्या मागे लकडा लावला. माधवरावांनी पैशांची अडचण पुढे केली. रमाबाईंनी आपले दागिने काढून त्यांच्यापुढे ठेवले. दागिने विकून माधवरावांनी पैसे तयार केले व विठ्ठलरावांचे घर बांधून देणाऱ्या कॉंट्रॅक्टरलाच आपल्या घराचेही कॉंट्रॅक्ट दिले. माधवरावांनी त्याला आपले घर विठ्ठलरावांसारखेच झाले पाहिजे असे बजावून सांगितले. कॉंट्रॅक्टरने माधवरावांकडून अर्धे पैसे आगाऊ घेऊन थोड्याच दिवसांत घर बांधून दिले. मग ती दोन्ही जोडपी आपल्या घरांइतकी सुंदर घरे साऱ्या परिसरात नाहीत अशी बढाई मारू लागली. पण काही दिवसांनी त्यांच्या परिसरात त्यांच्या घरांहूनही अधिक सुंदर असे एक घर दिसू लागले. ते घरही त्यांच्याच कॉंट्रॅक्टरने बांधून दिलेले होते. पण या वेळी त्याने कसले तरी सामान वापरून व भरपूर फायदा मिळवून काम केलेले होते.

मे महिना संपून पावसाळा सुरू झाला. एक दिवस पाऊस सतत कोसळत राहिल्यामुळे विठ्ठलराव व माधवराव या दोघांच्याही घरांच्या भिंती कोसळल्या आणि घरांतील अनेक माणसे जखमी झाली. नशिबाने कोणी दगावले मात्र नाही. आपली घरे अगदी नवीन असून त्यांच्या भिंती अशा कोसळल्या कशा म्हणून त्या दोघांनी एका इंजीनियरला बोलावून घेऊन त्याला विचारले. त्याने नीट तपासणी करून घराला वापरलेले सीमेंट भेसळीचे असल्याचा अभिप्राय व्यक्त केला. विठ्ठलराव व माधवराव यांनी पोलिसात तक्रार केली, पोलिसांनी त्या कॉंट्रॅक्टरला सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देऊन ती दोन्ही घरे पूर्वीच्या स्वरूपात बांधून देण्याची सजा ठोठावली !

मुलांनो, तुम्ही मोठे झाल्यावर कोणताही धंदा करा पण आपल्या धंद्याशी, नोकरीशी व पर्यायाने आपल्या देशाशी प्रामाणिकपणे राहा.

* * *

# ३३. लोभी सावकाराची फजिती

* * * * * * * * * * * * * * * * * * *

एका गावात धनाजीशेठ म्हणून एक अतिशय चिक्कू व्यापारी राहात असे. त्याचे किराणा मालाचे दुकान होते. पण त्याचा मुख्य धंदा होता सावकारीचा. धनाजीची बावळी मुद्रा, कळकट बंडी, मेणचट टोपी व लांडा पंचा पाहून हा प्राणी दोन लाखांचा मालक असेल असे सांगून कोणालाही खरे वाटले नसते. त्याच्या लोभी स्वभावामुळे व कंजुष वागणुकीमुळे सारे गाव त्याला चिक्कूशेट या नावानेच हाका मारी. जेवणाखाणात, कपड्यालत्त्यात, दानधर्म करण्यात, सगळीकडे त्याची काटकसर व प्रत्येक गोष्टीचा लोभ! गावात कुठे लग्न असो मुंज असो, बारसे असो नाही तर बारावे असो, या चिक्कूशेटची स्वारी तेथे जेवायला हजर! त्याचा हा चिक्कूपणा व हावरटपणा पाहून त्याची बायको सुद्धा त्याला म्हणे, 'घरधनी, आपल्याला ना पोर ना बाळ! एवढा लोभ बरा नव्हे. काही तरी परोपकार करा. निदान स्वतःच्या पोटाला तरी नीट खा, चांगले कपडे घाला, जिवाची थोडी तरी चैन करा.' त्यावर चिक्कूशेट तिच्यावर रागावून बाहेर निघून जात असे.

एक दिवस लोकांची शापवाणी म्हणा किंवा त्याचे दुर्दैव म्हणा, एका मध्यरात्री त्याच्या घरात चोर शिरले व त्यांनी त्याच्या घरातील सर्व रोकड व दागिने लांबविले. चिक्कूशेटने हाय खाल्ली. लोकांनी त्याची नानापरीने समजूत घातली व चोरी पकडून देण्याचे आश्वासनही दिले. मग तो जरा शांत झाला.

पोलिसात बातमी देण्यात आली. पोलिसांच्या हुषारीमुळे आणि इतर लोकांच्या सहकार्यामुळे ते चोर सापडले. मग एके दिवशी सावकाराला पोलीस चौकीवरचे बोलावणे आले. आपले पैसे व दागदागिने परत मिळणार म्हणून तो मोठ्या आनंदाने चौकीवर आला.

'तुम्ही तुमचा माल ओळखू शकाल का' या प्रश्नाला त्यांनी 'हे काय विचारणं झालं?' अशा प्रतिप्रश्नानेच उत्तर दिले.

फौजदार म्हणाले, 'ठीक आहे. हं-आता हा चपलाहार ओळखा पाहू. हा तुमचा आहे का?'

तो अतिशय सुंदर चपलाहार पाहाताच त्या सावकाराचे डोळे दिपून गेले. तो मनात क्षणभर घोटाळला पण त्याच्या पाचवीला पुजलेल्या लोभामुळे तो म्हणाला, 'वा साहेब! हा तर माझाच चपलाहार!'

त्यावर फौजदार म्हणाला, 'ठीक आहे. आता हा मोत्यांचा कंठा पाहा बरं. तुमचा असला तर सांगा.'

आमचे लोभी महाशय म्हणाले, 'फौजदार साहेब, हा तर माझ्याकडे गहाण असलेला कंठा आहे. उद्याच या गहाणाची मुदत संपणार होती. बरं झालं. अगदी वेळेवर मिळाला!'

फौजदारसाहेब करड्या आवाजात गरजले, 'अस्सं?? कंठा अगदी वेळेवर मिळाला काय? कंठा वेळेवर मिळाला की चोर वेळेवर मिळाला ते बघतो आता! हवालदार, या बदमाशाच्या हातात बेड्या ठोका आणि घेऊन चला तुरुंगात—'

हे अकस्मात ओढवलेलं संकट पाहून शेटजीची बोबडीच वळली. 'फौजदारसाहेब, म–म–मी चो–र नाही. चो–चोर सोडून संन्याशाला सुळी देऊ नका—' असे बडबडू लागला.

मुलांनो, त्या सावकाराच्या हातात बेड्या का पडल्या ते आलं का तुमच्या लक्षात? त्या सावकाराच्या लोभीपणाचा व चिक्कूपणाचा सगळीकडे बभ्रा झालेला होता. म्हणून फौजदारसाहेबांनी त्याची परीक्षा घेण्याचे ठरवून त्याच्या मालकीच्या नसलेल्या दोन मौल्यवान वस्तू दाखविल्या. असे करून त्यांनी त्याची परीक्षाच पाहिली. शेटजी त्याच्या स्वभावाप्रमाणे लोभास बळी पडले व त्या वस्तू आपल्याच असल्याचे खोटे सांगू लागले. अशा प्रकारे ते त्या फौजदाराच्या जाळ्यात सापडले.

लोकांनी फौजदारांना सावकाराच्या वतीने विनंती केल्यावरून फौजदारांनी त्या सावकाराची चांगली कानउघाडणी करून त्याला मोकळा केले व जे दागिने खरोखरच त्याचे होते ते त्यास परत केले. त्याच्या मालकीची रोकड रक्कम सार्वजनिक संस्थांना देणगी म्हणून देण्यात आली.

* * *

## ३४. सिनेमा हे व्यसन आहे

* * * * * * * * * * * * * * * *

मुलांनो, लहानपणी प्रत्येकाच्या आयुष्यात मोहाचे क्षण येतात व त्या वेळी मुले चोऱ्या करतात. आईबापांना फसविण्याचा प्रयत्न करतात. काही वेळा वाईट संगतीचा परिणाम होतो. तरी नेहमी चांगल्या मुलांची संगत धरण्याचा प्रयत्न करा. संगतीचा परिणाम कसा होतो ते दर्शविणारी ही एक गोष्ट.

मोहन आणि माधव हे दोघे मित्र होते. त्या दोघांनाही सिनेमा पाहाण्याची चटक लागली होती. एक दिवस मोहन माधवच्या घरी गेला व त्याला विचारू लागला, 'असा सुस्त आणि डोकं धरून का बसला आहेस?'

माधव म्हणाला, 'आता सगळं पुरे झालं. सगळं एकदम बंद!'

मोहन म्हणाला, 'अरे, पण असं झालं तरी काय ते सांगशील का?'

माधव म्हणाला, 'काय सांगू, कपाळ? एकच सांगून ठेवतो. यापुढे मी कधीही तुझ्याबरोबर सिनेमा पाहायला येणार नाही.'

मोहन म्हणाला, 'अहा रे वेड्या! आज किती सुंदर पिक्चर लागलंय! आजच जायला हवं—'

माधव म्हणाला, 'आता सिनेमाला माझा कायमचा रामराम! माझी सारी बनवाबनवी माझ्या बाबांच्या लक्षात आलेली आहे अशी मला भीती वाटते आहे.'

मोहनने विचारले, 'ते कसं काय?'

माधव म्हणाला, 'गेले आठदहा दिवस बाबा रोज आईला म्हणतात की, त्यांच्या खिशातले पैसे कोणी तरी काढून घेत असलं पाहिजे म्हणून.'

मोहन म्हणाला, 'मग ते तू आपल्यावर कशाला ओढून घेतोस? घरात इतर माणसं आहेतच की! गडी आहे, मोलकरीण आहे, घरी येणारे पाहुणे आहेत. त्यांच्यांतल्या कोणी तरी घेतले असतील!'

माधव म्हणाला, 'अशी बनवाबनवी करणं तुला जमत असलं तरी मला ते जमणार नाही. तुझ्या नादी लागूनच मी बाबांच्या खिशातले पैसे काढले. पहिल्यांदा थोडे–मग पुष्कळ. आता बाबांच्या लक्षात आलेलं दिसतं आहे. आज सकाळी बाबांनी खिशातलं पाकीट काढलं व ते माझ्याकडे अशा नजरेने पाहू लागले की जणू मीच त्या पाकिटातून पैसे काढून घेतलेले असले पाहिजेत!'

मोहन म्हणाला, 'यातून निसटण्याची युक्ती मी सांगतो.'

माधव म्हणाला, 'तुझी युक्ती आता तुझ्याजवळच ठेव. तू झाला आहेस सराईत चोर. मी अजून कच्चाच आहे.'

मोहन म्हणाला, 'अगदीच बावळट आहेस तू. एवढ्याशा गोष्टीनं असं खचून जायचं?'

माधव म्हणाला, 'मोहन, हे तुझे जादूचे प्रयोग आता दुसऱ्या कोणावर तरी सुरू कर. तुझी डाळ आता माझ्याजवळ शिजायची नाही.'

त्यांचा असा संवाद चालू असतानाच माधवच्या बाबांनी त्याला हाक मारली. माधव एकदम गडबडून गेला. त्याची शंका बळावली. बाबा आपल्याला खूप बोलणार अशी त्याला भीती वाटू लागली. त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले. हे सर्व पाहून मोहनने हळूच खोलीचे दार उघडले व तो पळून गेला. पण माधवच्या बाबांनी मोहनला पळून

जाताना पाहिले होते. मग माधव बाहेर येऊन त्यांना म्हणाला, 'काय बाबा ? हाक मारलीत मला ?'

बाबा त्याच्याकडे टक लावून पाहात म्हणाले, 'होय. मी तुला हाक मारली, तुला—'

त्यांच्या पायांवर डोके ठेवून माधव रडत रडत म्हणाला, 'बाबा, मीच तुमचे पैसे चोरले. मला क्षमा करा. यापुढे मी पुन्हा असं कधीही करणार नाही'.

बाबा म्हणाले, 'माधव, ऊठ. मला सगळं समजलं आहे. मोहनच्या संगतीने तुला सिनेमाचं व्यसन लागलेलं आहे. त्या व्यसनामुळे तुला चोरी करण्याची दुर्बुद्धी झाली. तू आपला गुन्हा कबूल केला आहेस. म्हणून मी तुला क्षमा करतो. पुन्हा असं करू नकोस, आणि मोहन-सारख्या मुलांची संगत धरू नकोस.'

त्या दिवसापासून माधव एकदम सुधारला. त्याने सिनेमा पाहाण्याचे एकदम बंद केले. इतकेच काय, पण तो आता टी. व्ही. वरील छायागीत सुद्धा पाहात नाही.

* * *

## ३५. काम हाच प्रगतीचा मार्ग

* * * * * * * * * * * * * * * * * *

ही एक काल्पनिक गोष्ट आहे. कृष्णा नदीच्या काठी एक फार मोठे वडाचे झाड होते. अनेक पशुपक्षी तेथे खेळीमेळीने राहात असत. सगळी आपापली कामे झटून करीत आणि जेवायला एकत्र जमत.

एक दिवस पहाटे नेहमीप्रमाणे कोंबडा सर्वांच्या अगोदर उठला. त्याच्या मनात इतरांना जागे करायचे होते. त्याने आपले नाक, तोंड

चोच, पंख सर्व स्वच्छ केले आणि पंखांची फडफड करीत एका उंच फांदीवर जाऊन बसला. आपली मान उंच करून तो ओरडला, 'कुक्कूरेऽकू–! उठा उठा, अन् चला चला। पहाट झाली, सूर्य उगवला लागा अपुल्या कामाला ॥'

हे ऐकताच फुलांनी डोळे उघडले. मुलांनीही डोळे उघडले. पिलांनी पण डोळे उघडले. सुवासिक वारे वाहू लागले. सगळे प्राणी जागे झाले. पिले, पोपट, मधमाश्या, सुतारपक्षी, मुंग्या सगळी एकदम ओरडली, 'आम्ही उठलो. चला कामाला!'

सगळे उठले आणि त्यांनी आपापल्या कामाला सुरुवात केली. तरीही बगळे, मैना, बदके वगैरे झोपूनच होती. कोंबडा पहिल्याने मैनेकडे गेला व म्हणाला, 'सगळे उठले, सकाळ झाली, ऊठ मैने, ऊठ!' त्यावर मैना म्हणाली, 'अरे कोंबडेभाऊ, गोड गुलाबी झोपेपुढती कामबीम सब झूट!'

मग कोंबडा गेला बगळ्याकडे व त्याला म्हणाला, 'पहाट झाली– ऊठ बगळ्या, लाग लवकर कामाला!' त्यावर बगळा म्हणाला, 'कुडकुड कुडकुड थंडी वाजते। झोपू दे आज मला॥' मग कोंबडा बदकाकडे गेला व म्हणाला, 'पहाट झाली, सकाळ झाली! ऊठ बदका, ऊठ॥' त्यावर बदक म्हणाले, 'जागलो होतो रात्री फार। कामाला आज सूट॥' असे म्हणून चोच पंखांत खुपसून ते पुन्हा झोपून गेले.

बाकी सर्व कामाला लागले. जेवणाचे पदार्थ गोळा करण्यास सुरुवात झाली. कोंबड्यांनी डाळ आणली, पिलांनी तांदूळ आणले. मुंग्यांनी खा-साखर आणली. पोपटांनी फळे आणली. सुतार पक्षांनी लाकडे आणली. सगळ्यांनी मिळून स्वैपाक केला. शिरा-पुऱ्या-भात-भाजी केली. फळांचे फ्रूट सलाड बनविले. गोल रिंगण करून सगळी जेवायला बसली. इतक्यात डोळे चोळीत बगळा आला. बदक जांभया देत आले. डोके खाजवीत मैना आली. 'मला भूक लागली आहे, माझं पान कोणतं?'

हा प्रकार पाहून कोंबडा म्हणाला, 'हे तिघे त्यांना पुन्हा पुन्हा उठवूनही उठले नाहीत. यांनी काही काम केलं नाही. यांना काहीही

द्यायचं नाही.' त्याचे म्हणणे काहींना पटले. ते म्हणाले, 'भोजनभाऊ ऐतखाऊ। मारून ठोकून पळवून लावू॥'

काहींना त्याचे हे बोलणे पटले नाही. पोपट म्हणाला, 'बाबांनो, हे आपले भाऊच आहेत. त्यांना आपण समजावून सांगू. आळस सोडून कामाला लागण्याचा उपदेश करू. काम करणं हाच प्रगतीचा व उन्नतीचा मार्ग आहे. आपापसात मारामारी करणं हे घातक आहे.'

पोपटाचे हे बोलणे सर्वांना पटले. सर्वांनी आळस टाकून काम करण्याचे ठरविले. नंतर सर्वांनी भोजन केले. ते सगळे म्हणत होते, 'आपण सगळे भाऊभाऊ। मिळून जेवू मिळून राहू॥ जास्तीत जास्त काम करू। प्रगतीचा हा मार्ग धरू॥'

मुलांनो, आळस सोडून काम करा. त्यावरच आपल्या भारत देशाचे भाग्य अवलंबून आहे.

प. पै. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दिनांक

## ३६. जातीयवाद सोडून द्या

* * * * * * * * * * * * * * * *

पूर्वीच्या ऋषींनी हा जातीयवाद निर्माण केला आहे. हा उच्च, हा कनिष्ठ, हा महार, हा चांडाळ ह्या खुळ्या कल्पनेमुळे एका ऋषीचे स्वतःचे किती नुकसान झाले—न येणारी संधी निघून गेली हे दर्शविणारी एक पौराणिक गोष्ट.

कौरव-पांडवांचे युद्ध संपल्यानंतर भगवान श्रीकृष्ण एका निबिड अरण्यात आपल्या गमनाची तयारी करीत होते. तेवढ्यात त्याना उचक ऋषी येताना दिसले. भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्या महान भक्तीवर

खूष होऊन त्यांना वर मागण्यास सांगितले. बराच वेळ विचार करून मुनी म्हणाले, 'देवा, मला ज्यावेळेस तहान लागेल त्यावेळेस मला पाणी मिळावं असा वर दे.' श्रीकृष्ण 'तथास्तु' म्हणून अंतर्धान पावले.

काही दिवसांनी उचक मुनी एका अरण्यातून फिरत असताना त्यांना भयंकर तहान लागली. त्यांचा जीव अगदी कासावीस झाला. इतक्यात त्यांना श्रीकृष्णाने दिलेल्या वराची आठवण झाली व ते भगवंताची आराधना करू लागले. थोड्याच वेळात त्यांना एक मुलगा डोक्यावर घडा घेऊन त्यांच्याकडे येताना दिसला. तो मुलगा त्यांच्याजवळ येऊन म्हणाला, 'मुनिवर्य, आपल्या चेहेऱ्यावरून आपल्याला तहान लागली असल्याचं दिसतं. माझ्या या घडयात स्वच्छ पाणी आहे. आपण ते प्यावं व आपली तहान भागवावी.' तो मुलगा त्यांच्याशी अतिशय विनयाने बोलून मुनिवर्य काय सांगताहेत याची वाट पाहात उभा राहिला.

उचक मुनींनी तो मुलगा चांडाळ जमातीपैकी असल्याचे ओळखले पण त्याचा तो घडा व त्यातील पाणी स्वच्छ व निर्मळ होते. तरी पण मुनींनी पाणी पिण्यास नकार दिला. तो मुलगा नाराज होऊन निघून गेला.

तो मुलगा निघून गेल्यावर भगवान श्रीकृष्ण स्वतः अवतीर्ण झाले व उचक मुनींना म्हणाले, 'मुनिवर्य, आपण ज्या मुलाला पाणी पिण्यासाठी नकार दिलात, तो मुलगा चांडाळपुत्र नसून प्रत्यक्ष इंद्रदेव त्याच्या वेषात आला होता. तुम्हाला अमृत देण्यासाठी मीच इंद्राला विनंती केली होती. तेव्हा इंद्रदेव मला म्हणाले होते की, उचक ऋषी अमृताचे अधिकारी नाहीत कारण त्यांच्याजवळ अमृत ओळखण्याची पात्रता नाही व पुण्याईही नाही. परंतु आपण सांगता म्हणूनच मी त्यांच्याकडे जाईन. आणि खरोखरच आपण इंद्रदेवाला व त्यांच्या घड्यातील अमृताला ओळखू शकला नाही.' उचक मुनींना या घटनेचे अतिशय दुःख झाले. उच्च आणि नीच या वर्गकलहाच्या आहारी जाऊन प्रत्यक्ष इंद्राकडील अमृत

पिण्याची संधी आपण दवडली. आता पश्चात्ताप करून काय फायदा ?' मुनिवर्य शरमिंधे झाले. भगवान श्रीकृष्णांनी मुनींना समजावून सांगितले की, वस्तू देणारा कोण आहे हे न पाहता त्याची भावना-भक्ती पाहा व जातीयवाद काढून टाका.

* * *

## ३७. कष्ट करून सुखी व्हा

* * * * * * * * * * * * * * * * *

एका खेडेगावात एक म्हातारा व त्याची म्हातारी बायको अशी राहात असत. म्हातारा चाकूने बांबू तासायचा व बांबूच्या टोपल्या तयार करायचा. म्हातारी सूत कातायची व उत्तम कापड तयार करायची. काम करताकरता म्हाताऱ्याच्या चाकूची मूठ मोडली व म्हातारीचा चरखा पण मोडला. म्हातारी त्यावर म्हाताऱ्याला म्हणाली, 'आपल्याला काम करणं जड होत चाललं आहे, तरी तुम्ही जंगलात जा व झाड तोडून तुमच्या चाकूच्या मुठीसाठी व माझ्या चरख्यासाठी लाकूड घेऊन या.'

बायकोच्या आज्ञेप्रमाणे म्हातारबुवा जंगलात गेले, योग्य झाडाची निवड केली व झाडावर कुऱ्हाड मारणार, एवढ्यात त्या जंगलाचा देव बाहेर आला. त्याने झाडांच्या फांद्यांचा पेहेराव केला होता. लांब दाढी-मिश्या, उग्र चेहेरा व निळ्या डोळ्यांनी तो झळाळत होता. तो एकदम त्या म्हाताऱ्याला म्हणाला, 'म्हातारबाबा, माझ्या झाडांना हात लावू नका. ती सारी झाडं जीवंत आहेत. त्यांना जगायचं आहे. तुम्हाला काय हवं आहे ते मागा, मी ते तुम्हाला देईन.' म्हाताऱ्याला आश्चर्य वाटले व

आनंदही झाला. तो देवाला म्हणाला, 'हे देवा, मला काय पाहिजे आहे ते मी माझ्या बायकोला घरी जाऊन विचारून येतो. मी उद्या येईन.'

एवढे सांगून म्हातारा घरी आला व त्याने म्हातारीला सर्व गोष्टी सांगितल्या. देवाजवळ काय मागायचे याचा विचार सुरू झाला.

**म्हातारा :** आपण देवाजवळ खूप पैसा मागू, म्हणजे आपल्याला सर्व सुखं मिळतील.

**म्हातारी :** अहो, पैसा पुष्कळ मिळाला तर तो ठेवायचा कुठं ? रात्री चोर येतील व तो घेऊन जातील व आपल्यालाही ठार मारतील.

**म्हातारा :** बरं आहे. मग आपण शेळ्या-मेंढ्या-गाई मागू.

**म्हातारी :** शेळ्या-मेंढ्या-गाई हव्यात कशाला आपल्याला ? दुधाकरिता आपल्याकडे एक गाय आहे. पाच मेंढ्या आहेत त्या लोकर देतात. शेळी पण थोडं दूध देते. गाई, मेंढ्या वगैरे काही नको. उगाच व्याप !

**म्हातारा :** हे बघ कारभारणी, आजकाल कोंबड्यांना लई भाव आहे. आपण देवाजवळ चारपाचशे कोंबड्या मागू.

**म्हातारी :** तुम्हाला काय येडबीड लागलंय की काय ? मी म्हातारी, तुम्ही म्हातारे ! करणार काय त्या कोंबड्यांचं ? आपल्याकडे दोनतीन कोंबड्या आहेत तेवढ्या पुरेत.

म्हातारा विचार करून दमला. काही निर्णय लागेना. त्याला जे काही हवे होते ते त्याच्यापाशी होते, व जे नव्हते ते त्याच्या श्रमातून मिळण्याजोगे होते. म्हातारा उठला व म्हातारीला म्हणाला, 'हे बघ कारभारणी, देवाजवळ काय मागायचं, ते आता मला कळलंय.' तो लगेच जंगलात गेला व त्या झाडाजवळ जाऊन त्याने कुऱ्हाड उगारली. देव पुढे उभा राहिला व म्हणाला, 'काय रे म्हाताऱ्या, काय ठरला तुझा विचार ? काय पाहिजे ते माग.' म्हातारा म्हणाला, 'देवा, आम्ही खूप विचार केला. आम्हाला सर्व आहे. तू आम्हाला कधीही न मोडणारा चरखा व न मोडणारी चाकूची मूठ व आमच्या दोघांच्या हातांत काम

करण्याची ताकद दे. मग आम्हाला काय हवं आहे ते आम्हाला कष्ट करून मिळविता येईल.' देव म्हणाला, 'तथास्तु'.

तेव्हापासून म्हातारा-म्हातारीचे जीवन उत्तम तऱ्हेने चालले आहे. म्हातारा चाकूने बांबू तासून टोपल्या करतो व म्हातारी सूत कातून कापड व मोजे तयार करते. दोघेजण कष्ट करतात, आनंदात आहेत. समाधानी आहेत. मुलांनो, कष्ट करून जगणं हेच सुखाचं जगणं होय.

* * *

## ३८. यमदूतसुद्धा अन्नाला जागले

* * * * * * * * * * * * * * * * *

एका राजाला बऱ्याच वर्षांनी पुत्ररत्न झाले. एका उत्तम ज्योतिषाकडून त्याची कुंडली करून घेतली. पण त्याच्या नशिबात सोळाव्या वर्षी मरण होते. एकुलता एक देखणा मुलगा ! राजा–राणी काळजीत असत. तो संध्याकाळी लवकर खेळून परत आला नाही, की त्यांचे डोळे पाण्याने भरून येत.

राजपुत्राच्या लक्षात ही गोष्ट आली व त्याने मातापित्यांच्या दुःखाचे कोणतेही कारण असले तरी न लपविता सांगण्याची विनंती केली. बरेच आढेवेढे घेऊन राजाने त्याच्या सोळाव्या वर्षी येणाऱ्या मृत्यूची बातमी सांगितली.

राजपुत्राने दुसऱ्या देशात जाण्याचे ठरविले. राजा–राणीला अंधुकसा आशेचा आधार वाटून त्यांनी त्याला बरेच पैसे देऊन जाण्याची परवानगी दिली. राजपुत्र घोड्यावर बसून निघाला.

तो दुसऱ्या एका देशात गेला. एक ठिकाण पसंत करून तिथे तो राहू लागला. राजपुत्र सोळा वर्षांचा झाला. यमदूतांनी त्याची बरीच शोधाशोध केली व शेवटी त्याला गाठले व सांगितले, 'आम्ही तुला घेऊन जायला आलो आहो.' राजपुत्र म्हणाला, 'मी आपल्याबरोबर यायला तयार आहे. पण जायच्या अगोदर आपण सर्वजण थोडा भात खाऊन जाऊ या. तुम्हीही दमलेले दिसता.' यमदूतांनी नाही हो करताकरता संमती दिली. कारण त्यांनाही खरोखरच भूक लागली होती.

जेवण झाले. पण जेवण होते न होते तोच यमदूतांमध्ये पुढे काय करावे याबद्दल चर्चा सुरू झाली. त्यांनी राजपुत्राचा भात खाल्ला होता. तेव्हा त्याचा मृत्यू घडविणे त्यांना जड वाटू लागले. ते त्याला म्हणाले, 'आम्हाला यमराजाने तुला आणण्यासाठी पाठविलं आहे. आज रात्री तुझं मरण आहे आणि तुझा जीव घेऊन आम्हाला जायचं आहे. पण आम्ही तुझा भात खाल्ला आहे—अन्न खाल्लं आहे. तेव्हा तुझा जीव कसा वाचेल याबद्दल आम्ही तुला सल्ला देऊ. तू एक वारीकशी दिव्याची वात घे. यमराज जेव्हा तुला प्रश्न विचारतील तेव्हा तू ती आपल्या नाकात घाल आणि जोरानं शिंक.' राजपुत्राने तसे करण्याचे कबूल केले.

रात्री राजपुत्राचा जीव घेऊन ते यमदूत यमराजाकडे गेले. यमराज राजपुत्राला प्रश्न विचारू लागल्याबरोबर त्याने ती वात नाकात घातली आणि तो जोराने शिंकला. तेव्हा यमराजाने ताबडतोब लिहिले की, आणखी साठ वर्षे जगावे व तो दूतांना म्हणाला, 'जा, ह्याचा जीव परत त्याच्या कुडीत घाला.' ताबडतोब राजपुत्र आपल्या राजधानीत परत गेला. झालेली सर्व हकिगत त्याने राजा-राणीला सांगितली. दोघांना अतिशय आनंद झाला. राजपुत्राच्या विवाहाचे विचार सुरू झाले. शेजारच्या राजाची मुलगी पसंत पडली. लग्नसमारंभ उत्तम तऱ्हेने पार पडला. रामराज्य सुरू झाले.

* * *

# ३९. सत्पात्री उपकार करा

* * * * * * * * * * * * * * * * *



मुलांनो, माणसाने दुसऱ्यावर उपकार करावा हे साधुसंतांचे म्हणणे आचरणात आणावे. आपला फारसा तोटा न होता किंवा थोडाफार तोटा सोसूनही दुसऱ्यावर उपकार करावा. पण ज्याप्रमाणे दान हे सत्पात्री करावयाचे असते त्याचप्रमाणे उपकारही सत्पात्रीच करावा. कारण काही वेळा ज्याच्यावर उपकार केला असेल तो तो उपकार विसरून कोणत्या थराला जातो हे दर्शविणारी एक काल्पनिक गोष्ट.

एका रानात एक लांडगा राहात होता. कुठे तरी शेतात वगैरे हिंडून व एखादा बोकड वगैरे मारून तो आपली उपजीविका करीत असे. एक दिवस त्याला एका चांगल्या बोकडाची शिकार मिळाली व ऐटीत बसून तो त्याचा फडशा पाडू लागला. पण गंमत अशी झाली की, अधाशीपणाने खाताना त्या बोकडाचे एक हाडूक खाताखाता त्या लांडग्याच्या घशात

अडकले. लांडगोबा घाबरले व मोठमोठ्याने ओरडू लागले. त्याचे ते ओरडणे एका बगळ्याने ऐकले. तो जवळ आला व म्हणाला, 'अहो लांडगेदादा, तुम्ही घाबरू नका. तुमच्या घशात अडकलेलं हाडूक मी बाहेर काढतो. पण एका अटीवर! हाडूक बाहेर काढल्यावर मला काही तरी खायला दिलं पाहिजे'.

लांडगेदादा संकटात असल्यामुळे त्यांनी ते मान्य केले. त्याने बगळ्याला नदीकाठचे खेकडे देण्याचे वचन दिले. बगळ्याला आनंद झाला. त्याने आपल्या लांब चोचीने लांडग्याच्या घशातले हाडूक अगदी अलगद बाहेर काढले व तो लांडग्याला म्हणाला, 'चल, दे आता मला खेकडे'. लांडग्याने ते कबूल केले व बगळ्याला घेऊन तो नदीकाठी गेला. भोळा बगळा आनंदात होता. पण त्याला पाहाताच सगळे खेकडे लपून बसले. बगळा निराश झाला. लांडग्याने आपल्याला फसविले असल्याचे त्याच्या लक्षात आले व तो लांडग्याला शिव्या देऊ लागला. लांडग्याने प्रथम त्याच्याकडे कानाडोळा केला. पण तो बगळा जेव्हा फारच बोलू लागला तेव्हा तो बगळ्याने त्याच्यावर केलेला उपकार विसरला व त्याने त्या बगळ्यावर एकदम झडप घालून त्याला ठार मारले व त्याचा फडशा उडवला.

उपकार कोणावर करायचा तो नीट विचार करूनच करावा. हे अवघड आहे. पण तसा आपला प्रयत्न असावा.

* * *

# ४०. शेटजींच्या स्वप्नातले भांडण

* * * * * * * * * * * * * * * * * *

मोहनदास शेटजींना कीर्तन ऐकण्याचा नाद लागला. रात्री कीर्तन ऐकून त्यांना जाग्रण झालं होतं. दुपारी दुकानात डुलक्या घेत होते. चांगलेच पेंगू लागले. त्यांना झोप लागली व डोळ्यांपुढे नारद मुनी दिसू लागले. शेटजी म्हणाले, 'नमस्कार मुनिवर्य ! बरं झालं, तुम्ही भेटलात. तुमची ही वीणा गळ्यात आहे. ही शेंडी ताठ उभी आहे. आणि हातात चिपळ्या वाजवीत तुम्ही जगभर हिंडता. तुम्हाला कळीचा नारद असं म्हणतात. बरोबर ना ? मग दाखवा की थोडी आपली करामत. बाकी तुम्ही लावलेल्या भांडणाचा शेवट वाईट नसतो, हे मात्र विशेष आहे. पाहू तुमचा एखादा किस्सा !'

नारद म्हणाले, 'शेटजी, तुम्ही आमच्या नादी लागू नका. तुमच्या दुकानात तुम्हाला काय थोडी करमणूक आहे ?' त्यावर शेटजी म्हणाले, 'पण थोडीशी गम्मत म्हणून चुणूक दाखवायला काय हरकत आहे ?' नारद म्हणाले, 'शेटजी, पहा बरं, विचार करा, गंमत महागात पडेल.' असे म्हणून त्यांनी शेटजींकडून एक मधाची बाटली मागून घेतली. त्या बाटलीतून मधाचे दोन थेंब काढून ते दुकानाच्या फळीवर टाकले व बाटली परत केली. 'शेटजी, मी नदीवर स्नान-संध्या करून येतो, तोपर्यंत आमचा हा वीणा व ह्या चिपळ्या सांभाळा,' असे सांगून नारदांची स्वारी स्नानास निघून गेली.

थोड्याच वेळात त्या मधाभोवती खूप मुंगळे जमले. त्या मुंगळ्यांना पाहून त्यांना वेचण्याकरिता चिमण्या भुरुभुरू उडत आल्या. चिमण्या पाहिल्यावर शेटजींच्या घरातले मांजर त्या चिमण्यांना पकडण्याकरिता आले. शाळेची मधली सुट्टी झाली होती. घरी जाणारी पोरं ही गंमत पाहाण्यासाठी तिथंच थांबली.

शेटजींच्या त्या गुबगुबीत मांजराला पाहून समोरच्या रतनशेटजींच्य कुत्र्याने ताडकन शेटजींच्या मांजरावर झडप घातली. आपल्या मांजराल कुत्रा त्रास देतो आहे हे पाहून शेटजींनी कुत्र्याला काठी मारली. ते कु लागलं लंगडायला ! केकटत केकटत ते आपल्या मालकाकडे गेल रतनशेटजी आले धावत भांडायला. शिव्या द्यायला सुरुवात झाल शेटजीही काही कमी नव्हते. त्यांनी रतनशेटजींच्या आईबापां उद्धरणी केली. दोघांची मारामारी सुरू झाली. पोरं मजा पाहाताहेत, र टिंगल करताहेत. गर्दी जमली. शेटजी–शेटजींची मारामारी पाहून त्यां नोकरही भांडायला लागले. प्रसंग निकरावर आला. रहदारी थांबली. शेवटं पोलिसांना बोलवावे लागले.

इतक्यात नारदमुनी स्नान उरकून गर्दीतून वाट काढीत कार्ढ शेटजींच्या दुकानापाशी आले व शेटजींना म्हणाले, 'शेटजी, मा वीणा आणि चिपळ्या द्या.' शेटजी हात जोडून म्हणाले, 'नारद महाश आपल्याला आमचा कोपरापासून नमस्कार.'

नेमका याच वेळी शेटजींचा रामा नोकर जेवणाचा डबा घेऊन दुकान शिरला व त्याने शेटजींना हलवून जागे केले व म्हणाला, 'शेटजी, अ मी तुमचा रामा नव्हे का ? कोपरापासून नमस्कार कुणाला करताय

डोळे चोळीत चोळीत शेटजी स्वतःशीच म्हणाले, 'म्हणजे हे स्वप्नच म्हणायचं !'

* * *

BVBK-0400260